**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**मुंबईतील बांगलादेशी नागरिकांकडे आधार कार्ड व पॅन कार्ड असल्याबाबत**

**(१) * ३८०२४ ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.एम.एम.शेख, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.माणिकराव ठाकरे, श्रीमती अलका देसाई, श्री. शरद रणपिसे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेने अटक केलेल्या बांगलादेशी नागरिकांकडे आधार कार्ड व पॅन कार्ड सापडल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पी. डीमेला रोड, मुंबई येथील फॅन्सी बारवर पोलिसांच्या विशेष शाखेने छापा घालून ६ बांगलादेशी नागरिकांना अटक केली त्यातील एकाकडे आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र सापडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांगलादेशी नागरिकांस अवघ्या अडीच हजारात सदर परवाने बनवून मिळाल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, आतापर्यंत किती लोकांना अशा खोट्या कागदपत्रांच्या आधारे पॅन कार्ड, आधार कार्ड व निवडणूक ओळखपत्र देण्यात आली आहेत,

(५) असल्यास, प्रश्न भाग १ व ३ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्अनुषंगाने आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्रे देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच बांगलादेशी नागरिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,तसेच बांगलादेशी नागरिकांची मोजदाद करणारी यंत्रणा शासन उभारणार आहे काय

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) व (२) होय, हे खरे आहे. बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामधील विशेष शाखा-१ अंतर्गत आय शाखेने दि. ०७.०१.२०१३ रोजी पी.डीमेलो रोड, मुंबई येथील फॅन्सीबार वर घातलेल्या छाप्यामध्ये सहा घुसखोर बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली असून त्यातील एक घुसखोर बांगलादेशी नागरिक कबीर रबीऊल इस्लाम याच्याकडे आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र इत्यादी कागदपत्रे सापडली.

(३) व (४) सदर घटनेबाबत केलेल्या तपासात आतापर्यंत कबीर रबीऊल इस्लाम या बांगलादेशी नागरिकाने मोंटी नामक भारतीय एजंटकडून अडीच हजाराच्या मोबदल्यामध्ये गझना ग्रामपंचायतीचे वास्तव्याचे बनावट प्रमाणपत्र आणि पश्चिम बंगाल निवडणूक आयोगाचे बनावट ओळखपत्र प्राप्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करुन त्या कागदपत्रांच्या मदतीने पॅन कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना आणि आधारकार्ड प्राप्त केल्याचे आढळून आले.





ता.प्र.क्र.38024....

(५) व (६) सदर घटनेबाबत आरोपी कबीर रबीऊल इस्लाम याचेविरुध्द माता रमाबाई आंबेडकर मार्ग, पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १४/१३, कलम ४६५,४६६,४६८,४७१,४२०,३४ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून नमूद अरोपीसह एकूण सहा घुसखोर बांगलादेशी नागरिक व त्यांना आश्रय देणाऱ्या भारतीय नागरिकाला अटक करण्यात आली आहे.

अवैध बांगलादेशी नागरिकांचा शोध घेण्यासाठी पोलीस यंत्रणा राज्यभर कार्यरत असून अधिकचा तपास सुरू आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नामध्ये मी जे दोन महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले होते त्या प्रश्नांना प्रशासनाने उत्तरे दिलेली नाहीत. या प्रश्नाला असे लेखी उत्तर दिले आहे की, "एक घुसखोर बांगलादेशी नागरिक कबीर रबीऊल इस्लाम याच्याकडे आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र इत्यादी कागदपत्रे सापडली." तसेच पुढे असेही लेखी उत्तर देण्यात आले की, मोंटी नामक भारतीय एजंटकडून अडीच हजाराच्या मोबदल्यामध्ये गझना ग्रामपंचायतीचे वास्तव्याचे बनावट प्रमाणपत्र मिळाले आहे. महोदय, प्रश्न क्रमांक-4 मध्ये, आतापर्यंत किती लोकांना अशा खोट्या कागदपत्रांच्या आधारे पॅन कार्ड, आधार कार्ड व निवडणूक ओळखपत्र देण्यात आलेली आहेत, असे विचारले होते. परंतु मोंटी नामक व्यक्तीने आतापर्यंत किती लोकांना बनावट ओळखपत्रे दिली आहेत याचे उत्तर दिलेले नाही. प्रश्न क्रमांक-6 मध्ये अशा प्रकारे बनावट ओळखपत्र देणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, असे विचारले होते. परंतु लेखी उत्तरामध्ये एकूण सहा घुसखोर बांगलादेशी नागरिक व त्यांना आश्रय देणाऱ्या भारतीय नागरिकाला अटक करण्यात आल्याचे नमूद केले आहे.

महोदय, या प्रकरणी मोंटी नामक एजंटवर आणि बनावट ओळखपत्रे देणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, गेल्या तीन वर्षात 'आय' शाखेने असे किती बांगलदेशी घुसखोर पकडले आहेत ? महोदय, माझ्याकडे 2005 मध्ये केलेली एक तक्रार आहे. ती मी आपल्यासमोर ठेवतो. बांगलादेशी नागरिकांनी वस्ती वसविल्याबाबतची ती तक्रार आहे. परंतु बांद्रा पोलिसांनी 2005 पासून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अजून पर्यंत त्या प्रकरणी कारवाई केलेली नाही. त्यांच्यावर मंत्री महोदय कारवाई करणार काय ?



ता.प्र.क्र.38024....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन उप प्रश्न विचारावयास पाहिजे होते. मी त्यांना सांगू इच्छितो की, 2009 मध्ये 1870 बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली व 1059 नागरिकांना हद्दपार करण्यात आले. 2010 मध्ये 1458 बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली व 892 नागरिकांना हद्दपार करण्यात आले. 2011 मध्ये 1560 बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली व 342 नागरिकांना हद्दपार करण्यात आले. गेल्या वर्षी विशेष मोहीम राबविल्यामुळे आणि 'आय' शाखने विशेष काम केल्यमुळे 2234 बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आणि आतापर्यंत 569 नागरिकांना हद्दपार करण्यात आले. या वर्षी ही मोहीम आणखी गतिमान करण्यास सांगितलेले आहे. फेब्रुवारी अखेर 576 बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेऊन, 147 लोकांना अटक करण्यात आली. ताब्यात घेतलेल्या नागरिकांना त्यांच्या देशात पाठविण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करण्यास वेळ लागतो. म्हणून काही लोक पोलिसांच्या ताब्यात आहेत. अशा प्रकारे ज्या ज्या ठिकाणी बांगलादेशी नागरिक सापडले त्या त्या ठिकाणी पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केली आहे.

बांगलादेशी नागरिकांकडे पॅन कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना आणि इतर आवश्यक कागदपत्रे असतात. ही कागदपत्रे देणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय करवाई करणार आहात, असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, या बाबतची सर्व माहिती घेतल्यानंतर विभागाने माझ्या लक्षात आणून दिले की, पश्चिम बंगालमधून एखाद्या ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र आणून संबंधित व्यक्ती आमच्या ग्रामपंचायतीतील रहिवाशी असल्याचे भासविले जाते. शिवाय त्या ठिकाणी त्या व्यक्तीचे मतदार यादीमध्ये सुध्दा नाव नोंदविलेले असते. त्या कागदपत्रांच्या आधारे त्या व्यक्तीला देशाचा नागरिक म्हणून वाहन परवाना, पॅन कार्ड किंवा अन्य कागदपत्रे दिल्यानंतर ती व्यक्ती जवळजवळ आपल्या देशाचा नागरिक होते.

पश्चिम बंगालमधील एखाद्या ग्रामपंचायतीच्या सरपंचाने रहिवासी प्रमाणपत्र दिले तर एकप्रकारे त्या व्यक्तीला देशाचे नागरिकत्व बहाल होते. मुळात असे करणे चुकीचे आहे. या पुढील काळात पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, रेशन कार्ड इ. ओळखपत्रे वा इतर कागदपत्रे देताना सरपंचाचा दाखला सादर केला तर आम्ही तो ग्राह्य मानू...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38024.... श्री. आर.आर.पाटील ....

परंतु तो दाखला योग्य आहे का हे व्हेरिफाय केल्यानंतर मगच पुढची कार्यवाही केली जावी आणि आधार कार्ड, पॅन कार्ड या सर्व गोष्टी द्याव्यात असे सर्व यंत्रणांना कळविण्यात येईल. केवळ एखाद्या दाखल्याच्या आधारे त्यांना या देशाचे नागरिक आहोत असा दावा करता येणार नाही अशा पध्दतीच्या दुरुस्त्या करण्यात येतील आणि या संदर्भात परिपत्रक काढून ज्या संबंधित एजन्सीज आहेत त्यांना सक्त सूचना देण्यात येतील की, जरी त्यांनी डॉक्युमेंट्स दिले तरी पुढची कार्यवाही सुरु करावी परंतु अंतिम दाखला देण्यापूर्वी दिलेले सर्टिफिकेट खरे आहे का हे व्हेरीफाय करा अशा पध्दतीच्या सूचना देण्यात येतील.

सभापती महोदय, या प्रश्नातील घटनेमध्ये त्यांनी तेथील आधार कार्डाच्या आधारे आणि ग्रामपंचायतीच्या दाखल्याच्या आधारे पुढची कार्यवाही केलेली आहे. काही वेळा बोनाफाईडली तेथील दाखले आणि सर्टिफिकेट बघून येथील कर्मचाऱ्यांनी जर निर्णय घेतला असेल तर आपल्याला कारवाई करता येत नाही. परंतु यामध्ये कमी दरात मजूर पुरवण्यासाठी काही एजन्सीज काम करीत असतील, कमी दरामध्ये काम करणारे हे मजूर बांगलादेशी आहेत असे माहीत असताना मालक त्याकडे दुर्लक्ष करणार असतील तर वेळप्रसंगी त्या आस्थापनेचा परवाना सुदा रद्द करता येईल का, त्या हॉटेलचे सुध्दा लायसन्स रद्द करता येईल का ही बाब तपासून पाहण्यात येईल. यामध्ये जे एजंट आहेत ते सर्व यंत्रणांना मिसलिड करीत आहेत आणि जे या देशाचे नागरिक नाहीत त्यांना या देशाचे नाकरिक ठरविण्याच्या कामामध्ये मदत करीत आहेत त्या एजंटवर सुध्दा कारवाई करण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, विशेष शाखा क्रमांक 1 यांच्याकडे हे काम दिले आहे. विशेष शाखा क्रमांक 1 कडे बांगलादेशी नागरिक शोधून काढण्याइतका स्टाफ आहे का ? जर नसेल तर त्या बाबतीत शासन काही उपाययोजना करणार आहे का ? बांधकाम व्यवसायामध्ये काही बिल्डरकडून बाहेरुन या एजन्सीमार्फत मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी कामगार आणले जात आहेत. असे जे बिल्डर्स असतील त्यांच्यावर आणि कामगार पुरवठा करणाऱ्या एजन्सीजवर ठोस कारवाई करण्यासाठी शासन प्रतिबंधात्मक उपाय योजणार आहे का ?

..2...

RDB/ KTG/ D/

ता. प्र. क्र. 38024 .....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आय शाखेमध्ये कर्मचारी कमी आहेत ही गोष्ट खरी आहे. तरी सुध्दा आम्ही कर्मचारी वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकंदरीत ही घुसखोरी पाहता या विंगमध्ये आणखी कर्मचारी वाढवावयाचे असतील तर ही एक विशेष आणि महत्वाची शाखा असल्यामुळे त्या विभागाच्या मागणीप्रमाणे या विंगसाठी मनुष्यबळ वाढवून देण्यात येईल. ज्या कंत्राटदाराकडे हे लोक काम करणार आहेत, ज्या बिल्डरकडे लोक काम करणार आहेत, ज्या हॉटेल आस्थापनेकडे मजूर म्हणून काम करणार आहेत त्या मालकांची सुध्दा शहानिशा करण्याची जबाबदारी आहे. म्हणून या पुढच्या काळामध्ये जर असे लोक आढळून आले आणि त्या ठिकाणी मालकाचा किंवा काम देणाऱ्याचा निष्काळजीपणा असेल किंवा माहीत असताना जाणूनबुजून कृत्य केले असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदय, आपण बांगलादेशींच्या बाबतीत उत्तर देत असताना कोठे 15, कोठे 5 कोठे 2 संख्या असल्याचे उत्तर देत होता. राज्यसभेमध्ये सन्माननीय खासदार श्री. संजय राऊत यांच्या प्रश्नाला उत्तर देत असताना या देशामध्ये 3 कोटी बांगलादेशी आलेले आहेत आणि त्यापैकी मुंबई आणि नवी मुंबईमध्ये 75 लाख बांगलादेशी असल्याचे नमूद केले असेल आणि मुंबई आणि नवी मुंबईमध्ये जर 75 लाख बांगलदेशींची घुसखोरी झाली असेल तर आपण जी कारवाई सांगितली त्यामध्ये एवढ्या मोठ्या संख्येने घुसलेले बांगलादेशी, खासकरुन उपनगरांमध्ये आणि नवी मुंबईच्या बाजूला त्यांच्या मशिदीसह सर्व झोपडपट्ट्या उभ्या राहात आहेत त्यासाठी एवढी मोठी मोहीम राबविण्याकरिता शासन कोणती यंत्रणा उभी करणार आहे ?

हा परकीय नागरिकांचा प्रश्न आहे. कालपरवा आलेल्या बातमीनुसार 600 पाकिस्तानी व्हिसा घेऊन आले आणि व्हिसा संपल्यानंतर ते परत गेलेले नाहीत असे निदर्शनास आले आहे. त्यांचाही शोध लावणार का ? कारण एकच शाखा शोध लावणार असेल तर त्यांच्यावर किती मोठी जबाबदारी असणार आहे ? या ठिकाणी देशविघातक प्रश्न निर्माण होत आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी विचारल्याप्रमाणे शासन या संदर्भात कोणत्या पध्दतीने पोलीस यंत्रणा उभी करणार ? कारण हा गंभीर प्रश्न आहे. मोठ्या संख्येने बांगलादेशी घुसले असतील तर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38024........

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, बांगलोदशी व पाकिस्तान या देशांमधून जे नागरिक घुसखोरी करुन आलेले असतील किंवा व्हिसा संपल्यानंतरही ते देशात राहत असतील तर त्यांना ताब्यात घेऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन त्यांना डेप्यूट करुन मूळ देशामध्ये परत पाठविण्यासाठी आय शाखा कार्यरत आहे. या शाखेबरोबरच इन्टेलिजन्स विभाग, स्थानिक पोलीस स्टेशन्स या सर्वांची ही जबाबदारी आहे. असे नागरिक आढळले तर त्यांना ताब्यात घेऊन त्यांना परत पाठविणे ही पोलीस दलाची जबाबदारी आहे. हे काम सर्वजण मिळून करतात. काही ठिकाणी स्थानिक पोलीस स्टेशन काम करतात, काही ठिकाणी आय शाखा काम करते. आय शाखा विशेषत: या कामासाठी निर्माण केलेली आहे. या शाखेला आवश्यक असलेले मनुष्यबळ वाढवून दिले जाईल. मुंबई किंवा नवी मुंबईत 75 लाख बांगलादेशी नागरिक आहेत असे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी म्हटले आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येमध्ये बांगलादेशी नागरिकांची एवढी मोठी संख्या वाढली आहे असे बोलणे ही अतिशयोक्ती होईल. कारण त्याची गणना झालेली नाही. पोलिसांनी जेवढ्या लोकांवर कारवाई केलेली आहे त्यापेक्षा त्यांची संख्या जास्त असण्याची शक्यता आहे ते मी नाकारत नाही. एवढ्या मोठ्या संख्येने असल्याचे ते मान्य करणे शक्य नाही. तथापि, याबाबतीतील मोहीम तीव्र केलेली आहे आणि शासनाची हीच भूमिका राहील.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या विषयावर मागील आठवड्यात या सभागृहात वेगवेगळ्या माध्यमातून बरीच चर्चा झालेली आहे. त्यावेळी देखील सन्माननीय गृह मंत्र्यांनी सविस्तर व प्रामाणिकपणे उत्तरही दिलेले आहे. तरी देखील त्यांना मला एक प्रश्न विचारावासा वाटतो की, चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना शासनाकडून प्रोत्साहन दिले जाते. तेव्हा अशा पॉकेटमध्ये अशा घटना घडतात ज्या अधिकाऱ्यांची लॅक्सिटी इन ड्युटी आहे त्यांना डिटरन्ट पनिशमेंट करण्याबाबत शासन विचार करणार काय, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यासाठी पाऊल उचलले जाईल काय व त्याबाबत शासनाची योजना आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधानसभेच्या सभागृहामध्ये या विषयासंबंधी मी उत्तर दिले होते. ते वर्तमानपत्रात देखील छापून आले होते. पॅन कार्ड, रेशन कार्ड, निवासाचा

2...

दाखला देत असताना जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन परकीय नागरिकांना या सर्व गोष्टी उपलब्ध करुन दिल्या असतील तर संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द प्रशासकीय कारवाई केली जाईलच, परंतु जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले म्हणून सिध्द झाले तर गुन्हेगार म्हणून त्यांच्याविरुध्द गुन्ह्याची नोंद केली जाईल. एका बाजूला अशी कारवाई केली जाईल त्याचबरोबर आय शाखेमध्ये जे कर्मचारी चांगले कामगिरी करतील त्यांना प्रोत्साहन देणारी किंवा बक्षिस देणारी योजना शासनाकडून निश्चितपणे तयार केली जाईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय,.....

**उप सभापती** : मला वाटते की, आपण पुढील प्रश्नावर गेले पाहिजे. कारण या प्रश्नाला मी 13 मिनिटांचा वेळ दिलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, बांगलादेशी नागरिकांचा गंभीर प्रश्न आहे. शासनाकडून त्या नागरिकांवर कारवाई केली जाईल असे नेहमी सांगितले जाते, परंतु त्या नागरिकांविरुध्द कारवाई केली जात नाही. त्यांना परवाने, रेशनकार्ड देणाऱ्यांविरुध्द, कोणावरही कारवाई केली जात नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी तीन बांगलादेशी नागरिकांबाबत 2005 साली तक्रार केली आहे. त्या नागरिकांची चौकशी करुनही ज्या अधिकाऱ्यांनी त्यांना अटक केली नाही त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे का ? या लोकांना स्थानिक आमदारांचा पाठिंबा आहे. यामध्ये अनधिकृत झोपड्या बांधा आणि मतदारांची संख्या वाढवून निवडणूक जिंका हा एकच उद्देश दिसतो. त्या तीन बांगलादेशी नागरिकांविरुध्द कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द शासन जाब विचारणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : होय.

श्री.मुझफ्फर हुसेन : बांगलादेशी नागरिकांचा प्रश्न महाराष्ट्रात खूप दिवसांपासून सुरु आहे आणि तो राहणार आहे असे दिसते. हे लोक कमी पैशामध्ये काम करण्यासाठी येथे येत असतात. ते लोक विमानाने येत नाहीत. ते रेल्वेने व रोडने राज्यात प्रवेश करतात. त्यामुळे रेल्वे पोलिसांची यासाठी मदत घेऊन उपाययोजना केली जाईल काय ?

नंतर श्री.शिगम

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.38024... श्री. मुझफ्फर हुसेन...

जे रोडचे एण्ट्री पॉईण्टस आहेत त्याठिकाणी चेक पॉईण्टस् ठेवले तर बस मधून येणा-या बांगलादेशी नागरिकांना महाराष्ट्राच्या बॉर्डरवर थांबविता येईल. म्हणून अशा पध्दतीची कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : कोणत्या बॉर्डर सील करायच्या आणि कोणत्य बॉर्डरवर तपास करायचा याच्या सूचना सन्माननीय सदस्यांनी दिल्या तर त्याचा आम्ही जरुर अभ्यास करु.

श्री. मुझफ्फर हुसेन : बांगलादेशी नागरिकांच्या संदर्भात आपण या ठिकाणी चर्चा करीत आहोत. कोणत्या बॉर्डर तपासायच्या हे पोलिसांनी आणि शासनाने ठरवायचे आहे.

श्री. आर.आर.पाटील : प्रस्थापित पध्दती प्रमाणे आम्ही रल्वेतून येणारे, रस्त्याने येणारे लोक चेक करतो. तरीही लोक येतात. त्याची अनेक कारणे आहेत. साधारण: पश्चिम बंगालमधील लोकांची भाषा सारखी आहे, त्यांचा रंग देखील सारखा आहे. त्यांच्याकडे आधारकार्ड, पश्चिम बंगालचे रेशनकार्ड, सरपंचाचा दाखला असतो. ते येथपर्यंत आल्यानंतर त्यांची शहानिशा न करता त्यांना ताब्यात घेतले आणि तपासले तर आम्ही या देशाचे नागरिक असताना आम्हाला तपासले जाते अशा प्रकारचा आक्षेप पोलिसांवर होतो. आम्ही या बाबतीत केंद्र सरकारला लिहिलेले आहे की देशात आल्यानंतर तपासणीची सर्व पक्रिया पूर्ण करायला वेळ लागतो. बांगला देशातील गरिबीमुळे मोठ्य प्रमाणात लोक आपल्या देशात येतात. म्हणून सीमेवरच थांना थांबवावे. आपल्या सीमा फार पोरस आहेत. भौगोलिक सीमा नसल्यामुळे काही गावे अगदी जवळ आहेत. आमच्या अधिका-यांची देखील तेथे एक टीम पाठविली होती. काही नागरिक असे आहेत की ते भारतात राहातात पण त्यांच्या जमिनी बांगला देशात आहेत. काही जणांची दोन घरे अशी आहेत की रस्त्याच्या अलीकडील घर भारतात तर पलीकडील घर बांगला देशामध्ये आहे. अशा प्रकारची वास्तवता आहे. भाषा, दाखले, पुरावे या गोष्टी व्हेरिफाय कराव्या लागतात. म्हणून यामध्ये अडचणी येतात.

श्री. विनायक राऊत : मुंबई आणि मुंबईच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये बांगलादेशींची वस्ती पोलिसांनी आयडेण्टिफाय केलेली आहे काय ? महाराष्ट्रामध्ये विशेषत: मुंबईमध्ये कोणकोणत्या ठिकाणी बांगलादेशी नागरिक राहातात याची माहिती शासनाकडे आहे काय ? भाईंदरमधील एका झोपडपट्टीला बांगलादेशीय असे नाव दिलेले आहे. बांगलादेशी नागरिक पश्चिम बंगालचा आधार





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

घेऊन भारतामध्ये येतात हे एक वेळ समजू शकतो. परंतु जेव्हा अधिकारी "बांगलादेश झोपडपट्टी" असे लिहितात त्यावेळी त्या अधिका-यावर कारवाई करणे आवश्यक आहे. मुंबईसहीत महाराष्ट्रामध्ये कोणकोणत्या ठिकाणी बांगलादेशी नागरिक राहातात याची माहिती पोलिसांना आहे. मीरा-भाईंदरमध्ये ज्या अधिका-याने आधार कार्ड आणि रेशन कार्डावर बांगलादेश झोपडपट्टी असे लिहिलेले आहे त्या अधिका-यावर कोणती कारवाई केलेली आहे ?

श्री. आर.आर.पाटील : या घटनेची मी माहिती घेईन. मी जर सारखी कारवाई करायला लागलो तर तुम्ही आणि मीच राहू...

श्री. प्रकाश बिनसाळे : मध्यंतरीच्या काळामध्ये गेटवे येथून बोटीच्या माध्यमातून काही मंडळी मुंबईमध्ये आली आणि त्यांनी मुंबईत कसा हैदोस घातला हे आपणा सर्वांना माहीत आहे. परवा दिनांक 7.3.2013 रोजी दुपारी 1.00 वाजता लविनिया नावाची एक यॉट जी झेक रिपब्लिकनमध्ये रजिस्टर झालेली आहे ती गेटवे येथील समुद्र किनारी आली आणि त्यामधून ती फॉरिनर व्यक्ती मुंबईच्या जमिनीवर उतरली. त्या व्यक्तीकडे कोणताही इमिग्रेशन परवाना नव्हता. अशा प्रकारच्या ज्या घटना पूर्वी घडलेल्या आहे त्यामधून धडा घेतला पाहिजे. हा किनारपट्टीचा भाग पोरस आहे. गेटवे येथून बोटीने जाताना तपासणी होते. परंतु त्याठिकाणी एखादा प्रवासी आला तर त्याची कोणतीही तपासणी होत नाही अशा प्रकारची सुरक्षा यंत्रणा गेटवे परिसरामध्ये आहे. यॉटने फॉरिनर्स मुंबईमध्ये येणे ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे पर्यटनामध्ये वाढ होईल आणि स्थानिक लोकांना रोजगार मिळेल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38024.... श्री.प्रकाश बिनसाळे...

याच्या रेग्युलेशनसाठी शासन काही पुढाकार घेणार आहे काय ? यामध्ये डी.जी.शिपींग अशा अनेक संस्थांचा यामध्ये समावेश आहे. या बाबतीत शासनाचे धोरण काय रहाणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : ज्यावेळी परकीय नागरिक समुद्रामार्ग येतात, समुद्रमार्गावर आपल्या अनेक एजन्सीज काम करीत असतात. नेव्ही, कस्टम गार्ड, कोस्टल गार्ड व पोलीस हे समुद्रमार्गे येणाऱ्यांची तपासणी करीत असतात. समुद्रमार्ग ते लोक कशा पध्दतीने आले या घटनेची पूर्णपणे माहिती घेण्यात येईल आणि योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**धुळे शहरातील मच्छीबाजार व माधवपुरा येथे दोन जमावात झालेली दंगल**

**(२) * ३७८५८ श्री.दिवाकर रावते, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.एम.एम.शेख, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.विनायक राऊत, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, श्री.विनायकराव मेटे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.माणिकराव ठाकरे, श्रीमती अलका देसाई, श्री. शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, प्रा.सुरेश नवले, ॲड.जयदेव गायकवाड, डॉ. अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील मच्छीबाजार व माधवपुरा भागात दोन जमावात दिनांक ६ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास झालेल्या दंगलीत २० पोलिसांसह १७५ व्यक्ती जखमी झाल्या असून पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ४ व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दंगलग्रस्तांनी मच्छीबाजार व माधवपूरा भागातील पोलिस चौकी व घरे सिलेंडरचा स्फोट करुन जाळली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दंगल होण्याची कारणे काय आहेत, तसेच या दंगलीत किती जीवित व वित्त हानी झाली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, त्यात काय आढळून व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच पोलिसांच्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना किती आर्थिक मदत करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) तसेच धुळे शहरात कायमस्वरुपी शांतता रहावी यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) धुळे शहरामध्ये दिनांक ६ जानेवारी, २०१३ रोजी मच्छीबाजार व माधवपुरा या भागात झालेल्या जातीय दंगलीत १७ पोलीस अधिकारी व ११२ पोलीस कर्मचारी जखमी झाले असून ९८ नागरिक जखमी झाले आहेत. पोलीस गोळीबारात एकूण ६ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(२) घरांना आगी लावण्यासाठी गॅस सिलेंडरचा स्फोट करण्यात आला आहे किंवा कसे याचा तपास चालू आहे.

(३) सदर दंगल ही एका खाद्य पदार्थाच्या हॉटेलमध्ये घडलेल्या बिल देण्याघेण्याच्या वादावादीतून घडल्याचे दिसून आले आहे सदर दंगलीत ६ नागरिक मृत्युमुखी पडले असून रुपये १,३९,०३,९५०/- इतकी वित्तहानी झाली आहे.

(४) होय.

(५) चौकशीदरम्यान एकूण ६ गुन्हे दाखल झाले आहेत. एकूण २४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.दोन गुन्ह्यांचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडून करण्यात येत आहे. तसेच पोलीस गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी रुपये ५ लाख मदत देण्यात आली आहे.

(६) धुळे शहरात कायमस्वरुपी शांतता रहावी यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:- (१) आझाद नगर पोलीस स्टेशनचे विभाजन करुन चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन निर्माण करण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे. (२) पोलीस स्टेशन आझाद नगर हद्दीतील सर्व पोलीस चौक्यांमध्ये दोन पोलीस उपनिरीक्षक, किमान १० पोलीस कर्मचारी यांची कायमस्वरुपी नियुक्ती करण्यात आली आहे.(३) सर्व चौक्या २४ तास कार्यान्वित राहतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे.(४) संपुर्ण जिल्ह्यात एकूण ९१ पोलीस मित्र समित्या कार्यरत आहेत. पोलीस मित्र समितीच्या माध्यमातून तरुण वर्गामध्ये विश्वासाचे व सामंजस्याचे वातावरण निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : धुळे शहरात जी दंगल झाली, ती क्षुल्लक कारणावरुन झाली असे दाखविले जाते. दहा मिनिटाच्या बाचाबाची नंतर हजारो मुस्लीम तलावारी, शस्त्रास्त्रे, एअरगन, गोफण, ॲसीड, दगड इत्यादी वस्तू घेऊन रत्यावर उतरले. ही दंगल पूर्वनियोजित होती याची शासनाने शहानिशा केली आहे काय ? त्या संपूर्ण भागामध्ये ओवेसीच्या भाषणाची कॅसेट मोबाईल व्हॅनव्दारे लोकांना ऐकविण्यात येत होती. यापुढे पोलिसांनाच लक्ष्य करावयाचे असा त्यामागचा उद्देश होता. ओवेसी यांच्या भाषणामुळे दंगल निर्माण झाली अशा प्रकारची तिकडची परिस्थिती

४...


असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही
ABG/ KTG/ D/ प्रथम श्री. शिगम ११:२०

होती. जिल्हाधिकाऱ्यांनी अशा तऱ्हेने तपास करण्यासंदर्भात पोलिसांना निर्देश देण्यात आले आहेत हे खरे आहेत काय आणि त्या दृष्टीने शासनाने तपास केला आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : ही घटना त्या ॲंगलने तपासून बघतो आहे. मी आपल्याला माहितीसाठी सांगू इच्छितो की, एका भाषणामुळे दंगल झाली काय हा देखील तपासाचा भाग आहे. हे भाषण होण्यापूर्वी धुळे शहरातील परिस्थिती बघितली तर १८९५ पासून सातत्याने त्या शहरामध्ये दंगली झालेल्या आहेत. आतापर्यंत जो तपास झाला आहे, तो तपास बघितल्या नंतर क्षणिक कारणामुळे या दंगलीने एवढे उग्र स्वरुप घेतले हीच माहिती आतापर्यंत पुढे आलेली आहे. या दंगलीची सखोल चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती मालते यांच्या नेतृत्वाखाली न्यायालयीन चौकशी सरकारने घोषित केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा सांगितला आह, त्या ॲंगलने ताही मुद्दा तपासून बघण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : या प्रश्नाला पहिल्या प्रश्नाला जे उत्तर दिले आहे त्या संदर्भात माझा आक्षेप आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय गृहमंत्र्यांनी जे उत्तर दिले आहे ते पाहता या घटने बाबत चौकशी आयोग नेमलेला असून त्यांचा अहवाल यावयाचा आहे. तो येण्याच्या आधीच या उत्तरात असे म्हटले आहे की, "जातीय दंगल" झाली. सदर दंगल झाल्यानंतर मी धुळे शहरास भेट देऊन आलो आहे. ती जातीय दंगल नव्हती. धुळे शहरातील हिंदू आणि मुस्लीम बंधूंचे अभिनंदन केले पाहिजे की, त्यांनी सदर दंगल बाजाराच्या पलिकडे पसरु दिली नाही. मी धुळे शहरातील दोन्ही समाजाच्या अनेक लोकांशी बोललो. कोठेही जातीय तणाव नव्हता. या उत्तरात जो निष्कर्ष काढला आहे तो मागे घेतला पाहिजे.

महोदय,राज्यामध्ये जेथे अशा प्रकारच्या दंगली होतात तेथे आपण जिल्हाधिकारी आणि अधीक्षक या दोघांनाच दंगलीसाठी जबाबदार धरण्यासाठी कायदेशीर तरतूद करणार काय हा प्रश्न मी जबाबदारीने विचारतो आहे. याचे कारण असे आहे की, धुळे दंगलीची व्हीडीओ क्लिपींग उपलब्ध आहे. त्या ठिकाणी पोलीस उघडपणे घरे जाळत आहेत, घरांवर दगड फेकत आहेत आणि दंगेखोराना आत पाठवत आहेत. मी स्वत: ती व्हीडीओ क्लिपींग पाहिली आहे? धुळे शहरातील

५...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डी.वाय.एस.पी. या दंगलीमध्ये दिसतो आहे. त्या बाबतीत काय कार्यवाही केली जाणार आहे, पोलिसांमध्ये जातीयकरण सुरु झालेले आहे, ते कसे रोखणार? या दंगलीमध्ये अनेक निरपराध कुटुंबे होरपळली आहेत, अनेकांची घरे उद्ध्वस्त झाली.

त्या ठिकाणच्या मच्छीबाजारमध्ये श्री.मेहबूब शेख नावाचा राष्ट्रसेवा दलाचा कार्यकर्ता आहे, तो अत्यंत सेक्युलर कार्यकर्ता आहे. हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी झगडणारा कार्यकर्ता आहे. त्याचे संपूर्ण घर बेचिराख करण्यात आले. या दंगलीमध्ये अशी जी जी घरे बेचिराख करण्यात आली, त्यांचे पुनर्वसन कसे करणार आहात ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ गितेनंतर 11:25

ता.प्र.क्र.37858......... श्री.कपिल पाटील.........

नायब तहसीलदाराच्या मुलाचा काही दोष नव्हता, तो केवळ बाजारात गेला होता. त्याची कोणतीही पूर्वपीठिका नाही. तो सुध्दा या दंगलीत गोळी लागून मेला. याचा अर्थ पोलिसांनी जाणीवपूर्वक गोळीबार केला. या गोळीबाराची चौकशी करणार आहात काय?

श्री.आर.आर.पाटील : न्यायमूर्तींची चौकशी नेमण्यात आली आहे, त्यांच्याकडून सगळ्याच गोष्टींची चौकशी होत असते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, तोपर्यंत मंत्री महोदयांनी उत्तर मागे घेतले पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : स्थानिक पोलिसांनी केलेल्या तपासाचा निष्कर्ष सांगितल्यानंतर सरकारने घोषित केल्याप्रमाणे न्यायमूर्तीमार्फत चौकशी करण्याचे जाहीर केले. सीआयडी तपासात जी माहिती पुढे आली ती लपवून न ठेवता मी सभागृहासमोर मांडली आहे. उत्तर मागे घेण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. पोलीस कर्मचाऱ्यांबद्दल प्रश्न उपस्थित केला त्याबाबत एवढेच सांगतो की, एका बाजूने पोलीस मोठ्या प्रमाणात जखमी होत होते. अशा वेळी पोलिसांनी गैरकृत्य केले त्यांना सरकारने मोकळे सोडलेले नाही. आतापर्यंत सहा पोलीस कर्मचारी दोषी आढळले, कोणाकडून मागणी येण्यापूर्वी, प्रश्न उपस्थित करण्यापूर्वी, नागरिकांनी मागणी करण्यापूर्वी या सहा पोलीस कर्मचाऱ्यांना चुकीचे वागल्याबद्दल ताबडतोब सस्पेंड केले आहे. फक्त सस्पेंड केले असे नव्हे तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची भूमिका सरकारने घेतली. चुकलेल्या पोलिसांना पाठीशी घालण्याची सरकारची भूमिका नव्हती. त्याचबरोबर या दंगलीमध्ये एका बाजूला पोलीस दुकाने फोडताना, मोटार सायकली तोडताना दिसतात त्याचप्रमाणे सगळ्या क्लिपिंग बघितल्यानंतर मोठया प्रमाणात पोलीस या घटनेमध्ये जखमी झालेले आहेत, असे दिसून आलेले आहे.

सभापती महोदय, जे पोलीस चुका करताना दिसतात त्यांना सरकारने मोकळे सोडलेले नाही. त्याचबरोबर दगडफेक केल्यामुळे पोलीस खाली जमिनीवर पडताना, जखमी होताना दिसत आहेत हे क्लिपिंगमध्ये चित्रित झालेले आहे. संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. हे सगळे मुद्दे आपण बारकाईने बघण्याची गरज आहे. वेळ पाहिली तर पहिल्यांदा पोलीस मोठया प्रमाणात जखमी झाले, त्यानंतर जाळपोळ झाली. या घटनेला जातीय दंगल म्हणायचे नसेल तर पर्यायी नाव सुचवावे. आम्ही दंगल म्हणणार नाही. बिल देण्याघेण्याच्या वादाबाबत तक्रार आली आणि दोन्ही बाजूने हजारोंच्या संख्येने जमाव एकमेकावर हल्ला करु लागला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37858.........

ॲड.आशिष शेलार : ही जातीय दंगल नव्हती.

श्री.आर.आर.पाटील : यापुढे फक्त दंगल म्हणू. मला मान्य आहे. यापुढे अशा घटनेला 'जातीय दंगल' असे न म्हणता केवळ 'दंगल' असा उल्लेख करु.

श्री.कपिल पाटील : 'जातीय' हा शब्द मागे घ्यावा.

**उप सभापती** : मंत्री महोदय उत्तर देत असताना माननीय सदस्यांनी हरकत घेऊ नये. मंत्री महोदयांनी उत्तर मागे घ्यावे, असे माननीय सदस्यांना म्हणता येणार नाही.

श्री.आर.आर.पाटील : आतापर्यंतच्या तपासातून जो निष्कर्ष पुढे आला आहे त्यापासून मी मागे जाऊ शकत नाही. जे लोक चुकले आहेत त्यात नागरिक असतील किंवा पोलीस असतील त्या सगळ्यांवर सरकार कारवाई करणार आहे.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, हैद्राबाद ते मालेगाव, धुळे, नांदेड या ठिकाणी जातीयवादी भाषणे करण्याचे काम आंध्रप्रदेशातील एमआयएम पक्षाच्या लोकप्रतिनिधींकडून केले जात आहे. त्यांच्या भाषणाची टेप मागवून घ्यावी व त्याची तपासणी करावी अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो. जातीयवादी व प्रक्षोभक भाषणे केली जात असल्याबद्दल एमआयएम या संघटनेवर बंदी घालण्यात येईल काय? एमआयएम संघटनेच्या काही लोकांनी महाराष्ट्राच्या विधानसभेवर हिरवा झेंडा फडकविण्यासाठी मोबाईलच्या माध्यमातून क्लिप्स पाठविल्या आहेत, हे कितपत योग्य आहे?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हैद्राबादमध्ये काम करणारा एमआयएम नावाचा राजकीय पक्ष आहे.

नंतर जी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :37858** ......

श्री. आर.आर.पाटील .......

परंतु त्यांनी महाराष्ट्रात येऊन प्रक्षोभक वातावरण तयार करु नये म्हणून यासाठी आम्ही निर्णय घेतलेला आहे. औरंगाबाद येथे यांसदर्भात निर्णय झाला असून यासंदर्भात ते कोर्टात गेले असून कोर्टात केस सुरु आहे. महाराष्ट्रात येऊन प्रक्षोभक वक्तव्य करणे राज्याच्या हिताचे नाही, वेगवेगळी वक्तव्ये करुन लोकांमध्ये तणाव निर्माण करणे तसेच संघर्ष निर्माण करणारी वक्तव्ये महाराष्ट्रात सहन केली जाण्ार नाहीत. यासंदर्भात जशी ओवेसीच्या बाबतीत भूमिका घेतली आहे तशीच भूमिका तोगडीया यांच्या बाबतीत देखील राज्य शासनाने भूमिका घेतलेली आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय,एमआयएमशी युती करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे काय ?

**उप सभापती** : मी आपल्याला प्रश्न विचारण्याची परवानगी दिलेली नाही. आता सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी प्रश्न विचारावा.

श्री. हेमंत टकले :सभापती महोदय, धुळे येथे जी दंगल झाली त्या दंगलीला काहीच नाव नाही. ही दंगल बील देण्याच्या छोटयाशा कारणावरुन झालेली आहे. प्रश्न असा आहे की, दंगलीसाठी उद्युक्त असलेला जमाव दंगल घडवण्यासाठी क्षुल्लक घटनेची वाट बघत असते. धुळे दंगलीच्या संदर्भात त्या ठिकाणचे जिल्हाधिकारी तसेच पोलीस प्रमुख या दोघांचे अहवाल आपल्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्या दंगलीची वास्तवता काय होती, त्यामध्ये पोलिसांचे वर्तन कशा प्रकारे झाले याची माहिती येईल. वर्तमान पत्रात आलेल्या माहिती प्रमाणे मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून जी मदत दिली जाणार होती त्यासंदर्भातील शिफारस जिल्हाधिकाऱ्यांनी केली नव्हती उलट ही मदत दुसऱ्यांनाच देण्यात आली. महाराष्ट्रामध्ये काही प्रमुख ठिकाणी जातीवाचक भावना भडकवण्याची कामे सुरु होतात तेव्हा राज्यामध्ये अशा प्रकारचे नवे सेन्सेटीव्ह स्पॉट तयार होत असतात. त्यामुळे यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागवार सुधारणा करुन, पोलीस अधिकाऱ्यांची अधिकची नेमणूक करुन असे प्रसंग पुन्हा घडणार नाही यादृष्टीने उपाययोजना केली जाणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :37858** ......

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय,धुळे शहरामध्ये विशेषत: 1895,1989 अशा अनेक दंगली झालेल्या आहेत. या संदर्भात धुळे शहरामध्ये ज्या उपाययोजना केलेल्या आहेत त्या तोकडया पडल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे धुळे शहरातील जो मच्छीपुरा भाग आहे त्या ठिकाणी आणखी एका पोलीस स्टेशनची व अधिक मनुष्यबळ देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन त्या ठिकाणी आणखी एक पोलीस स्टेशन देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

--------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील रक्तपेढया रक्ताची तस्करी करीत असल्याबाबत**

**(३) * ३७८०९ श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.संजय दत्त, श्री.मोहन जोशी, श्री.एम.एम.शेख, श्री.सुभाष चव्हाण, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे :** सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथून रक्त पिशव्या घेऊन मुंबईकडे जाणाऱ्या गाडीला माहे डिसेंबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान अपघात झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सार्वजनिक मंडळे व विविध संस्थामार्फत रक्तदान शिबिरे घेऊन शिबिरातून संकलित केलेले रक्त काही रक्तपेढया बेरोजगारांना हाताशी धरुन कामाच्या मोबदल्यात ठराविक रक्कम देवून रक्ताची तस्करी मुंबई, नाशिक, कोल्हापूरसह कर्नाटकमध्ये करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अन्न व औषधे प्रशासन विभागाकडे तक्रारी करुनही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या तक्रारीकडे दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(५) तद्अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील श्री.मनोहर नाईक यांचे करिता** : (१) होय.

कोल्हापूर येथील मे.संजीवन ब्लड बँक या परवाना धारक रक्तपेढीतून रक्त पिशव्या घेऊन मुंबईकडे जाणाऱ्या गाडीला दि. १३/१२/२०१२ रोजी पहाटे लोणावळयाजवळ एक्सप्रेस हायवेवर अपघात झाला होता.

(२) नाही.

(३) नाही. अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेला नाही.

(४) याबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या कोल्हापूर कार्यालयातील औषध निरीक्षकांनी चौकशी केली आहे. सदर चौकशीमध्ये मे.संजीवन ब्लड बँक, कोल्हापूर व मे.रिलायन्स लाईफसायंसेस प्रा.लि.रबाळे, नवी मुंबई, जि.ठाणे यांच्यामध्ये असलेल्या करारानुसार अतिरिक्त झालेल्या FFP च्या रक्त पिशव्या मे. रिलायन्स लाईफसायसेंस प्रा.लि.रबाळे, नवी मुंबई जि. ठाणे यांच्याकडे फ्रॅक्शनेशनसाठी पाठविण्यात येतात. दोन्ही संस्था औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियमांनुसार परवानाधारक संस्था आहेत. मे. रिलायन्स लाईफसायसेंस प्रा.लि.रबाळे, नवी मुंबई, जि. ठाणे यांना सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांनी नाहरकत प्रमाणपत्र क्र. NOC/३०७३-२०१/Reli/१०, दि. १३/१२/२०१० अन्वये अशा प्लाझमा रक्त पिशव्या रक्त पदर्थाचे उत्पादनाकरीता (प्लाझमा फ्रॅक्शनेशनसाठी) गोळा करण्याची परवानगी दिल्याचे आढळले आहे. त्यानुसार अतिरिक्त झालेल्या FFP च्या रक्त पिशव्या मे. रिलायन्स लाईफसायंसेस प्रा.लि.रबाळे, नवी मुंबई, जि.ठाणे यांचेकडे फ्रॅक्शनेशनसाठी पाठविण्यात येत होत्या. सदर गाडीला अपघात झाल्यामुळे त्या रक्त पिशव्या. पुरवठादार रक्तपेढीने परत मागवून नष्ट केल्या आहेत.

(५) चौकशीत आक्षेपार्ह बाबी आढळून न आल्याने तद्नुषंगाने कारवाई करण्यात आलेली नाही.

...४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :** ३७८०९......

श्री. संजय दत्त :सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मला शासनाचे धोरणात्मक बाबीकडे लक्ष आकर्षित करावयाचे आहे. या क्षेत्रामध्ये बऱ्याचशा सामाजिक संस्था ब्लड डोनेशनच्या माध्यमातून चांगले काम करीत आहेत. परंतु बऱ्याच वेळा यामध्ये काही गैरप्रकार होतांना दिसून आलेले आहे. जेव्हा गोरगरीब जनतेला रेअर ब्लड ग्रुपची गरज लागते तेव्हा त्यासाठी फार किंमत मोजावी लागते किंवा तो ब्लड ग्रुप उपलब्ध होत नाही. त्यामुळे यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, रक्त पुरवठयाच्या संदर्भात सर्वांना कोऑर्डीनेट करण्यासाठी शासन स्वंतंत्र नोडल एजन्सी निर्माण करुन या सर्वांवर कंट्रोल ठेवण्याच्या संदर्भात विचार करणार आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय,नॅशनल ब्लड पॉलिसीमध्ये राज्य रक्त संक्रमण परिषद करण्यात आली असून त्यांच्या माध्यमातूनच सर्व ब्लड बँकेचे मॉनेटरींग केले जात असते. जनतेला योग्य पध्दतीचा रक्तपुरवठा झाला पाहिजे,त्यामध्ये पारदर्शकता असली पाहिजे याची संपूर्ण जबाबदारी राज्य रक्त संक्रमण परिषद घेत असते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, ब्लड बँकेच्या संदर्भात राज्य रक्त संक्रमण परिषद सर्व काम करीत असते. मध्यंतरीच्या काळात महानगर ब्लड बँकेतून रिलायन्स लाईफ सायन्सेसला प्लाझ्मा पाठवितांना रात्री पकडले गेले हे खरे आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37809...

डॉ.दीपक सावंत ....

त्यासाठी रक्त संक्रमण परिषदेचे प्रमुख यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले होते हे खरे आहे काय ? त्यांना आता पुन्हा कामावर घेतले आहे तो भाग वेगळा आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, राज्य रक्त संक्रमण परिषद सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित येते. आमच्या विभागाकडून लायसेन्स देणे व तपासणी करणे एवढे काम करण्यात येते. राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या प्रमुखांना सक्तीच्या रजेवर पाठविले होते किंवा नाही यासंबंधातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती त्यांना निश्चितपणे दिली जाईल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी मंडळे रक्तदान शिबिरे आयोजित करतात. ते रक्त जिल्ह्याच्या आवश्यकतेसाठी गोळा होते. प्रायव्हेट रक्त पेढ्या ह्या ट्रस्ट नसतात. त्यांना रक्त देण्याचे प्रावधान आहे काय, तशी काही रचना आहे काय ? या दोघांमध्ये सामंजस्य करार झाला आहे असे म्हटले आहे. एका बाजूने स्वयंसेवी संस्थांनी रक्त गोळा करायचे व दुसऱ्या बाजूला खाजगी व्यवसाय करणाऱ्या रक्त पेढ्यांना द्यायचे असा प्रकार झाल्याचे दिसते. यासंबंधातील ॲग्रीमेंट असेल तर त्याची प्रत माननीय मंत्री सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहेत काय ? असे ॲग्रीमेट असेल तर त्यासाठी काही लिमिट ठरले असणार. तेव्हा या दोन्ही संबधातील माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, याबाबतचे ॲग्रीमेंट असते. जे रक्त वापरात येत नाही त्याचे प्लाझ्मा एक वर्ष स्टोअर करून ते दिले जाते. त्याचा रेशिओ देखील निश्चित आहे. ती माहिती सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

..............................

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पिंपळवाडी (जि. जालना) या गावातील दलित समाजातील नागरीक सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यास आल्यावर त्यांना जीवे मारण्याच्या दिलेल्या धमकीबाबत**

**(4) * 37279 ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पिंपळवाडी (जि. जालना) या गावातील दलित समाजातील नागरिक सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यास आल्यावर त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्याची घटना माहे डिसेंबर,2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) नाही

(2) व (3) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड्.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पिंपळवाडी (जि. जालना) या गावातील दलित समाजातील नागरिकांनी सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्याचा प्रयत्न केले असता त्यांना मज्जाव करण्यात आला व त्यांच्या जीविताला हानी पोहोचेल अशा प्रकारची धमकी देण्यात आली, आहे काय यासंबंधीचा प्रश्न मी विचारला असता त्याला "नाही" असे एका शब्दात उत्तर देण्यात आले आहे. कार्यकर्त्यांनी दिलेल्या माहिती नुसार हा प्रश्न विचारण्यात आला आहे. ही घटना घडली नाही, ते पाणी भरण्यास गेले असता त्यांना मज्जाव करण्यात आला नाही, त्यांना धमकी दिली नाही, असे शासनास म्हणावयाचे आहे काय ? शासनाने "नाही" असे उत्तर दिल्यामुळे काहीच बोध होत नाही. तेव्हा दलित लोकांना पाणी भरण्यासाठी मज्जाव केला होता हे खरे आहे काय, तसेच जी तक्रार करण्यात आली होती त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मागासवर्गीयांना या गावात पाणी भरण्यासाठी मज्जाव केला गेला नव्हता. श्री.अविनाश देवराम साळवे, सामाजिक कार्याध्यक्ष, बहुजन रयत परिषद, जालना यांनी आपल्या जबानीत दोन अनोळखी तरूण माझ्याकडे आले होते व त्यांनी मला गावामध्ये दलितांना पाणी भरण्यासाठी मज्जाव करण्यात येत असल्याचे सांगण्यास भाग पाडले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.32279...

श्री.आर.आर.पाटील...

असे नमूद केले आहे. या प्रकरणाची पोलिसांनी चौकशी केली आहे. गावातील एका सरपंचाने एका शेतकऱ्याची विहीर संपादित करण्याची मागणी केली होती. तेव्हा त्या शेतकऱ्यांने एवढीच इच्छा व्यक्त केली होती की, इतरांची विहीर संपादित करण्यात येते त्यावेळी ज्याप्रमाणे पैसे देण्यात येतात तसे ते मला देण्यात यावेत. त्या शेतकऱ्याने त्याची विहीर ताब्यात घेऊन गावातील सर्व लोकांना पाणी देण्यास अनुकूलता दर्शविली होती. त्याने गावातले पाणी अडविले नव्हते, मागासवर्गीयांचे पाणी अडविले नव्हते. ज्यावेळी गावाला पाण्याची गरज भासली त्यावेळी ती विहीर संपादित करून सगळ्यांसाठी खुली करण्यात आली. यामध्ये ज्या तक्रारी करण्यात आलेल्या आहेत त्या चुकीच्या आहेत असे तक्रारकर्त्याचेच म्हणणे आहे. तसे त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांकडे लिहून दिलेले आहे. त्या गावातील दलितांचे जबाब पोलिसांनी नोंदवून घेतले आहेत. त्यांनी असा प्रकार गावात झाला नसल्याचे व दलितांना कुठेही अडविले नसल्याचे सांगितले आहे. या घटनेची अत्यंत सखोलपणाने वरिष्ठ अधिकाऱ्याने चौकशी केली आहे. माहिती न घेता या संघटनेकडे तक्रार करण्यात आली व ती वर्तमानपत्रात छापून आली. वर्तमानपत्राच्या बातमीच्या आधारे विधान परिषदेमध्ये प्रश्न आला. या माहितीतच तथ्य नसल्यामुळे पुढे काहीच शिल्लक रहात नाही. याची आम्ही चौकशी केलेली आहे. आज या गावातील सर्व विहिरी आटलेल्या आहेत. त्यामुळे कोणीच पाणी भरण्याचा प्रश्न येत नाही.

................

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मानननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन**

**उप सभापती** : सन्माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर सभागृहात उपस्थित झालेले आहेत. आज त्यांचा वाढदिवस आहे. मी त्यांना सभागृहाच्या वतीने वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देतो.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तोंडवली (ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग) येथील समुद्रीविश्व प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(5) * 37306 श्री.सुभाष चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक 30907 ला दिनांक 9 जुलै, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तोंडवली (ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग) येथे जगातील सर्वोत्तम समुद्री विश्व पाहण्याची संधी जगातील सर्व पर्यटकांना मिळावी यासाठी 500 कोटी रूपयांचा महत्वकांक्षी समुद्रीविश्व प्रकल्प उभारण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू प्रकल्प कोकण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असल्यामुळे सदरहू प्रकल्प लवकरात लवकर सुरु करुन पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) असा प्रकल्प उभारण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(2) व (3) सदरहू प्रकल्प राबविण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सायन्स व टेक्नॉलॉजी पार्क, पुणे या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांच्यात झालेल्या करारानुसार परिपूर्ण प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. क्रमांक दोन आणि तीनच्या उत्तराच्या शेवटी "या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी या अर्थसंकल्पात 100 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे"असे कृपया वाचावे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, देश आणि विदेशातील पर्यटकांना आकर्षित करणारा हा जागतिक प्रकल्प आहे. हा आशिया खंडातील मोठा प्रकल्प असून तो सिंधदुर्ग जिल्ह्यात उभा होत आहे. तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सन्माननीय सदस्यांसाठी देखील ही अभिमानाची गोष्ट आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत मी सी-वर्ल्डचा उल्लेख करताना सांगितले होते की,

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37306...

श्री.सुभाष चव्हाण....

यामध्ये सात महासागरांची प्रतिकृती, बर्फाचे पहाड उभे होणार आहेत. या प्रकल्पासाठी टोकन अमाऊंट द्यावी असे देखील मी म्हटले होते. या प्रकल्पासाठी अर्थसंकल्पामध्ये 285 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माझे तीन प्रश्न आहेत. हा प्रकल्प किती एकर जागेवर उभा राहणार आहे, या प्रकल्पाची किंमत किती आहे व या प्रकल्पाच्या कामास केव्हा सुरुवात होणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या प्रकल्पासाठी एकूण 1390 एकर जमीन प्रस्तावित आहे. भूसंपादनासाठी जवळपास 250 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केलेली आहे. हा प्रकल्प पीपीपीवर होणार आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात सी-वर्ल्ड प्रकल्प उभारण्यात येत आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करते. माझे प्रश्न आहेत की, हा प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणार आहे, या प्रकल्पाची घोषणा झाल्यानंतर देश आणि विदेशातील नागरिक त्या परिसरातील जमिनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करीत आहेत, त्यास शासन आळा घालणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या डीपीआरसाठी सायन्स व टेक्नॉलॉजी पार्क, पुणे या संस्थेची नियुक्ती केलेली आहे. त्या संस्थेने दिनांक 24.5.2013 पर्यंत एमटीडीसीला डीपीआर सादर केला पाहिजे. सन्माननीय सदस्यांच्या दुस-या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, जो शेतकरी आहे तो शेत जमीन खरेदी करु शकतो असा कायदा आहे. त्यामुळे त्यामध्ये काही अडचण नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सी-वर्ल्ड प्रकल्प शासन स्वत: करणार आहे की बीओटी तत्त्वावर देणार आहे, या प्रकल्पाच्या बांधकाचे स्वरुप काय आहे, हा प्रकल्प गोवा राज्याच्या लगत आहे, या प्रकल्पासाठी लागणाऱ्या परवानग्या केंद्र शासनाकडून मिळाल्या काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा पीपीपी प्रोजेक्ट आहे. हा प्रकल्प बीओटी तत्त्वावर होणार आहे. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या परवानग्या केंद्र शासनाकडून घ्यावयाच्या आहेत. या प्रकल्पाचा डीपीआर तयार होत आहे त्यासाठी डिटेल सर्व्हे, मॅपिंग, भू-संपादन, लॅन्ड कॉस्टींग वगैरे बाबी झालेल्या आहेत,

यानंतर श्री.बोर्डे...

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37306....

श्री.रणजित कांबळे....

त्यांचे सोशल इम्पॅक्ट ॲसेसमेंट झालेले आहे. इकॉनिमिक डेव्हलपमेंट असेसमेंट, एन्व्हॉयरमेंट इम्पॅक्ट ॲसेसमेंट, झोनिंग ॲंड मास्टर प्लान इ. 1400 एकरच्या बाबतीत केलेले आहे. मायक्रो प्लॅनिंग ऑफ ओशन वर्ल्ड प्रोजेक्ट 200 एकरमध्ये असून त्याचे नियोजन केलेले आहे. जिओ टेक्नीकल इन्व्हेस्टीगेशन रिपोर्ट तयार केलेला आहे. जे प्रगतीपथावर आहे त्यांच्या इन्फ्रास्ट्रकचरची प्लॅनिंग स्ट्रक्चरल ॲनेलेसिस-डिझायनिंग ॲंड एस्टीमेशन, ॲसेसमेंट ऑफ रिसोर्सेस अव्हायलॅबिलीटी बाबत विचार केला आहे. त्या ठिकाणी किती पाणी उपलब्ध आहे आणि पुरेसे पाणी उपलब्ध नसेल तर त्यासाठी इतर ठिकाणावरुन कसे उपलब्ध करता येईल या बाबत विचार केला आहे. त्यासाठी ॲडहॉक कॉस्टींग ॲंड एस्टीमेशन इन्फ्रास्ट्रक्चर ॲंड प्रिपेअरींग ऑफ डॉक्युमेंट हे काम सुरु आहे. एमटीडीसीला केंद्राच्या एन्व्हॉयरमेंट डिपार्टमेंट आणि झू-ऑथॉरिटीची परवानगी घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे. डीपीआर तयार करताना आणि केल्यानंतर सुध्दा सर्व परवानग्या आणण्यासाठी सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी पार्कचा कॉन्ट्रॅक्टमध्ये भाग आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : महोदय, हा चांगला प्रकल्प आहे. हा प्रकल्प झाल्यानंतर तेथे पर्यटन वाढणार असून मोठ्या प्रमाणावर पर्यटक येणार आहेत. परंतु त्या पर्यटकांसाठी निवासाचे नियोजन आणि त्या प्रकल्पापर्यंत पोहोचण्यासाठी अरुंद रस्त्याच्या रुंदीकरणाची खरी आवश्यकता आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, या सर्व बाबींचा समावेश डी.पी.आर.मध्ये केला आहे काय, नसल्यास तो करणार काय ?

श्री.रणजित कांबळे : महोदय, ओशन वर्ल्डचा भाग 200 एकरचा आहे. त्या ठिकाणी एंटरटेन्मेंट, स्पोर्ट, इनडोअर स्पोर्ट, वॉटर स्पोर्ट, रेसिडेन्शियल इ. या निरनिराळ्या बाबींसाठी 1200 एकर जमिनीवर या बाबतचे सर्व नियोजन झालेले आहे. 1200 अधिक 200 अशा प्रकारे 1400 एकरवर हे काम करावयाचे आहे. शिवाय विमानतळ ते प्रकल्पापर्यंत मोनो रेलची व्यवस्था आहे. रोडचे वाईडनिंग करायचे आहे. ज्या ज्या मूलभूत गोष्टी आवश्यक आहेत त्या सर्व गोष्टींची डी.पी.आर. मध्ये तरतूद केली.

..2..

ता.प्र.क्र.37306....

श्री.निरंजन डावखरे : महोदय, हा प्रकल्प पूर्ण करण्यात येत असल्याबाबत मी राज्य सरकार आणि माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानतो. हा चांगला प्रकल्प असून, त्यासाठी पुरेशी निधीची तरतूद केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला अनुसरुन मी विचारु इच्छितो की, त्या ठिकाणी विमानतळ होणार आहे. त्यामुळे गोवा नॅशनल हायवेवरुन गोव्याला जाणारे पर्यटक, सी वर्ल्ड साठी येणारे पर्यटक यांचा देखील विचार करावा लागेल. त्या ठिकणी विमानतळ होत आहे. हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प आहे. देशी आणि विदेशातील पर्यटक त्या प्रकल्पाच्या ठिकाणी येणार आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, हा प्रकल्प करीत असताना रोड इन्फ्रास्ट्रक्चरच्या फॅसिलिटीसाठी योग्य ती तरतूद केली आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : होय.

श्री.भाई गिरकर : महोदय, माझ्या माहितीनुसार या प्रकल्पाच्या परिसरात मुंबईच्या आणि विदेश कंपन्या मोठ्या प्रमाणावर जागा विकत घेत आहेत. त्या परिसरात जागेचे भाव वाढलेले आहेत. शासनाला सी-वर्ल्ड प्रकल्पासाठी 1400 एकर जागा संपादित करावयाची आहेत. त्यामुळे जागेचे वाढते भाव विचारात घेता शासनाला जमीन संपादन करण्यास अडचण येणार आहे. आता देण्यात आलेला निधी जमिनीच्या दराच्या तुलनेत कमी आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, तेथील जमिनीच्या वाढत्या किमतीवर शासन रोख लावणार काय ? तसेच चिपी येथील विमानतळाचा सुध्दा विचार करण्यात येईल काय ? त्या प्रकल्पाच्या ठिकाणी रस्ते आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे त्या भागात रस्त्याचे विस्तारीकरण करणार काय ?

श्री.रणजित कांबळे : महोदय, त्या ठिकाणी रस्त्याचे पूर्ण नियोजन केले आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37306 ..... श्री. रणजित कांबळे ...

एअरपोर्ट आल्यानतर हायवेपासून एअरपोर्ट पर्यंत आणि एअरपोर्ट पासून या स्थळापर्यंतचे नियोजन डीपीआरमध्ये केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, लोक आता जमीन विकत घेत आहेत आणि नंतर भाववाढ होणार आहे. आपण जोपर्यंत सेक्शन 4 ची सूचना जारी करणार नाही तोपर्यंत बंदी घालू शकत नाही. आता तरतूद केलेली आहे. यापुढे निश्चितपणे आम्ही ते थांबवून ठेवणार.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, यासाठी भूसंपादन करणे अत्यंत आवश्यक आहे. भूसंपादन प्रक्रिया सुरु झाली आहे का ? ती प्रक्रिया कधी संपणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, आताच तरतूद झालेली आहे त्यामुळे आता भूसंपादनाची प्रक्रिया चालू होणार आहे.

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, हा प्रश्न मालवण तालुक्याशी संबंधित आहे. त्यामुळे माका आपण मालवणी भाषेत प्रश्न विचारुक परवानगी देशाल का ? सभापती महोदय, आमच्या मालवणात ह्यो प्रकल्प होत आसा त्याचा आमका समाधान आसा. प्रकल्प होयत तेव्हा होयत. कोंबडो कधी आरवात तेव्हा आरवो पण आता सरकारने घोषणा तर केल्यान. फक्त एक प्रश्न असो आसा की, ज्या मालवणक म्हणजे तोंडवलीस ह्यो प्रकल्प होताहा त्याच्या आजूबाजूक जी गावे आसत, म्हणजे वायंगणीच्या बाजूक जी गावे आसत त्यांका अशी भीती वाटता की, ह्यो प्रकल्प झाल्यानंतर आमका घरात्सून तुम्ही हाकलून लावताहास. या गावातल्या लोकांका तुम्ही थंय ऱ्हवाक देवचास नाया. माझो प्रश्न असो आसा की, प्रकल्प तर होऊक व्हयो पण त्याच्या आजूबाजूक जे गाव आसत, घरा आसत त्या एकाही घराक तुम्ही उद्ध्वस्त करुचास नाय याची आमका शाश्वती व्हयी.

श्री. छगन भुजबळ : कोणाही गावकऱ्यावर अन्याय होऊचो नाय.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, काही सदस्य मालवणीमध्ये प्रश्न विचारा असे मला सांगत आहेत. मी जर मालवणीत बोलूक लागलंय तर बाकीचे स्वत:ची तोंडा गप्प करतीत इतक्या चांगला मी मालवणी बोलतंय. पण आता माका मालवणीत बोलाचा नाय. माका जा काय सांगूचा ता सर्वांका समजात त्या भाषेत मी सांगतलंय.

**उप सभापती** : तुमका नाय कोणी सांगितला ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ या ठिकाणी उपस्थित आहेत. या सी वर्ल्डच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण बोलले आहेत. त्या ठिकाणी मोठा प्रकल्प येत आहे आणि त्याकडे सर्वांचे लक्ष आहे. मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत 840 किलोमीटरचा समुद्र किनारा आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला आहे. त्या ठिकाणी ब्रेड अँड ब्रेकफास्ट स्कीम आली होती. आपण वन विंडो क्लिअरन्स म्हणतो तसे केले तर छोटेछोटे उद्योजक त्या ठिकाणी काम करतील आणि आपल्या पर्यटनाकडे आकर्षित होतील. त्यांना सर्व परवानग्या मिळण्यासाठी, या पर्यटनाला चालना देण्यासाठी छोटे छोटे उद्योग येण्यासाठी महाराष्ट्र शासन काय उपाययोजना करणार आहे ? हा मोठा प्रकल्प चालू होण्याच्या अगोदर हे करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने शासन सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी वेगळी काय भूमिका घेणार आहे ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सध्या अशा कोणत्याही तक्रारी नाहीत. किंबहुना आम्ही बैठक घेऊन ब्रेड अँड ब्रेकफास्टसाठी दरवर्षी ज्या परवानग्या घ्याव्या लागत होत्या त्या परवानग्या आता एकदम पाच वर्षासाठी देत आहोत. अशा प्रकारे त्यांना प्रोत्साहन दिल्यामुळे मालवण या छोट्याशा गावामध्ये 140 लोकांनी दोन, चार, पाच पर्यंत ब्रेड अँड ब्रेकफास्टच्या रुम्स उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्या ठिकाणी देशी, विदेशी लोक जातात आणि राहतात. खरे म्हणजे ज्यावेळी सिझन असतो त्यावेळी त्या ठिकाणी जागा सुध्दा मिळत नाही. हा उद्योग त्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. ते ज्या ज्या अडचणी आमच्यासमोर सांगतात त्या सर्व अडचणी सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करतो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(६) * ३७७१३ डॉ.दिपक सावंत, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३०३०० ला दिनांक १६ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उतराच्या संदर्भात :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महामार्गावर गेल्या तीन वर्षात दोन लाखांहून अधिक गंभीर अपघात झाले असून यामध्ये ३५ हजार जणांचा जागीच मृत्यू झाल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील हायवेवर नोव्हेंबर, २०१२ अखेर मोटार गाडयांचे ५९ हजारांवर अपघात होऊन १२ हजार जणांना प्राण गमवावे लागून सुमारे २२ हजार व्यक्ती गंभीर जखमी झाल्याचे डिसेंबर, २०१२ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास. चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) राज्यातील महामार्गावर सन २०१० ते सन २०१२ या तीन वर्षात २,०६,०४३ अपघात झाले असून, त्यामध्ये ३८,७३० लोकांचा मृत्यू झाला आहे.

(२) सन २०१२ च्या नोव्हेंबर पर्यंत ५९,५१० अपघात झाले असून, त्यामध्ये ११,७८१ जण मृत्यू व २१,८४७ जण गंभीर जखमी झाले आहेत.

(३) व (४)

अपघातांबाबत केलेल्या चौकशीत, वाहन अपघातास ७० ते ७५ टक्के मानवी घटक, ७ ते ९ टक्के नैसर्गिक घटक व १६ ते २३ टक्के इतर घटक कारणीभूत असल्याचे आढळून आले आहे. राज्यातील अपघातप्रवण स्थळांची पाहणी करुन त्यामध्ये रस्ते सुधारणा सुचविण्यासाठी अपघात निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीने ७,१९९ अपघातप्रवण स्थळे सुचविली असून, त्यापैकी ६,९०४ अपघातप्रवण स्थळे सुचविली असून, त्यापैकी ६,९०४ अपघातप्रवण स्थळांची सुधारणा करण्यात आली आहे. ४७ स्थळांची कामे प्रगतीपथावर आहेत. याशिवाय समितीने सुचविल्यानुसार रस्त्याच्या साईडपट्टया भरणे वाहतूकीस अडथळा करणाऱ्या झाडांच्या फांद्या कापणे, रस्त्याच्या मध्य व कडा थर्मोप्लास्टिक रंगाने रंगविणे, सूचना फलक लावणे, गतिरोधक बसविणे इत्यादी कामे करण्यात येत आहेत.

महामार्गावर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुध्द महामार्ग पोलिसांकडून कारवाई करण्यात येते. दि. १५.८.२००९ ते डिसेंबर, २०१२ पर्यंत महामार्ग पोलिसांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द १६,८९,८१९ एवढ्या केसेस करुन रु. १८,५७,९९,७००/- एवढा दंड वसूल केला आहे.

ता. प्र. क्र. 37713 .... श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ....

राज्यात दरवर्षी दि. १ जानेवारी, ते १५ जानेवारी दरम्यान रस्ता सुरक्षा पंधरवडा साजरा करण्यात येतो. यामध्ये विविध शिबिरे आयोजित करुन जनतेमध्ये वाहतूक नियमांबाबत जागृती केली जाते. महामार्गावर पोलिसांकडून ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह, लेन कटींग सारख्या विशेष मोहिमा राबविल्या जातात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. मला दोनच प्रश्न विचारावयाचे आहेत. मुंबई-गोवा हायवेवर जे ब्रिटीशकालीन पूल आहेत त्या पुलांचे पुनरुज्जीवन कधीपर्यंत होईल किंवा रुंदीकरण कधीपर्यंत होईल ? कारण ते पूल अतिशय मोडकळीस आलेले आहेत आणि त्या पुलांवरच जास्तीत जास्त अपघात होतात.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 11:55

ता.प्र.क्र.37713... डॉ.दीपक सावंत....

ते पूल कधीपर्यंत दुरुस्त होतील. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या प्रमाणे ड्रंकन ड्रिव्हन मोहीम मुंबईमध्ये चालविली जाते त्याप्रमाणे मुंबई-गोवा महामार्गावर मोहीम कायम स्वरुपी चालविली जाणार आहे का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जगबुडी नदीमध्ये बस पडल्यामुळे तो पूल नादुरुस्त झालेले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांसमोरच तो पूल लवकरात लवकर दुरुस्त करण्याबाबतची विनंती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांना मी करीत आहे.

डॉ.दीपक सावंत : जे पूल ब्रिटिशकालीन आहेत ते पूल देखील दुरुस्त करणे आवश्यक आहेत ते पूलही दुरुस्त केले जातील काय ?

श्री.आर.आर.पाटील : अपघात झालेल्या जगबुडी नदीवरील पूल प्रथम प्राधान्याने दुरुस्त केला जाईल आणि नंतर बाकीचे पूल टप्प्याटप्प्याने लवकर दुरुस्त करावेत अशी सर्वांच्या साक्षीने, सर्वांसमोर मी बांधकाम खात्याला विनंती करीत आहे. या रस्त्याची व राज्यातील अपघातांची संख्या पाहिली तर चिंता वाटण्यासारखी स्थिती आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस हाय-वे संबंधी चर्चा झाली होती. त्यावेळी तेथे पोलीस बलाची संख्या फक्त अपघातांची संख्या मोजण्या इतपत होती. त्यामुळे 25 टक्के स्टाफ वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तो स्टाफही तोकडा आहे. राज्यातील महामार्गांवरील अपघातांमध्ये निरपराध लोकांचे होणारे मृत्यू यासंबंधी मंत्रिमंडळामध्ये सर्व विभागांमार्फत यासंबंधी कोणकोणते निर्णय घेतले पाहिजेत याबाबत चर्चा करुन धोरण व निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे ब्रिद ॲनलायझर लागणारा स्टाफ उपलब्ध करुन घेऊन आणि मोठ्या प्रमाणात मुंबईत चालक दारु प्यायला आहे की नाही हे तपासले जाते. तसेच या महामार्गावरुन जाणाऱ्या बसेस विशेषत: रात्रीच्या वेळी गोव्याकडून येणाऱ्या बसेसच्या बाबतीत ड्रायव्हरची अल्कोहोलची तपासणी केल्यानंतरच बसमध्ये बसण्याची परवानगी देण्याची भूमिका स्वीकारली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या लेखी उत्तरातूनच या अपघातांची भीषणता दिसून येते. तीन वर्षात 2,06,043 अपघात झाले आहेत. त्यात 38,730 लोकांचा मृत्यू झालेला आहे. माननीय श्री.छगन भुजबळ यांनी परवाच्या चर्चेला उत्तर देताना असे सांगितले की, मी आता उत्तर देत आहे. दिल्लीमध्ये आताच केंद्रीय मंत्र्यांची संबंधित खात्याबरोबर बैठक चालू आहे. त्यांचा

2...

NTK/ D/ KTG/ D/ ST/

ता.प्र.क्र.37713...                                        श्री.दिवाकर रावते....

यासंबंधी काही तरी निर्णय होत आहे. ती बैठक संपून आता 3 दिवस झालेले आहेत. त्या बैठकीचा निर्णय आपल्यापर्यंत पोहोचला आहे काय आणि काही उत्साहवर्धक बातमी आपण देऊ शकाल काय ?

श्री.छगन भुजबळ : खेड-भरणा नाक्यावरील पुलाबाबत मी विधानसभेच्या सभागृहातही सांगितलेले आहे. हा संपूर्ण रस्ता पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परंतु हे 2-3 पूल बाजूला काढून ते ताबडतोब करावेत आणि संपूर्ण रस्ता तयार होईल त्यावेळी ते रस्त्याचे भाग होतील. त्यासंबंधी मी माननीय मुख्यमंत्र्यांना बरोबर घेऊन दिल्लीला जाऊन त्याची परवानगी आणून त्या पुलांच्या कामाबाबत ताबडतोब कार्यवाही करु.

श्री.विनोद तावडे : मुंबई-गोवा महामार्गाचा विषय हा गृह व सार्वजनिक बांधकाम विभागांशी जोडलेला आहे. मला बांधकाम विभागासंबंधी प्रश्न विचारावयाचा आहे. परवाच्या अपघाताच्या ठिकाणी आम्ही भेट दिली होती. त्याबाबत चर्चाही केली आहे. त्या पुलावर लोखंडी कठडे आहेत त्याऐवजी सिमेंटचे कठडे करावेत असे परिवहन खात्याने सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविले होते. ते झाले असते तर कदाचित ती बस खाली जाऊन हा अपघात झाला नसता. ते काम वेळेत करावे. या अपघातातून 2-3 गोष्टी समोर आल्या आहेत.

अपघात होण्याची दोन कारणे असतात. चालक दारु प्यायलेला असतो किंवा त्याला झोप लागलेली असते. केंद्र सरकारच्या विज्ञान विभागाने रेटिनाशी संबंधित 4 हजार रुपयांचे एक उपकरण शोधून काढले आहे. चालकाला झोप लागल्याबरोबर अलार्म वाजतो. अशा प्रकारची मशिनरी टूरिस्ट बससाठी बंधनकारक करणार काय, मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे संबंधी परवाच सादरीकरण झाले आहे. त्याबाबत असे समजले आहे की, त्या महामार्गावर सर्व्हेलन्स कॅमेरे लावले जाणार आहेत. आता मुंबई-गोवा महामार्गाचे काम चालू आहे. त्याच्या टेंडरमध्ये हे कॅमेरे लावण्याची अट घातली पाहिजे. हा हाय-वे तयार करणाऱ्यानेच ते कॅमेरे लावण्याचे काम केले पाहिजे. त्यासाठी आवश्यक असेल तर एक-दोन महिन्यासाठी टोल लावावा, नाही तर टोलची मुदत ते वाढवित असतातच, त्यामुळे असे कॅमेरे लावण्याची अट त्यात घालावी. ती गरज आहे. टूरिस्ट बसेस जेथून निघतात तेव्हाच त्यांचा जेवणाचा हॉल्ट कोठे आहे ते आयडेंटिफाय केले पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ D/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

ता.प्र.क्र. 37713... श्री. विनोद तावडे...

नॉमर्ली ड्रायव्हर तेथून दारु पिऊन येतात. म्हणून पुढच्या चेकपोस्टवर त्यांचे चेकिंग करणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे चेकिंग केले जाईल काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : असे निश्चितपणे करता येईल.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**1993च्या बॉम्ब स्फोटातील आरोपींना दिलेल्या शिक्षेसंबंधीची माहिती सभागृहाला देण्यासंबंधी**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 1993च्या बॉम्ब स्फोटातील आरोपी याकूब मेनन याला न्यायालयाने फाशीची अणि अन्य आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावलेली आहे. तसेच संजय दत्त याला 5 वर्षाची शिक्षा ठोठावलेली आहे अशी आम्हाला माहिती मिळालेली आहे. यासंबंधी शासनाने सभागृहाला अधिकृतपणे माहिती द्यावी अशी माझी सूचना आहे.

श्री. आर.आर.पाटील : यासंबंधी सविस्तर माहिती घेऊन निवेदन करण्यात येईल.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके अणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 22 मार्च 2013 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 21 मार्च 2013 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार खालील अशासकीय विधेयकांना वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

**बॅलटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय विधेयके**

1) सन 2011चे वि.प.वि.क्रमांक 8- महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, 2011 - श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे - 40 मिनिटे
2) सन 2011चे वि.प.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, 2011 - श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे - 40 मिनिटे
3) सन 2011चे वि.प.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, 2011, श्री. विजय सावंत, वि.प.स. यांचे - 35 मिनिटे
4) सन 2011चे वि.प.वि. क्रमांक 4 - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2011 - श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे (चर्चा अपूर्णावस्थेत) - 35 मिनिटे

**उप सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभगृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--

..3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 अन्वये सूचना</u>

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील, यांनी "राज्यातील न्याय विभागामार्फत ओबीसी व एसबीसी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुदान न मिळाल्यमुळे दोन्ही संवर्गातील विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी "राज्यातील एस.टी.महामंडळाच्या कर्मचा-यांनी वेतन करार आणि 22 टक्क नियमित पगार वाढ करण्याच्या मागणीकरिता बेमुदत संप करण्यचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत ग्रामीण व नागरी भागातील तीन ते सहा वर्षे वयोगटाच्या मुलांना पौष्टीक आहार देण्याच्या नावाखाली खरेदी केलेल्या बिस्किटांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "मनोरा (जि. वाशिम) येथील पंचायत समितीच्या अंतर्गत काम करणा-या शिक्षकांना माहे जानेवारी व फेब्रुवारी, 2013चे वेतन अदा न केल्याने शिक्षक व त्यांच्या कुटुंबावर आलेली उपासमारीची पाळी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "नातूनगर(ता.खेड, जि. रत्नागिरी येथील पाटबंधारे कालव्याचे नातूनगर ते आंबये कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4..

21-03-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M-4

MSS/ D/ D/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

उप सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "ठाणे शहरातील श्रीरंग सोसायटीच्या बाजूला असलेला घोसाळा तलाव ठाणे महानगरपालिकेने पिकनिक स्पॉटसाठी आरक्षित ठेवणे,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

तथापि ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर भूखंड ठाणे महापालिकेच्या नावे अद्यापि न लावणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किशनचंद तनवाणी यांनी "जायकवाडी धरणातून औरंगाबाद शहराला पाणी पुरवठा करणा-या जलवाहिन्यांच्या गळतीची दुरुस्ती रोखण्याच्या नावाखाली अर्थपूर्ण व्यवहार होत असल्याचा संशय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 12:05

उप सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री. विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर यांनी "वांद्रे(प.) येथील नर्गिस दत्त नगर झोपडपट्टीमध्ये अवैधपणे मजल्यावर मजल्यांचे केलेले अनधिकृत बांधकाम " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "श्री शाहू छत्रपती मीलच्या मोकळया जागेवर गिरणी कामगारांना मोफत घरे बांधून मिळण्याबाबतची मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया, डॉ.रणजित पाटील, श्री.किशनचंद तनवाणी यांनी "अकोला,वाशिम,बुलढाणा या तीन जिल्हयांमधील उपप्रादेशिक परिवहन विभागात मोठ्या प्रमाणात सुरु असलेला अनागोंदी कारभार, सदर विभागात अनेक पदे रिक्त असून वाहनांचे परवाने देण्याकरिता दलालांचा असलेला सुळसुळाट " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 22 मार्च,2013 रोजीपासून मुंबईतील आझाद मैदान येथे अन्न अधिकारी अभियान, महाराष्ट्र राज्य व जन आरोग्य अभियान, महाराष्ट्र या दोन संघटना आपल्या विविध मागण्यांकरता सुरु करणार असलेले आंदोलन " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे,ॲड.आशिष शेलार, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.चंद्रकांत पाटील यांनी "मुंबई येथील सायन चुनाभट्टी येथे असलेल्या वसंतदादा पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नसताना केलेले अनधिकृत बांधकाम " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.**: मौजे आंबिवली,ता.अंधेरी,जि.मुंबई उपनगर येथील समशेर सिध्दीकी यांच्या मालकीची जमीन म्हाडाने बेकायदेशिरित्या अतिक्रमण करुन विकासकास विकली याबाबत श्री.रामदास कदम वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण एकच प्रश्न विचारण्याची अनुमती दिली आहे. हा विषय एका प्रश्नात संपणारा नाही. अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मंत्री महोदय हे आपल्या दालनात बैठक घेऊन हा विषय मार्गी लावणार काय ?

श्री.सचिन अहिर : होय.

-------------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : अकोला येथील विमातळाच्या विस्तारीकरणा बाबत श्री. गोपीकिशन बाजोरिया, डॉ.रणजित पाटील, श्री.वसंतराव खोटरे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, प्रश्न विचारणारा मीच आहे. माझ्या प्रश्नाला उत्तर देणारे मंत्री तेच आहेत आणि सभागृह देखील तेच आहे. मी या सभागृहात नियम 93 अन्वये सातव्या वेळी सूचना उपस्थित करीत आहे. पीकेव्हीचे अधिकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अधिकारी, सर्व संबंधित अधिकारी यांची बैठक आठवडयात घेण्यात येईल असे प्रत्येक वेळी माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर दिले गेले आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, सभागृहात उपस्थित झालेले आहेत, त्यांचे मी स्वागत करतो. माननीय मुख्यमंत्री महोदय हे अकोला येथे आले असताना त्यांनी असे सांगितले होते की, 31 मार्च,2013 पूर्वी अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी जमीन पीकेव्ही करुन संपादित करुन ती जमीन सामान्य प्रशासन विभाग आणि महसूल विभाग यांच्याकडे देण्यात येईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी नागपूर येथे ॲडव्हांटेज विदर्भाच्या अनुषंगाने चांगल्या प्रकारची परिषद भरवली. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, अकोला येथील विमानतळाच्या धावपट्टीचा हा प्रश्न आहे..

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-2.... श्री.गोपीकिशन बाजोरिया.....

अकोला येथे विमानतळ अस्तित्वात आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या विमानतळाच्या विस्तारासाठी प्रयत्न केले आहेत. एक महिन्यापूर्वी त्यांनी आश्वासन दिले होते. माननीय उद्योगमंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिलेले आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी चार वेळा सभागृहात आश्वासन दिले आहे. हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न सभागृहात चर्चेला आला होता, त्यावेळी विरोधी पक्षाच्या सर्व माननीय सदस्यांनी सभात्याग केला होता.

सभापती महोदय, अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या दालनात या अधिवेशन काळात बैठक आयोजित करुन डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची जागा सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतरित करुन ॲडव्हान्टेज विदर्भाची सुरुवात ते अकोला येथून करतील काय?

प्रा.फौजिया खान : आश्वासन दिल्याप्रमाणे आदरणीय मुख्यमंत्र्यांना बैठक घेण्याची विनंती करण्यात आली असून त्यांनी त्याबद्दलची नोंद घेतली आहे. लवकरच बैठक घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याबाबत माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी सभागृहामध्ये सात वेळा नियम 93 अन्वये सूचना उपस्थित केलेली आहे. वारंवार एकाच प्रकारचे उत्तर देण्यात येते, मात्र या विषयामध्ये कोणतीही प्रगती होताना दिसत नाही. म्हणून मी आज सकाळी माननीय सभापतींची भेट घेऊन त्यांना हेच सांगितले की, आपण माननीय मुख्यमंत्र्यांना या विषयाबद्दल बैठक आयोजित करण्याची विनंती करावी. अधिवेशन काळात अशी बैठक आयोजित केली तर हा प्रश्न मार्गी लागू शकतो. सात वेळा हा विषय सभागृहात उपस्थित करुनही काही उपयोग झालेला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व संबंधितांची बैठक आयोजित करावी, त्या बैठकीमध्ये हा प्रश्न सोडविता येऊ शकतो.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी 15 दिवसापूर्वी अकोला येथे गेलो होतो. त्यावेळी फक्त याच विषयावर मी बैठक घेतली होती. विस्तारीकरणाबाबतचे सर्व नकाशे पाहिले होते. संबंधित सर्व अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन त्यांना स्पेसिफिक सूचना दिलेल्या आहेत. जमिनीची अदलाबदल करणे किंवा कृषी खात्याकडील जमीन उपलब्ध करुन देणे असा हा प्रश्न आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.............. निवेदन क्रमांक-2.....

15 दिवसापूर्वी मी अकोला येथे गेलो होतो, मी विभागाला याबाबत पाठपुरावा करण्यास सांगितले आहे. अकोला हे विदर्भातील अतिशय महत्वाचे ठिकाण असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत तेथील विमानतळाची धावपट्टी चांगली असली पाहिजे, मोठे विमानतळ झाले पाहिजे, अकोला नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी एअरपोर्ट आहेत तेथे जमीन घेऊन धावपट्टीचा विस्तार करण्याचा व नाईट लॅण्डिंगची सुविधा करण्याचा प्रयत्न आहे. स्पेसिफिकली अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी बैठक घेऊन मी चर्चा केली आहे आणि सूचना दिलेल्या आहेत. काही दिवसात माझ्याकडे प्रकरण येईल. निश्चितपणे बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत, त्याचे औचित्य साधून मी नांदेड येथील विमानतळाबाबतचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो. नांदेड जिल्हयामध्ये जमीन संपादन करण्याच्या मुद्यावरुन 15 दिवसांपासून शेतकऱ्यांचे उपोषण सुरु आहे व त्या उपोषणाचे नेतृत्व श्रीमती सूर्यकांता पाटील या करीत आहेत. मी हा प्रश्न सभागृहात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. नांदेड एअरपोर्टच्या जमीन संपादनासाठी बैठक घेण्यात येईल काय?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माजी मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी या प्रश्नाबाबत माझ्याबरोबर अनेकदा बैठक घेतली आहे. अतिरिक्त जमीन संपादित करुन तेथे एमआयडीसीला किंवा अन्य कोणाला तरी औद्योगिक क्षेत्र विकसित करता येईल का याबद्दलचा प्रश्न आहे. या प्रश्नाला दोन बाजू आहेत. एमआयडीसीचे अभिप्राय मी मागविले आहेत. त्यांना ती बाब व्यावहारिक आहे की नाही याबद्दल विचार चालू आहे. मी लवकरच पुन्हा एकदा बैठक घेऊन प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न करतो.

-----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : धर्मवीर आनंद दिघे विद्यालय, शहापूर, जि.ठाणे या शाळेतील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस बसलेल्या एका विद्यार्थ्याला भरारी पथकामार्फत बोगस व तोतया विद्यार्थी ठरविण्यात येणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-3 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

नंतर पी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय,माननीय मंत्रीमहोदयांनी या विषयाच्या संदर्भात लेखी उत्तर दिलेले आहे परंतु अशा प्रकारच्या घटना पुन्हा होऊ नये यासाठी आपण काही उपाययोजना करणार आहात काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ओळखपत्र संशयास्पद वाटणे आणि त्यासंदर्भात चौकशी करणे यानंतरच उपाययोजना केली जाऊ शकते. परंतु विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता असेल तर त्याला न्याय देण्याची भूमिका शासनाची जरुर राहणार आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदन क्रमांक 4 च्या बाबत**

**उप सभापती** : आता निवेदन क्रमांक 4 घेण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदन क्रमांक 4 चे उत्तर देण्यासाठी संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. आम्ही 8-10 दिवस अगोदर निवेदने देत असतो असे असतांनाही सभागृहात मंत्रीमहोदयांनी उपस्थित न राहणे योग्य नाही.

**उप सभापती** : या निवेदनाच्या संदर्भात संबंधित मंत्र्यांना बोलावण्यासाठी मी निरोप पाठवित आहे. आता निवेदन क्रमांक 1 घेण्यात येईल.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : युपीएससीच्या परीक्षेत प्रादेशिक मराठी भाषा वगळल्याच्या निर्णयाबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. राजेश टोपे ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक एक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, स्थानिक लोकाधिकार समितीने या प्रश्नावर महाराष्ट्र व संपूर्ण भारतात आवाज उठवलेला आहे. यासंदर्भात जे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, केंद्र शासनाने दि. 5 मार्च, 2013 रोजी या अधिसूचनेला स्थगिती देण्याचे संसदेत घोषित केलेले आहे. त्यामुळे मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, राज्याच्या वतीने युपीएससीच्या परीक्षेसाठी बसलेल्या हजारो विद्यार्थ्यांची पूर्वी सारखीच परीक्षा पध्दत करण्यात यावी अशी अपेक्षा आहे. यामध्ये इंग्रजी विषय सोडून राज्य घटनेच्या आठव्या परिशिष्ट मध्ये जे जे विषय आहेत ते लिहिण्याची मुभा मिळावी. तसेच 25 पेक्षा कमी विद्यार्थी असले तरी त्यासंदर्भात कोणतेही बंधन असता कामा नये. परंतु आता इंग्रजी भाषा आणि अजून एका भाषेमध्ये 120 गुण मिळवण्याची अट होती. त्यामुळे पूर्वीच्या ज्या सूचना होत्या त्या प्रमाणे अंमलबजावणी करावी जेणेकरुन मराठी मुलांचा अधिकार डावलला जाणार नाही यासाठी राज्य शासनाने केंद्रशासनाकडे काही पत्र व्यवहार केला आहे काय ? केंद्रशासनाकडे यासंदर्भात पत्र व्यवहार केला नसेल तर त्या पध्दतीने महाराष्ट्र राज्याचे मत केंद्रसरकारला कळवले जाणार आहे काय व आधीची पूर्व सूचना आणण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, युपीएससीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा विषय अतिशय जिव्हाळयाचा विषय आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय सुध्दा सभागृहात उपस्थित आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून राज्य भाषेतून पूर्वी ज्या प्रमाणे पेपर दिले जात होते त्या प्रमाणे राज्य भाषेचे महत्व अबाधित रहावे यासाठी राज्याच्या वतीने प्रयत्न केले जातील तसेच माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या वतीने केले जातील. पूर्वी डीओपीटी हा भाग माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे होता त्यामुळे यासंदर्भात आम्ही स्वत: जाऊन विभागाशी चर्चा केली जाईल.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, केंद्रीय खात्याचे काही दिवसापूर्वी माझ्याकडे काम होते युपीएससीमध्ये जे काही बदल करावयाचे होते ते बदल मी तेथे असतांना केलेले असून त्याचे सर्वांनी स्वागत केले होते. यासंदर्भात राज्य सरकारची स्पष्ट भूमिका आहे की, मराठी मधून पेपर लिहिण्याची परवानगी कोण्त्याही पध्दतीमध्ये राहिलीच पाहिजे,

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

मी आपणास सांगू इच्छितो की, आहे त्यामध्ये कुठल्याही प्रकारची बाधा आलेली नाही. मी सुरुवातीला यासंबधातील माहिती घेतली आहे. या परीक्षेमध्ये 2100 गुण असतात. यामध्ये 100 मार्क इंग्रजीसाठी अनिवार्य केले आहेत. आता जागतिकीकरणाची प्रक्रिया झपाट्याने होत आहे. महाराष्ट्रामध्ये परराज्याचा आयएएस विद्यार्थी आला आणि त्याला इंग्रजी येत नसेल तर ते राज्याच्या हिताचे ठरणार नाही. त्यामुळे ही जी सुधारणा आहे त्यावर सर्वांनी गंभीरपणे विचार केला पाहिजे. मी येथे आपणास सांगू इच्छितो की, मराठी भाषे संबंधी बिलकूल तडजोड होणार नाही. युपीएससीने काही कारणांमुळे 25 विद्यार्थ्यांची अट ठेवलेली असेल. 25 पेक्षा विद्यार्थी कमी असतील तर त्यांना पेपर तपासायला अवघड जाते. कारण त्या भाषेचे तेवढे पेपर तपासण्यासाठी माणसे मिळत नाही. देशातील एका भाषेसाठी फक्त तीन ते चार माणसे पेपर सेट करण्यासाठी व तपासण्यासाठी आहेत. त्यामध्ये काही अपप्रकार घडायला लागले म्हणून त्यांनी हे केले असावे. फार कमी उमेदवार असतील म्हणून त्यांनी अशा प्रकारची ही सुधारणा केलेली आहे वाटते. त्यामुळे मराठीवर अन्याय होईल असे मानण्याचे बिलकूल कारण नाही. 25 विद्यार्थ्यांची अट आहे. 25 पेक्षा जास्त उमेदवार मराठी भाषा घेऊन पेपर देतात. यामध्ये आणखी काही करावयाचे असेल तर मी निश्चितपणे भाग घेईन. मराठी भाषेत पेपर लिहिण्याची परवानगी आहे ती अट राहिलीच पाहिजे अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. त्यामध्ये आमची कोणतीही तडजोड होणार नाही. फक्त 100 मार्काच्या इंग्रजीच्या पेपर संबंधी सर्वांनी विचार केला पाहिजे. माझ्या राज्यामध्ये बाहेरच्या राज्यातील आयएएस आला आणि त्याला बिलकूल इंग्रजी आले नाही तर ते राज्याच्या हिताचे होणार नाही. 2100 मार्कापैकी किमान 100 मार्क हे इंग्रजी विषयासाठी असावेत अशी युपीएससीने सुधारणा केली आहे, त्यावर आपण सर्वांनी विचार करावा. हा विचार करत असताना मराठी भाषा विषया संबंधी बिलकूल तडजोड होणार नाही हे मी या पूर्वीच सांगितले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, युपीएससी परीक्षा संबंधात शासन एक प्रस्ताव आणणार होते. आपल्या सभागृहाच्या भावना केंद्र शासनाला कळविण्यासाठी शासनच हा प्रस्ताव मांडणार होते. तसे गेल्या आठवड्यात ठरले होते. तो शासनाने आणला पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे शासनाचा निर्णय जाहीर केला आहे तो चांगला आहे. सभागृह आपल्या भावना व्यक्त करत आहे अशा आशयाचा ठराव पाठविण्याचे ठरले होते. तो प्रस्ताव शासनाने लवकर आणावा अशी माझी सूचना आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, याबाबत सर्वांशी चर्चा करून याबद्दल काय करावयाचे हे ठरविण्यात येईल.

....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जाती/जमातीचे वैधता प्रमाणपत्र मिळण्यास विविध अडचणी निर्माण होणे याबाबत श्री.दिवाकर रावते वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक एक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथै सोबतचे निवदेन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदनातील पान क्र.2 वरील पाचव्या परिच्छेदामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, श्री.व्ही.के.महावरकर, सहआयुक्त यांनी असे आदेश काढले की, किमान तीन प्रकरणे दररोज अवैध होणे आवश्यक आहे. पावणेदोन महिन्यांनी शासनाच्या लक्षात आले की, हे चुकले आहे. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी संबंधात संपूर्ण महाराष्ट्रात असंतोष असताना प्रकरणे अवैधच करा असे आदेश काढल्यामुळे गोंधळ निर्माण झाला. तो सुधारण्याची पाळी आली. येथे आपण "व्ही.के."असे लिहिले आहे त्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करावी. आपली राज भाषा मराठी आहे. त्यातील तरतुदीनुसार "व्ही.के." असे नाव लिहिता येत नाही. त्यामुळे यासंबंधी आपण कारवाई करणार आहात काय, तसेच, ज्या अधिकाऱ्याने हे अयोग्य आदेश काढले आहेत त्यांच्यावर आपण कारवाई करणार आहात काय ? या अधिकाऱ्याची बदली करता येत नाही असे देखील आपण नमूद केलेले आहे. तेव्हा त्या अधिकाऱ्यावर आपण कारवाई करणार आहात काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, लवकरात लवकर दाखले मिळावेत म्हणून मिटींग झालेली आहे. नवीन दाखल्यां व्यतिरिक्त वर्ष-दीड वर्षापासून जे दाखले प्रलंबित आहेत त्यातील तीन दाखले काढले पाहिजेत अशा प्रकारचा आदेश दिला. टंकलेखनामध्ये चूक झाली हे खरे आहे.त्यात सुधारणा करण्यात आली आहे. या प्रकरणी चौकशी केली असून ज्यांनी चूक केली त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यात कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? आपण संबंधिताला कारणे दाखवा नोटीस दिली आहे काय, त्याचे एक इन्क्रीमेंट थांबवले आहे काय ? अशा प्रकारची आपण काही तरी कारवाई करणार आहात काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. आम्ही कारवाई करतो.

.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अंबरनाथ,जि.ठाणे येथील मंदाकिनी भोर विद्यालय येथील परीक्षा केंद्रावरून शालांत परीक्षेचा पेपर फुटणे याबाबत श्री.जयंत पाटील,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक एक सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथै सोबतचे निवदेन छापावे.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, भोर महाविद्यालयाच्या संचालिका श्रीमती मंदाकिनी भोर यांच्या मुलानेच पेपर त्या क्लासला दिला हे खरे आहे काय, या प्रकरणी त्या मुलाला कधी अटक करण्यात आली, या महाविद्यालयाच्या संचालिका श्रीमती मंदाकिनी भोर यांच्या विरोधात पोलीस केस दाखल करावी अशी सूचना शिक्षणाधिकाऱ्याने केली आहे हे खरे आहे काय ?

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रकरणी श्रीमती मंदाकिनी भोर यांना सहआरोपी करण्यात आले असून श्री.मुकुंद सुदाम भोर आणि फिरोज अब्दुल मजीद खान या दोघांवर गुन्हा दाखल केला असून त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर त्या सूचनेवर "शासनाने निवेदन करावे" असे आपण निदेश देता. त्यानंतरही आठ-दहा दिवस उलटल्यानंतर देखील शासनाकडून निवेदन करण्यात येत नाही. या ठिकाणी काही निवेदने प्राप्त झालेली आहेत परंतु सभागृहात माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत. जर असे प्रकार होत असतील तर आम्ही काय करावे ?

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी फक्त माननीय मंत्री महोदयांना सभागृहात बोलाविण्याचे काम करु शकतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण माननीय संसदीय कार्य मंत्री महोदयांना सभागृहात बोलवावे. तोपर्यंत आपण सभागृहाचे कामकाज तहकूब करावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदन आता घेणार आहेत हे मंत्री महोदयांना कळविण्यात आले नव्हते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात )

**उप सभापती** : सभागृहाची बैठक मी पाच मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.26 वाजता 5 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

---------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, मी माननीय मंत्री महोदयांना निरोप पाठविला होता. माननीय मंत्री महोदय विधानसभा सभागृहात आहेत. त्यांचे विधानसभा सभागृहातील कामकाज झाल्यानंतर ही दोन्ही निवेदने घेण्यात येतील.

आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ ST/ D/ पूर्वी श्री.अजित.... 12:30

**पृ. शी.** : मुंबईतील नर्सिंग होम्सना अग्निशमन दलाकडून ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे नर्सिंग होम्सचे परवाने पुनर्जीवित न होणे

**मु. शी.** : मुंबईतील नर्सिंग होम्सना अग्निशमन दलाकडून ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे नर्सिंग होम्सचे परवाने पुनर्जीवित न होणे, या संबंधी डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईतील बॉम्बे (मुंबई) नर्सिंग होम्स ॲक्ट खाली नोंदणीकृत झालेली अनेक नर्सिंग होम्स (फायर एन.ओ.सी.) अग्निशमन दलाच्या ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रतिक्षेत असल्याने त्यांचे मुंबई शहर व उपनगरातील लायसेन्स (परवाना) नूतनीकरण होत नाही, नर्सिंग होम्स परवाना पुनर्जीवित न झाल्याने मेडिकल इन्शुरन्सचा फायदा सामान्य रुग्णांना मिळत नसणे, त्यामुळे सर्वसामान्यांना भूर्दंड पडत असणे, मुंबईत काही नर्सिंग होम्स डे-केअर सेंटर्स असून, काही सन 1995 च्या पूर्वीची नर्सिंग होम्स असणे, त्यामुळे नर्सिंग होम्ससाठी आवश्यक वेगळा प्रवेशही उपलब्ध नसणे, त्यामुळे डॉक्टर्स, नर्सिंग होम्स चालक व मेडिकल इन्शुरन्स मिळणारे रुग्ण यांच्यात प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

श्री.भास्कर जाधव ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबईतील नर्सिंग होम्स संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, मुंबईमध्ये 1484 नर्सिंग होम्स आहेत. महोदय, आज या नर्सिंग होम्सची परिस्थिती अतिशय वाईट आहे. त्या नर्सिंग होम्सवर काही ना काही कारणांमुळे कायद्याचा बडगा उगारला जात आहे. सुरुवातीला 1995 नंतरच्या नर्सिंग होम्समध्ये जीना पाहिजे असे आदेश काढल्यामुळे नर्सिंग होम्स वादात आले. त्यानंतर बायो-मेडिकल वेस्टमुळे वादात आले आणि आता अग्निशमन दलाच्या ना हरकत प्रमाणपत्रामुळे वादात आले आहेत. अग्निशमन दलाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे या नर्सिंग होम्सचा परवाना पुनर्जीवित करण्यात अडचणी येत आहेत. आज मुंबईतील 50 टक्के रुग्ण छोट्या नर्सिंग होम्समध्ये आणि उर्वरित 50 टक्के रुग्ण कॉर्पोरेट हॉस्पीटल जातात. त्यामुळे असा संशय येतो की, छोटे छोटे नर्सिंग होम्स बंद करुन कॉर्पोरेट हॉस्पीटल सधन करण्याची तर कॉर्पोरेट हॉस्पीटलची चाल नाही ना ?

आज दक्षिण व मध्य मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर छोटे छोटे नर्सिंग होम्स आहेत. त्यात 5 ते 10 बेडचे नर्सिंग होम्स देखील आहेत. परंतु आज या छोट्या छोटया नर्सिंग होम्सच्या परवान्यांचे नुतनीकरण न झाल्यामुळे विमा कंपन्या त्यांना प्रतिपूर्तीची रक्कम देत नाहीत. त्यामुळे या नर्सिंग होम्सपुढे अडचण निर्माण झाली आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर अनेदा बैठका झाल्या. कमिशनर साहेबांबरोबर, ॲडिशनल कमिशनर मॅडम बरोबर बैठका झाल्या तरीही हा नर्सिंग होम्सचा प्रश्न तसाच आहे. ते सांगतात की, राज्य शासनाने यामध्ये सुट द्यावी, आमची काही हरकत नाही. माझा पहिला प्रश्न असा आहे की, आज फायर स्टेशनकडे स्टाफ अपुरा आहे. आपण नर्सिंग होम्सची पुन्हा पाहणी करणे शक्य नाही. 1 ते 15 बेडपर्यंतच्या नर्सिंग होम्सना सुट देण्याचा प्रस्ताव शासन करणार का ? त्यांना आपण आयएसआय मार्कचे फायर एस्टिंग्युशर लावण्यास सांगावे. त्यांना आपण टेम्परररी लायसन्स दिलेले आहेत. निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, 848 नर्सिंग होम्सना कंडीशनल लायसन्स दिलेले आहेत. हे लायसन्स फक्त कांदिवली, बोरिवली, मालाड या ठिकाणी दिलेले आहेत. या लायसन्समुळे ते मेडिक्लेम करु शकत नाहीत. त्यांना परमनंट लायसन्स देणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी या प्रश्नाचे गांभीर्य ज्या पध्दतीने विशद केले त्याची शासनाला पुरेपूर जाणीव आहे. म्हणून शासनाने सुध्दा या संदर्भात जे चांगल्या प्रकारचे मूलभूत निर्णय घेतलेले आहेत ते मी आधी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो. मुंबईमध्ये एकंदरीत सर्व मिळून जवळजवळ 45 हजार बेड्स वेगवेगळ्या हॉस्पिटल्समध्ये आणि नर्सिंग होम्समध्ये आहेत. त्यापैकी 18 हजार 190 बेड्स खाजगी नर्सिंग होम्समध्ये आहेत. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला या नर्सिंग होम्सची किती आवश्यकता आहे याची शासनाला पुरेपूर जाणीव आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या संदर्भात सातत्याने बैठका झाल्या. मागच्या वेळी जेव्हा या सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी आपल्याला आश्वासित केले होते. मागच्या वेळी सांगितल्या प्रमाणे साधारणपणे 2010 पूर्वीचे जे नर्सिंग होम्स आहेत त्यांच्या संदर्भात स्टेअरकेस असावी, दोन दरवाजे असावेत वगैरेबाबत जो निर्णय घेतला होता त्या संदर्भामध्ये पूर्णपणे रिलॅक्सेशन देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, काही अडचणी यामध्ये येतात याची शासनाला पूर्णपणे जाणीव आहे. मध्यंतरी घडलेल्या एका

...2...

श्री. भास्कर जाधव ....

दुर्घटनेमुळे 2009 साली हा निर्णय घ्यावा लागला. त्यापूर्वी अशा प्रकारचा निर्णय नव्हता, अशा प्रकारच्या अटी नव्हत्या. परंतु आता परिस्थिती बदललेली आहे. आवश्यकता वाढावयास लागली आहे. वरचेवर होणाऱ्या दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने दुर्घटना झाल्यानंतर काळजी घेण्यापेक्षा त्यांच्या अगोदर काळजी घेणे आवश्यक असल्यामुळे हा निर्णय घेतला.

आता सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या पध्दतीने केवळ 5 ते 10 बेड्स नाही तर आम्ही जे क्लासिफिकेशन करीत आहोत त्या संदर्भात काल माननीय मुख्यमंत्र्यांनी ब्रिफींगच्या वेळेला संबंधितांना आदेश दिलेले आहेत की, सर्वांना फायर डिपार्टमेंटचा जो कायदा एकसारखा लागू केलेला आहे किंवा नोटिफिकेशन काढून त्यांना ज्या अटी आणि शर्ती लागू केलेल्या आहेत त्याच्या ऐवजी 1 ते 20 बेड पर्यंतच्या हॉस्पिटलला चांगल्या प्रकारे रिलॅक्सेशन देण्यात यावे. 20 ते 50 बेड पर्यंतच्या हॉस्पिटलला रिलॅक्सेशन देण्यात यावे. त्याच्या पुढच्या बेड्सना ज्याला हार्ड अँड फास्ट कंडीशन्स म्हणतो त्या लावण्यात याव्यात, अशा पध्दतीचा शासनाचा मनोदय आहे. आपण तात्पुरत्या कंडिशनल गोष्टीवर त्यांच्या लायसन्सचे रिन्यूअल केलेले आहे. त्या लायसन्सचे रिन्यूअल करण्यामध्ये सुध्दा कमिशनरने तो काढलेला एक व्हायामिडिया आहे. कारण लोकांना अडचणी निर्माण होऊ नये म्हणून त्यांनी एक ॲफिडेव्हीट द्यावे आणि ॲफिडेव्हीट देऊन त्यांच्या आधारे अशा प्रकारचे लायसन्स रिन्यूअल केलेले आहेत. प्रत्येक वर्षाला या नर्सिंग होम्सचे लायसन्स रिन्यूअल करावे लागत होते. आता त्यामध्ये शासनाने बदल करुन तीन वर्षानंतर या लायसन्सचे रिन्यूअल करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ पूर्वी श्री.बरवड 12:40

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली प्रमाणे 3 वर्षाचे लायसन्स देणार आहे त्याची मी स्वागत करतो. मंत्री महोदयांनी असे सांगितले की, 3 कॅटेगरीसाठी अटींमध्ये शिथिलता दिली आहे. परंतु 20 बेडसाठी नर्सिंग होमसाठी, 30 बेडच्या नर्सिंग होमसाठी, 50 बेडच्या नर्सिंग होमसाठी व त्याहून मोठ्या नर्सिंग बेडच्या नर्सिंग होमसाठी कोणत्या अटी राहणार आहेत ? त्यांना सिंगल विंडो सिस्टिम करुन ताबडतोब लायसन्स देण्याची भूमिका स्वीकारणार आहात काय, कारण मेडिक्लेमचे हजारो अर्ज प्रलंबित आहेत. त्यामुळे सामान्य माणूस, मध्यमवर्गीय लोक अशा नर्सिंग होममध्ये ॲडमिट होऊ शकत नाहीत. हा नर्सिंग होम चालण्याचा प्रश्न आहे. त्याचबरोबर मुंबईमध्ये गरीब माणसांना मेडिक्लेमचे पैसे मिळत नाहीत. 20 बेडच्या नर्सिंग होमसाठी व डे-केअर नर्सिंग होमसाठी काय सूचना केली आहे, कारण मुंबई व राज्यात डे-केअर नर्सिंग होम सुध्दा बरीच आहेत. गर्भपात केंद्रे आहेत जी पीसीपीएनडीटी ॲक्ट अंतर्गत रजिस्टर्ड आहेत. त्यांना लायसन्स मिळाले नाही तर ती बंद होतील. त्यामुळे महाराष्ट्रात गंभीर प्रश्न निर्माण होईल. हा प्रश्न देखील महत्वाचा आहे. यासाठी शासन आणखी काय करणार आहे ते या सभागृहामार्फत जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, शासनाने तत्वत: निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे आता फायर विभागाने ज्या अटी घातलेल्या आहेत. त्या अटींची वर्गवारी करीत असताना त्यातील अटी शिथिल कराव्या लागतील. त्यासंबंधी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी व आयुक्त, फायरब्रिगेडचे अधिकारी हे एकत्र बसतील. या क्षेत्रामध्ये दोन संघटना काम करतात. त्या संघटनांच्या प्रतिनिधींना चर्चेला बोलविले जाईल आणि दोन्ही संघटनांचे प्रतिनिधी, शासनाचे अधिकारी, फायरब्रिगेडचे अधिकारी एकत्रित बसतील व ही प्रक्रिया करण्यासाठी कशा प्रकारे सुसूत्रता आणता येईल...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला मंत्री महोदयांकडून उत्तर मिळत नाही. शासन कोणत्या अटींवर परवानगी देणार आहे ते सांगितले जात नाही. सभागृहात मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. त्यांनी या प्रश्नावर प्रकाश टाकावा. दक्षिण मुंबईत 1 ते 20 बेडची अनेक नर्सिंग होम्स आहेत. ती बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे त्या नर्सिंग होम्सना किती दिवसात परवानगी दिली जाणार आहे ? या संदर्भात महापालिकेच्या आयुक्तांकडे 20 बैठका झ ाालेल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती माझ्याकडे आहे. हा प्रश्न ज्वलंत आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

डॉ.दीपक सावंत....

त्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी मदत करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांची या प्रश्नाबाबतची तळमळ मला मान्य आहे. त्यांनी या सभागृहाला परिस्थती अवगत केली आहे त्याबद्दल शासन अत्यंत गंभीर आहे. या परिस्थितीमुळेच माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार या नर्सिंग होमच्या लायसन्सची मुदत 1 वर्षाऐवजी 3 वर्षाची केलेली आहे. मागील वेळी सरसकट दोन दरवाजे असले पाहिजेत, जिने असले पाहिजेत अशा अटी घातल्या होत्या. या अटींमध्ये शिथिलता देण्यात आलेली आहे. काही अर्ज प्रलंबित आहेत असे सांगण्यात आले आहे. अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावर ॲफिडेव्हिट करुन मागितले आहे. त्यातून काही लोकांचे लायसन्स रिन्यूअल केलेले आहे. यामुळे हा प्रश्न सुटत नाही. 2009 मधील दुर्घटनेनंतर हे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यानंतर अग्निशमन दलाने एक नोटीस काढली. त्यामध्ये घातलेल्या अटींमुळे ही प्रक्रिया अडचणीत आलेली आहे. या क्षेत्रात दोन संघटना काम करतात. त्यांचे प्रतिनिधी, शासनाचे अधिकारी, अग्शिमन दलाचे अधिकारी, महापालिकचे आयुक्त व त्यांचे अधिकारी एकत्र बसतील. प्रत्यक्ष काम करणाऱ्या संघटनांना सहभागी करुन घेतल्यामुळे ही सर्व प्रक्रिया सुटसुटीत कशी होईल यादृष्टीने लवकरच याच वर्षी लायसन्सचे नूतनीकरण करण्यामध्ये अडचण येणार नाही, यादृष्टीने प्रयत्न केले जातील.

**उप सभापती** : पुढील लक्षवेधी सूचनेकडे मी वळतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, अनेक मेडिक्लेमचे अर्ज प्रलंबित आहेत. आपण मला संरक्षण द्यावे.

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेला सविस्तर उत्तर दिलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : त्यांनी सबंध निबंध वाचून दाखविला आहे. परंतु ठोस असे काहीही उत्तर दिलेले नाही. शासनाच्या अटींमुळे पेशंटस्ना मेडिक्लेमचे पैसे मिळत नाहीत. याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ते सांगितले जात नाही. निदान पुढील 2-3 महिन्यामध्ये कार्यवाही केली जाईल असे तरी त्यांनी सांगावे असे आम्हाला अपेक्षित आहे.

श्री.भास्कर जाधव :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 1 ते 5 बेड, 5 ते 20 बेडबाबत प्रश्न विचारला होता. पण शासन त्याच्याही पुढे गेलेले आहे. 1 ते 20 बेडपर्यंतच्या नर्सिंग होम्सना अटींमध्ये शिथिलता देण्याची शासनाची तयारी आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:45

श्री. भास्कर जाधव...

20 ते 50 बेड पर्यन्तचे वर्गीकरण करायला शासन तयार आहे. सन्माननीय सदस्यांच्या सर्व प्रश्नांचे सकारात्मक उत्तर दिलेले असताना शासन उत्तर देत नाही असे म्हणणे बरोबर नाही. तीन वर्षाची मुदत दिली. तात्पुरते ॲफिडेव्हिट करण्यास सांगितले, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी देखील निर्णय दिलेला आहे. 1484 नर्सिंग होम्स पैकी 1056 नर्सिंग होम्सनी अर्ज केलेले आहेत. उर्वरित नर्सिंग होम्सनी अर्ज केलेले नाहीत. नियमाप्रमाणे त्यांनी महानगरपालिकेकडे अर्ज करायला पाहिजे आणि महानगरपालिकेने त्यांचा परवाना नूतनीकरण करावयास पाहिजे. काही नर्सिंग होम्सनी घाबरुन अर्ज केले नसतील तर स्वत: महानगरपालिकेने पुढाकार घेऊन त्यांच्याकडून अर्ज मागवून घेऊन परवाना नूतनीकरण करण्याची त्यांना संधी द्यावी असे शासनाने सांगितलेले आहे. हा महानगरपालिकेच्या अखत्यारितील विषय असला तरी शासन पुढकार घेऊन मार्ग काढील.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड जिल्हयातील गेवराई तालुक्याच्या गोदाकाठ परिसरात रानडुक्कर व हरिणांनी घातलेला हैदोस

**मु. शी.** : बीड जिल्हयातील गेवराई तालुक्याच्या गोदाकाठ परिसरात रानडुक्कर व हरिणांनी घातलेला हैदोस यासंबंधी सर्वश्री अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण व धनंजय मुंडे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड जिल्ह्यात विशेषत: गेवराई तालुक्याच्या गोदाकाठ परिसरात रानडुक्कर व हरिणासारख्या प्राण्यांनी घातलेला हैदोस, दुष्काळ व पाणी टंचाई यामुळे अतिशय काटकसरीने जोपासलेली ऊस, कापूस आदींसारखी नगदी पिके रानडुक्करांच्या प्रादुर्भावामुळे नष्ट होणे, यामुळे शेतकऱ्यांचे झालेले कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान, हवालदिल झालेला शेतकरी, शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे वन व महसूल विभागाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, नुकसान भरपाईसाठी शासनाने केलेली जाचक प्रणाली, संरक्षित प्रजातीमुळे रानडुक्कर व हरिणांचा बिमोड करण्यास शासकीय स्तरावरुन येत असलेल्या अडचणी, यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व प्रतिक्रिया. " "

श्री. भास्कर जाधव (वने राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

==3==



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, हा केवळ गेवराई तालुक्याशी संबंधित असा विषय नाही. गोदाकाठच्या अनेक भागामध्ये रानडुक्कर आणि हरिणांचा प्रादुर्भाव होत असतो. एका गेवराई विधानसभा मतदारसंघामध्ये रानडुकरांची संख्या 20 हजार पेक्षा कमी नाही आणि हरिणांची संख्या देखील तेवढीच आहे. हे प्राणी शेतीचे अतोनात नुकसान करतात. त्या भागत सोयाबीन,, भूईमूग होत नाही. कापसाचे शेंडे देखील हे प्राणी मारतात. प्रत्येक शेतक-याचे ऊसाचे पीक या प्राण्याच्या प्रादूर्भावामुळे 25 ते 30 टक्क्याने कमी येते. विभागाकडे तक्रार केल्यानंतर विभागाने रान डुकरांची शिकार करण्यास सांगितले. शिकार करण्यासाठी साधने नाहीत. एका रान डुकराने तीन जणांवर हल्ला केला. त्यातील एक जण मृत्यू पावला. या रानडुकरांच्या प्रादूर्भावाकडे मी शासनाचे या लक्षवेधी सूचनेद्वारे लक्ष वेधित आहे.

शासनाने जी काही नुकसान भरपाई जाहीर केलेली आहे ती अशी आहे :- 2 हजार रु.पर्यंत नुकसान झाले तर 500 रुपये नुकसान भरपाई दिली जाते, 10 हजार रु.पर्यंत नुकसान झ ाले तर 2 हजार रु. नुसान भरपाई दिली जाते, आणि 10 हजार रु.पेक्षा जास्त नुकसान झाले तर 6000 रु. नुकसान भरपाई दिली जाते. 1 टन ऊसाचे नुकसान झाले तर 400 रु. नुसान भरपाई दिली जाते, इतकेच नाही तर त्यासाठी चार वेगवेगळ्या अधिका-यांनी एकत्र बसून हे नुकसान झ ालेले आहे हे ठरवावे लागते. तसेच झालेल्या नुकसानीचा अहवाल शासनाला 5 दिवसाच्या आत सादर करावा लागतो. चार वेगवेगळया विभागाचे अधिकारी हे एकाच वेळी बसू शकत नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, याबाबतीत तहसीलदारांच्या नेतृत्वाखाली पथक नेमण्यात येईल काय ? तसेच ऊसासाठी देण्यात येणारी नुकसान भरपाई 400 रुपयावरुन 1000 रुपये आणि इतर पिकासाठीची नुकसान भरपाई दुपटीने वाढवून देण्यात येईल काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मुलभूत असे तीन प्रश्न विचारलेले आहेत. या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी एका गोष्टीचे कौतूक व अभिनंदन केले पाहिजे की, आमचे मंत्री महोदय हे नेहमी सांगतात की, हे फॉरेस्ट खाते मी मुद्दाम मागून घेतले आहे. ते ज्यावेळी असे सांगतात, त्यावेळी आपणास तो थोडासा विनोद वाटतो. देशात एकंदरीत वाघांची संख्या किती आहे या बाबतीत दिनांक 28 मार्च, 2001 पर्यंतची माहिती छापून आलेली आहे.त्यानुसार आपल्या राज्यामध्ये 2006 रोजीपर्यंत फक्त 103 वाघ होते. त्याच्या ऐवजी अधिकृतपणे जास्तीत जास्त 196 परतु सरासरी 169 वाघ आपल्या राज्यामध्ये झालेले आहेत. राज्यात मोठ्या प्रकारे वन संपदा वाढली आहे, तशाच पध्दतीने राज्यामध्ये प्राण्यांची संख्या वाढली आहे. मला त्यांच्या उत्तम नियोजनाचा नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळाली म्हणून त्याचा मनाचा मोठेपणा आहे, म्हणून आपल्याला सर्वांना आनंद वाटला पाहिजे.

महोदय,सन्माननीय सदस्यांनी एका रानडुकराने हल्ला केल्याने एका महिलेचा मृत्यू झााल्याची बाब सभागृहासमोर आणलेली आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये तशा प्रकारचा काही उल्लेख नाही. परंतु रानडुकराच्या हल्ल्यामुळे त्या महिलेचा मृत्यू झाला असेल तर आज आमचा विभाग मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना दोन लाख रुपयांची मदत देत आहे. या ठिकाणी दुसरा प्रश्न उपस्थित केला गेला, त्या बाबतीत सांगू इच्छितो की, ऊसाला प्रति क्विंटल 410 रुपये दिले जातात. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असा होता की, त्यांना आधारभूत किंमत देतो. परंतु किंमत देणे आणि मदत करणे याच्यामध्ये फरक आहे. आमचा विभाग किंमत देत नाही, त्यांना मदत करतो. माननीय मंत्री महोदयांनी आपल्या अनुभवाचा फायदा चांगला करुन दिलेला आहे. मी हा जी.आर.बारकाईने वाचत होतो. तेव्हा बाकीच्या विषयातील किंमत वाढविण्याकरिता किंवा मदतीची रक्कम वाढविण्याकरिता म्हणून पुन्हा विषय सादर करण्यात येईल.

महोदय,ऊसाच्या बाबतीत नुकसान भरपाई द्यावयाची झाली तर गेल्या तीन वर्षाचा अनुभव घेऊन परस्पर मदतीची रक्कम वाढविण्यात येईल अशा प्रकारे त्यांनी त्यांचा अनुभवाचा फायदा करुन घेतलेला आहे. सगळया बाबतीत जी नुकसान भरपाई करणार आहोत वा मदत देणार आहोत, ती दुप्पट मिळावी अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे आहे. तसेच प्राण्याच्या हल्ल्यांमुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई 5 लाख रुपयांपर्यंत मिळावी यासंबंधीचा आमचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : ऊसाच्या संदर्भात काही निर्णय घेणार असल्याचे या ठिकाणी सांगितले गेले. ऊस पिकाचे नुकसान झाले तर अधिकृतपणे किती नुकसान भरपाई दिली जाणार आहे आणि इतर पिकांसाठी नुकसान भरपाई दुपटीने करणार आहात की नाही यासंबंधीचा मी उल्लेख केलेला नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी यासंबंधी उल्लेख केला आहे. फळझाडे, शेती पीक, प्राण्याच्या हल्ल्यामुळे मृत व्यक्तीच्या बाबतीत नुकसान भरपाईची रक्कम आज आहे. त्यात मृत व्यक्तीच्या बाबतीत आज नुकसान भरपाईची रक्कम देण्यात येत आहे, ती रक्कम किमान 5 लाख रुपयांपर्यत व सर्व बाबतीत दुप्पट करावी असा आमचा प्रस्ताव आहे आणि त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळतो आहे.

-----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत**

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 3 नंतर ठेवण्यात यावी अशा प्रकारची सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी लेखी पत्राव्दारे विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य केली असल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचनेवरील चर्चा नंतर घेण्यात येईल.

**नियम 93 अन्वयेच्या निवेदनाबाबत**

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी नियम 93 अन्वये दिलेल्या सूचने संदर्भातील निवेदने सभागृहासमोर आलेली आहेत. सदरहू निवेदने ही गृह विभागाशी संबंधित आहेत. या निवेदनावरील आज चर्चा न ठेवता उद्या ठेवण्यात यावी अशा प्रकारची विनंती माननीय गृहमंत्र्यांनी केलेली आहे. त्यामुळे या दोन्ही निवेदनावरील चर्चा उद्या ठेवण्यात येईल. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 4 घेण्यात येईल.

----------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानच्या भुयारी कामास मंजुरी मिळूनही अद्याप कामास सुरुवात न होणे

**मु. शी.** : खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानच्या भुयारी कामास मंजुरी मिळूनही अद्याप कामास सुरुवात न होणे यासंबंधी श्रीमती दिप्ती चवधरी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा ( कृष्णा खारे पाटबंधारे महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते..

" पुणे येथील खडकवासला कालव्याची कोटयावधी रुपये किंमतीची जागा खाजगी विकासकाला देऊन या महसुलामधून 700 कोटी रुपये किंमतीचा खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानचा भुयारी कालवा बांधण्याच्या कामास राज्य शासनाने मंजुरी दिल्यानंतरही अद्यापप्रत्यक्षात कामात अजिबात सुरुवात न होणे, त्यामुळे दरवर्षी 5 टीएमसी पाणी वाया जाणे, खडकवासला ते फुंरसुंगी दरम्यानच्या 24 किलोमीटरच्या पट्टयात हा भुयारी कालवा काढण्याचा प्रस्ताव असणे, पुणे शहराला वाढत्या मागणीनुसार पाणीपुरवठा करु शकेल असे धरण बांधण्यासाठीची जागा उपलब्ध नसल्याने पाण्याची गळती, चोरी आणि बाष्पीभवन रोखण्यासाठी भुयारी कालवा हा उत्तम पर्याय ठरेल असे या प्रस्तावात नमूद असणे, खडकवासला धरणाच्या मुखाशी हा भुयारी कालवा सुरु होऊन धायरी,कात्रजमार्गे डोंगरातून फुरसुंगीपर्यंत नेण्याच्या या प्रस्तावित कालव्यासाठी जमीन संपादन व सर्वेक्षण होऊन शासनाने संबंधित प्रस्तावाला मान्यता देण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया".

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी : पुणे शहराच्या वाढत्या मागणीनुसार पाणी पुरवठा करु शकेल असे धरण बांधण्यासाठीची मागणी होत असताना या ठिकाणी पुणे शहर ते खडकवासला ते फुरसुंगी धरणाचा भुयारी कालवा बांधण्याच्या कामास राज्य शासनातर्फे मंजुरी देण्यात आली आहे अशी बातमी आम्ही वृत्तपत्रात वाचली आहे. सदर कामास राज्य शासनाने खरोखरच मंजुरी दिली आहे काय, या योजनेच्या अंमलबजावणीचे काम महाराष्ट्र शासनाने सुरु केले आहे काय ?

यानंतर श्री. भोगले....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4............ श्रीमती दिप्ती चवधरी.........

जलसंपदा विभाग आणि नगरविकास विभाग किंवा कृष्णा खोरे महामंडळ आणि नगरविकास विभाग यांची या प्रस्तावाबद्दल चर्चा झाली आहे का? हा प्रकल्प होण्याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. शासन स्वत:च्या निधीतून किंवा केंद्राच्या निधीतून हा प्रकल्प राबविणार आहे की खाजगी विकासकामार्फत राबविण्यात येणार आहे?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी पुण्याच्या पाणी पुरवठ्याबाबत अत्यंत संवेदनशील प्रश्न उपस्थित केला आहे. कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाचे जे कालवे पुणे शहरातील रस्त्यांमुळे अडलेले आहेत त्यात खडकवासला ते फुरसुंगी दरम्यान जुना मुठा कालवा हा एक प्रश्न आहे. जुना उजवा मुठा कालव्याला जोडून पाईपलाईन गेली असून नवीन मुठा कालवा 202 मीटरचा असून तो खडकवासला ते फुरसुंगी असा आहे.

सभापती महोदय, कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाने 2005 मध्ये एक ठराव केला होता. या कालव्यांचे रस्त्यात रुपांतर करुन त्यातून निर्माण होणारा टीडीआर महामंडळाला देण्यात यावा. त्या पध्दतीने आम्ही उजव्या कालव्याच्या प्रस्तावाबाबत सर्व्हे सुरु केला आहे. एक महिन्यात तो पूर्ण होईल. हा ठराव महापालिकेकडे गेल्यानंतर त्यांनी जुन्या कालव्यासंबंधी एक निर्णय केला आणि ठराव करुन तो शासनाकडे पाठविला. टीडीआर दिला तरच हा प्रस्ताव पुढे जाऊ शकेल. कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाकडे असलेली अपुरी तरतूद लक्षात घेऊन महामंडळाने तसा ठराव करुन महापालिकेकडे आणि महापालिकेनेही ठराव करुन शासनाकडे पाठविलेला आहे. 2008 मध्ये शासनाने कळविले की, वॉटर बॉडीचे झोनिंग असेल तर टीडीआर देता येणार नाही. परंतु महापालिकेच्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये आरक्षण दाखविलेले आहे. शासकीय जमिनीला आपण टीडीआर देऊ शकत नाही. या संदर्भात नगरविकास विभागातर्फे काही सुधारणा करुन घेतली तर निश्चितपणे या बोगद्याच्या प्रस्तावामुळे पुणे शहराला 3 ते 4 टीएमसी पाणी अधिकचे उपलब्ध होईल.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे महापालिकेने नुकताच मंजूर केलेला नवीन विकास आराखडा प्रसिध्द होण्याच्या मार्गावर आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी असा निर्णय घेतला की, रस्त्याबाबत प्राधान्याने जे आरक्षण आहे त्या रस्त्याच्या आरक्षणाबाबत कायदेशीर ......





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4........... श्री.अनिल भोसले....

कारवाई ताबडतोब करण्यात येऊन जमीन ताब्यात घेण्यात यावी. जर वॉटर बॉडीचे आरक्षण असेल आणि नवीन डीपीमध्ये रस्त्याचे आरक्षण दाखविले असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांनी खडकवासला ते फुरसुंगीपर्यंत बोगद्यातून पाणीपुरवठा करण्यास महापालिकेला सहकार्य करण्याकरिता वॉटर बॉडीचे आरक्षण तातडीने उठवून रस्त्याचे आरक्षण केले जाईल काय?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आपला ठराव झाल्याची माहिती माझ्या कानावर आली आहे. या संदर्भातील प्रोसेस होऊन ठराव शासनाकडे येईल त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांकडे या विषयाबाबत चर्चा होऊन त्या संबंधीचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.अनिल भोसले : टनेलचे काम लवकर होण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी हा प्रस्ताव तातडतोब मंजूर केला तर पुणे शहराला तातडीने पाणी पुरवठा होऊ शकतो. महापालिकेने प्रस्ताव पाठविल्यानंतर तातडीने निर्णय घेण्यात येईल काय?

(उत्तर आले नाही)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे शहराच्या दृष्टीकोनातून मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर महत्वाचे आहे. शासकीय जमिनीला टीडीआर देता येत आहे असे मंत्री महोदयांनी स्पष्ट उत्तर दिलेले आहे. एकदा टीडीआर मंजूर करण्याचा पायंडा पडला तर खाजगी विकासकांना रस्त्याबद्दलचा टीडीआर मंजूर करण्यासाठी मोठया प्रमाणात जमिनीची मोडतोड होईल. आपण उत्तर दिलेले आहे.

नंतर वाय.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ नीलम गोऱ्हे ..........

यासंदर्भात आपण महानगरपालिकेला उत्तर कळविले असून सुध्दा या ठिकाणचा टीडीआर खाजगी विकासकांना द्यावा असा प्रस्ताव या महानगर पालिकेने केलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात दुसऱ्या कोणत्या मार्गाने पाऊल उचलता येईल यासाठी सन्माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर दोन्ही सभागृहाच्या संबंधित आमदारांची एकत्रित बैठक घेतली जाणार आहे काय ? या कालव्याचा रस्त्याचा टीडीआर देण्यामध्ये अनेक आमदारांचा विरोध आहे हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छिते.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर सभापती महोदय, कृष्णा महामंडळाला यासाठी जवळपास 1000-1500 कोटी रुपये इतका खर्च येईल असा अंदाज आहे. अर्बन डेव्हलपमेंटच्या योजनेतून हे पैसे येणार असतील तर आनंदाची गोष्ट आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी म्हटले आहे की, यासंदर्भात टीडीआरचा ठराव झालेला आहे. परंतु यासंदर्भात टीडीआरचा ठराव झालेला नाही हे मी येथे स्पष्ट करु इच्छितो. जुन्या डाव्या कालव्याला वॉटर बॉडीच्या ऐवजी रस्ते दाखवावेत असा एक ठराव आहे व नवीन ऊजवा कालव्याचा सर्व्हीस रोडला रस्ता दाखववावा असा ठराव आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भोसले यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. या स्टेटसला हरकती आलेल्या आहेत. एमआरटीपी ॲक्टच्या प्रोसिजर प्रमाणे जेव्हा ही बाब शासनाकडे येईल त्यावेळेस योग्य तो विचार होईल. पवर्तीच्या ठिकाणी असेलेली गळती, अस्वच्छता, केरकचरा आहे ही वस्तुस्थिती आहे. सेव्हींग होणार असेल तर त्यासाठी निधी मिळवण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करुन बैठक घेण्यात येईल एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

-----------

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात ट्रक व कंटेनरच्या माध्यमातून क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होत असणे

**मु. शी.** : राज्यात ट्रक व कंटेनरच्या माध्यमातून क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होत असणे यासंबंधी सर्वश्री सर्वश्री. विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री. रामनाथ मोते ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात क्षमतेपेक्षा जास्त माल भरुन वाहतूक करणाऱ्या ट्रक तसेच कन्टेनरचे प्रमाण दिवसेंदिवस वाढणे, सर्वोच्च न्यायालयाने २००५ साली सर्व रस्त्यांवर अशा प्रकरच्या वाहतुकीवर बंदी घालण्याचे दिलेले आदेश CRISIL या संस्थेने केलेल्या अभ्यासान्वये क्षमतेपेक्षा १० टक्के जास्त माल वाहतूक केल्याने महामार्गाचे आयुष्य ३५ टक्क्यांनी घटणे, वाहनांच्या मागील बाजूस टेल लॅम्प व पुढचे हेड लाईट चांगल्या व सुस्थितीत नसणे, वेग मर्यादा न पाळणे, वाहनांच्या मागील बाजूस बंपरला किंवा डिक्कीला रेट्रो रिफ्लेक्टीव्ह लाल रंगाची टेप न लावणे, घाई-घाईने किंवा निष्काळजीपणे ओव्हरटेक करणे, नियमाप्रमाणे गाडीचे आयुष्य संपले असताना देखील त्याचा धोकादायकरित्या माल वाहतुकीसाठी वापर करण्यात येणे, इत्यादी आरटीओने घालून दिलेल्या अनेक नियमांचे सर्रासपणे उल्लंघन होणे, परिणामी अपघातांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, नागरिकांमध्ये विशेषत: अपघातग्रस्तांमध्ये शासनाविषयी तीव्र संताप व असंतोष पसरणे, अवैध वाहतूकदारांशी संगनमत करुन नियमानुसार कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच अवैध वाहतूकदारांवर कडक कारवाई करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. गुलाबराव देवकर ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, वाहनातून जास्त माल भरुन नेला जात असल्यामुळे मोठया प्रमाणात अपघात होत असतात. अपघाताची जी काही कारणे आहेत त्यामध्ये ओव्हरलोड हे एक महत्वाचे कारण आहे. ओव्हरलोड वाहनामुळे रस्ते मोठया प्रमाणात खराब होत असतात. ओव्हरलोड वाहनांवर विशेष मोहिमेअंतर्गत कारवाई केली जाते परंतु यामध्ये फार कमी प्रमाणात दंड वसूल केला जातो. माल वाहतुकीमध्ये शेकडो कोटींचा भ्रष्टचार होतो आहे ही वस्तुस्थिती आहे. विशेष पासेस देऊन ठराविक वाहनांना ओव्हरलोड नेण्याची मोकळीक दिली जाते. यामध्ये स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांचे संगनमत असते. त्यामुळे मला विचारावयाचे आहे की, ओव्हरलोडचा जो दंड ठेवला आहे तो अतिशय कमी आहे. सुप्रिम कोर्टाने ओव्हरलोड वाहने सिज करावी असे म्हटले आहे. त्यामुळे ओव्हरलोडच्या संदर्भात दंड वाढवला जाणार आहे काय ? आपल्याकडे मोठया प्रमाणात टोल नाके असल्यामुळे त्या ठिकाणी प्रत्येक वाहनाची माहिती मिळत असते. त्यामुळे सर्व्हीलियन्स कॅमेऱ्याच्या माध्यमातून यासंदर्भात काही उपाययोजना केली जाणार आहे काय ? ओव्हरलोड वाहन आढळून आले व त्याची माहिती कोणी फोन करुन विभागाला दिली तर त्यासंदर्भात कारवाई केली जाईल काय ? इकॉनॉमिक ऑफेन्स विंगच्या माध्यमातून ओव्हरलोड वाहनाच्या संदर्भातील भ्रष्टाचाराची चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर :सभापती महोदय, ओव्हरलोडच्या संदर्भात मोटरवाहन कायदा 1988 च्या कलम 113 व 114 अन्वये ओव्हरलोडसाठी कायद्यामध्ये गुन्हयाची तरतूद करण्यात आलेली आहे. 194 कलमान्वये दंडाची वसुली करण्यास ते वाहन पात्र असते. ओव्हरलोड वाहनावर कारवाई करण्याच्या संदर्भात सातत्याने परिवहन विभागाच्या माध्यमातून कारवाई केली जात आहे. यासाठी 61 भरारी पथके काम करीत असून गेल्या 5 वर्षामध्ये मोठया प्रकारात कारवाई करुन दंडाची रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

ओव्हरलोड वाहनांसाठी कलम 194 अन्वये कारवाई करण्यात येते परंतु त्यामध्ये दंडासंदर्भात काही मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

ट्रकच्या लांबीपेक्षा ट्रकमध्ये लोड केलेल्या पाईपची लांबी 10-10 फूट लांब असते. तेव्हा अशा प्रकारे वाहतूक करणाऱ्या किती ट्रक्सवर आतापर्यंत कारवाई केलेली आहे याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या संदर्भातील माहिती निश्चितपणे पटलावर ठेवण्यात येईल.

-------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** मुंबईतील मुलुंड येथील वन विभागा लगत असलेल्या झोपडपट्टीतील रहिवाशांचे पुनर्वसन त्याच परिसरात करणे

**मु. शी.** : मुंबईतील मुलुंड येथील वन विभागा लगत असलेल्या झोपडपट्टीतील रहिवाशांचे पुनर्वसन त्याच परिसरात करणे या संबंधी सर्वश्री चरणसिंग सप्रा व संजय दत्त,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चरणसिंग सप्रा ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील मुलुंड येथील वन विभागा लगत असलेल्या राहुलनगर, शंकरटेकडी, गणेशपाडा, पंचशीलनगर, हनुमानपाडा या ठिकाणी 50 ते 60 वर्षापासून असलेल्या झोपडपट्टी वसाहतीच्या हद्दीबाबत दुमत असल्याकारणाने संपूर्ण विभागाची वन व महसुल विभागाद्वारे नगर भूमापन अधिकारी, मुलुंड ता.कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगर यांच्या अधिकार कक्षेत दिनांक 1 ऑक्टोबर, 2012 रोजी झालेल्या संयुक्त तपासणीचा तपशीलवार निर्णय अद्यापपर्यंत उपलब्ध झालेला नसणे, स्थानिक लोकनेत्यांच्या पाठपुराव्यामुळे सन 2010 मध्ये हनुमानपाडा येथील 3 एकर 28 गुंठे जमिनीचा ताबा महसूल विभागाकडे देण्यात आलेला असणे, मात्र, त्यांच्या पुनर्वसनासाठी शासकीय यंत्रणेकडून मुलुंडपासून दूर इतर ठिकाणी करण्याचे नियोजित असणे, या रहिवाशांची उदरनिर्वाहाची साधने तसेच पाल्यांच्या शाळा/महाविद्यालये याच परिसरात असल्याने याला पर्याय म्हणून मुलुंडमधील वनमुक्त घोषित झालेल्या तसेच इतर पब्लिक हौसिंगसाठी आरक्षित असलेल्या भूखंडांवर सदर रहिवाशांचे पुनर्वसन करण्याची नितांत आवश्यकता, त्याचप्रमाणे शासनाने मुलुंड कॉलनी येथे सिंधी, पंजाबी लोकांच्या वस्तीसाठी सनद दिलेली असतांना देखील वन विभाग या भागात हक्काचा दावा करत असल्यामुळे येथील रहिवाशांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, या बाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.पतंगराव कदम ( वने मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, मुंबईतील मुलुंड येथील 7 हजार झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या जवळपास 35 ते 45 हजार लोकांचा प्रश्न आहे. निवेदनामध्ये म्हटले आहे की, त्या ठिकाणी वन विभागाची 6.36 एकर जागा आणि महसूल विभागाची 10 एकर 13 गुंठे जागा आहे. परंतु आतापर्यंत तेथील जागेचे डिमार्केशन झालेले नाही. जिल्हाधिकारी, तहसीलदार, कुर्ला, नगर भूमापन अधिकारी,मुलुंड हे त्या जागेची मोजणी करीत आहेत. जोपर्यंत त्या जागेची मोजणी होत नाही, डिमार्केशन होत नाही, तोपर्यंत शासनाने तेथील झोपडपट्टीत राहणाऱ्या रहिवाशांना निष्कासित करु नये. त्या ठिकाणी वन विभागातील कर्मचारी राहत आहेत. सन 2008 मध्ये असा निर्णय झाला होता की, जे पात्र झोपडपट्टीधारक आहेत त्यांनी साठ हजार रुपये भरल्यानंतर त्यांचे वन विभागामार्फत पुनवर्सन करण्यात येईल. साठ हजार रुपये भरण्यासाठी देण्यात आलेला कालावधी खूप कमी होता. हा प्रश्न फक्त मुलुंड येथील झोपडपट्टीधारकांचा प्रश्न नाही तर मालाड, बोरिवली, दहिसर येथील झोपडपट्टीत राहणाऱ्या 79 हजार रहिवाशांचा देखील प्रश्न आहे. साठ हजार रुपये भरण्यासाठी तीन दिवसांची मुदत देण्यात आली होती आणि त्यासाठी फक्त तीन खिडक्या ठेवण्यात आल्या होत्या. त्या झोपडपट्टीत राहणारे लोक हे दलित आणि दारिद्र्य रेषेखालील आहेत.

सभापती महोदय, माझा प्रश्न आहे की, साठ हजार रुपये भरण्याची मुदत शासन वाढवून देणार काय ? मुलुंड मध्ये सात हजार झोपडपट्टीधारक आहेत. त्या ठिकाणी 10 एकर जागा उपलब्ध आहे. या जागेवर झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन होऊ शकते. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री देखील उपस्थित आहेत. निवेदनात म्हटले आहे की, 10 एकर जागेवर पुनर्वसन करण्यास हरकत नाही. तेव्हा मुलुंड येथील 7 हजार झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन चांदिवली, मानखुर्द येथे न करता मुलुंड येथील 10 एकर जागेवर एमएमआरडीए, एसआरए किंवा म्हाडामार्फत करण्यात येईल काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, या प्रश्नाच्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयात सहा वेळा निर्णय झालेला आहे. तसेच मुदतवाढ देण्यास माननीय उच्च न्यायालयाने बंदी घातलेली आहे. तरी देखील



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे आणि मानवतेच्या दृष्टीकोनातून तेथील रहिवाशांना सहा महिन्यांची मुदत वाढवून देता येईल का याबाबत माननीय उच्च न्यायालयाला विनंती करण्यात येईल. माननीय उच्च न्यायालयाने परवानगी दिली तर शासन त्याचा जरुर विचार करेल.

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, मी तेथील झोपडपट्टीधारकांना निष्कासित करु नये असा प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर माननीय मंत्री देतील काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, हे काम महसूल विभागामार्फत सुरु आहे. माननीय उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा संजय गांधी उद्यानातील चार-पाच झोपडपट्टयांसंदर्भातील आहे. त्यांचे पुनर्वसन चांदिवली येथे केलेले आहे. मुलुंड येथील झोपडपट्टयांचे पुनर्वसन एसआरए मार्फत करण्यात येईल काय असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. या प्रकरणा संदर्भातील एसआरएची फाईल वन विभागाकडून माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे जाईल. त्यानंतर त्या फाईलवर निर्णय होईल.

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, जोपर्यंत डिमार्केशन होत नाही, नगर भूमापन अधिकाऱ्यांचा रिपोर्ट येत नाही तोपर्यंत तेथील झोपडपट्टीधारकांना निष्कासित न करण्याचा निर्णय घेण्यात येईल काय ?

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : महोदय, अहवाल येईपर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छिते की, उच्च न्यायालयाच्या वर सर्वोच्च न्यायालय आहे हे आपण मानता की नाही ? 2001 नंतर 2008 ला सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले आहेत की, हा विषय तक्रार निवारण समिती, उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारात नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने असेही आदेश दिले होते की, या संदर्भात स्टॅट्युटरी ऑथॉरिटीने म्हणजेच जिल्हाधिकारी किंवा डीआयएलआर यांनी कोणत्या झोपड्या वन विभागाच्या जमिनीवर आहेत आणि कोणत्या झोपड्या वन विभागाच्या जमिनीवर नाहीत याची मोजणी 4 आठवड्यांत करुन द्यावी. शिवाय त्यांनी अशी मुभा दिली होती की, जी ऑथॉरिटी तुम्हाला जवळची वाटेल त्यांच्याकडून आपण ही मोजणी करुन घेऊ शकता. परंतु वन विभागाने दादागिरीने जास्तीच्या जमिनी लाटल्या आहेत. वन विभागाने 79 हजार लोकांची घरे तोडली आहेत. महोदय, या विषयी मंत्रालयातील पत्र माझ्याकडे आहे. त्यात स्पष्टपणे नमूद केले आहे की, एक विशेष बाब म्हणून या प्रकरणी सर्व्हे करुन घ्यावा. परंतु ते आदेश न पाळता वारंवार या प्रकरणी उच्च न्यायालयाचे आदेश असल्याचे सांगितले जाते. शिवाय वन विभागाने उच्च न्यायालयात जो नकाशा दिला तो चुकीचा आहे. कारण वन विभागाला नकाशा करण्याचा अधिकार नव्हता. नेहमी 1997/305 ची आदेश दाखविली जाते.

महोदय, मोजणी करुन घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने 2008 मध्ये चार आठवड्यांची मुदत देऊन, ती जमीन वन विभागाची आहे की नाही हे ठरविण्यास सांगितले होते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी सुध्दा या बाबत आदेश दिले होते. परंतु सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन आजपर्यंत केले नाही. मी स्पेसिफिक महसूल विभागाला विचारते की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्या लोकांच्या जमिनीची मोजणी करुन देण्यात येईल काय ? कारण या विषयी गेली 13 वर्षे वन विभागाकडे विचारणा करुन आम्ही कंटाळलो आहोत. अधिकाऱ्यांनी बिल्डरांशी संगनमत करुन तेथील जमिनी विकण्याचे काम केले त्या ठिकाणी मोठमोठे टॉवर उभे राहिले आहेत. मालाड-239 मधील 572 एकर जमीन मुंबई महानगरपालिकेला तबेले हटविण्यासाठी दिली होती. परंतु मुंबई महानगरपालिकेने सांगितले की, आम्ही मीरा रोडला तबेले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

हटविणार असल्यामुळे आम्हाला ही जमीन नको. वन विभागाने ती जमीन परत घ्यावयास हवी होती. परंतु वन विभागाने 572 एकर जमीन परत घेतली नाही. महोदय, ज्या जमिनी वन विभागाच्या हद्दीत नाहीत त्या जमिनीवरील गरीब लोकांच्या झोपड्या तोडून त्या जमिनीवर वारंवार अधिकार दाखविला जात आहे. मी स्पेसिफिक एवढेच विचारते की, या संदर्भातील सर्व्हे कधी करणार आहात आणि वन विभागाकडून आम्हाला कधी मुक्ती देणार आहात ?

डॉ.पतंगराव कदम : महोदय, उच्च न्यायालयाच्या वर सर्वोच्च न्यायालय आहे हे सर्व देशाला आणि जगाला माहीत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे सर्वांना बंधनकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आमच्याकडे आला असेल तर तो तपासून त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, मी मंत्री महोदयांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत 10 वेळा दिली आहे. तसेच आतापर्यंत जे जे मुख्यमंत्री होऊन गेले त्यांना सुध्दा या निर्णयाची प्रत 10 वेळा दिली आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारु इच्छिते की, ज्या ज्या अधिकाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले नाही त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? आज आमचे रक्त जळत आहे. त्या ठिकाणी गरीब बायका गेली 15 वर्षे दारिद्र्याच्या अवस्थेत राहत आहेत. प्लास्टीक कागदाच्या झोपडीत आणि बांबूच्या झोपडीत ते लोक राहत आहेत. वन विभागाने त्या भागातील शाळा तोडल्या आहेत. महोदय, हा 79 हजार लोकांचा प्रश्न आहे. त्या जमिनीवर संबंध नसताना वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी 12 वर्षे त्या लोकांवर अन्याय केला आहे. त्या ठिकाणी दलित आणि मागासवर्गीय लोक मोठ्या प्रमाणावर राहत आहेत. माननीय मुख्यमंत्र्यानी 7 तारखेला या विषयी बैठक बोलाविली होती आणि त्या जमिनीच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले होते. परंतु अजूनपर्यंत सर्वेक्षण झाले नाही. सध्या माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, त्यांनी या विषयी काय भूमिका घेतली आहे, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यात येणार आहे की नाही ?

डॉ.पतंगराव कदम : महोदय, सर्वोच्च न्यायालयाने हद्द मोजण्याबाबत कोणतेही आदेश दिलेले नाहीत.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये 'सर्व्हे' हा शब्द नसला तरी त्या लोकांच्या झोपड्या वन विभागाच्या हद्दीत आहेत की बाहेर आहेत याची मोजणी करण्यास सांगितले आहे. मी पुन्हा स्पेसिफिक विचारते की, या बाबतचा सर्व्हे वन विभागाचे नव्हे तर महसूल विभागाचे अधिकारी किती दिवसांत करणार आहेत ?

(उत्तर आले नाही.)

श्रीमती अलका देसाई : महोदय, मुलुंड पश्चिमेच्या परिसरात शंकर टेकडी, हनुमान पाडा आणि इतर झोपडपट्टया गेल्या 50-60 वर्षांपासून वन विभागाच्या जागेवर असून, त्या ठिकाणी लोक राहतात या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

त्या शंकर टेकडीच्या बाजूला श्रीमंतांच्या ज्या मोठमोठ्या वसाहती झाल्या त्यांना आपले ना हरकत प्रमाणपत्र मिळते. परंतु या झोपडपट्टीतील लोकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करावे अशी आमची वर्षानुवर्षाची मागणी आहे ती मागणी शासन कधी मान्य करणार ? कारण आम्ही कल्याण-डोंबिवलीला अजिबात शिफ्ट होणार नाही. त्या ठिकाणी जी 10 एकर जमीन आहे ती त्याच वस्तीतील लोकांना वन खाते देणार आहे की नाही ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, चांदिवलीला घरे बांधून तयार आहेत. 618 लोकांचे पुनर्वसन केलेले आहे. आता सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, त्याच ठिकाणी पुनर्वसन करणार का ? ही बाब पुन्हा एकदा तपासून पाहण्यात येईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, लोकशाही आघाडीचे सरकार हे गोरगरिबांचे, दीनदलितांचे सरकार आहे. आमचे ज्येष्ठ नेते परम आदरणीय मंत्री डॉ. पतंगराव कदम हे संवेदनशील मंत्री म्हणून ओळखले जातात. या लक्षवेधी सूचनेमधील एक विषय मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मुलुंड कॉलनीमध्ये सिंधी, पंजाबी लोकांच्या वस्तीसाठी सनद दिलेली आहे. ती सनद त्यांच्याकडे उपलब्ध आहे. पाकिस्तानच्या फाळणीच्या वेळी आलेले रेफ्युजी त्या काळापासून त्या ठिकाणी राहतात. जसा उल्हासनगरमध्ये रेफ्युजी कॅम्प झाला तसा मुलुंडमध्ये कॅम्प झाला होता. त्या काळापासून राहणाऱ्या लोकांना सुध्दा विस्थापित करुन तुम्ही येथील नाहीत असे मुद्दे जर उपस्थित केले गेले तर कोठे तरी या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टीकोनातून पाहण्याची गरज आहे. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब यांची राम लक्ष्मणाची जोडी आहे. या दोघांनी जर ठरविले आणि यासंबंधी बैठक बोलविली तर लवकरात लवकर हा प्रश्न सुटू शकेल. असे ते करतील का ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी राम लक्ष्मणाचा उल्लेख केला. मग श्री. नारायण राणे कोण हा प्रश्न पडलेला आहे. त्याचा खुलासा केला पाहिजे. हनुमान कोण ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, युती शासनाच्या वेळेला या प्रश्नावर फक्त राम पंडागळे मंत्रालयावर लाखो लोकांचा मोर्चा घेऊन आलेला आहे. कोणी हजार दोन हजार लोकांचे मोर्चे काढले असतील पण लाखो लोकांचा मोर्चा फक्त राम पंडागळे घेऊन आलेला आहे. माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. हायकोर्टाने जे अनेक आदेश दिले ते दुर्देवाने या झ ोपडपट्टीवासियांच्या विरोधातच दिले. सुप्रीम कोर्टापर्यंत फक्त राम पंडागळे पोहोचला. परंतु त्या ठिकाणी सुध्दा न्याय मिळाला नाही. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी सांगितल्याप्रमाणे हे मायबाप सरकार आहे. विशेषत: माननीय मंत्री डॉ. पतंगरावजी कदम हे गोरगरिबांचे कैवारी म्हणून महाराष्ट्रात ओळखले जातात. हा गरिबांचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे 79 हजार लोकांची ती वस्ती होती. विशेषत: मालाडला आणि मुलुंडला सर्वात मोठी वस्ती होती.

यानंतर श्री. खंदारे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे...

सभापती महोदय, त्यावेळी 50 ते 55 हजार झोपड्या पाडल्या होत्या. 1995 चा आदेश आपण मानतो. एका बाजूला 2000 सालापर्यंतच्या झोपडपट्टयांना संरक्षण देण्याची राज्य सरकारची भूमिका आहे. दुसऱ्या बाजूला या झोपडपट्टयांबाबत 1995 चा उल्लेख केला जातो. या झ ोपडपट्टयांबाबत शासनाने थोडेसे सहानुभूतीने बघावे. त्या झोपडपट्टयांमध्ये गोरगरीब, पददलित व मागासवर्गीय कुटुंब राहतात. उत्तर भारतीय राहतात. यांच्या बाबतीत सहानुभूतीने विचार करुन 2000 चा नियम लावलेला आहे तो त्यांच्यासाठी लागू केला जाईल काय, ज्या लोकांनी 7 हजार रुपये भरलेले आहेत. त्यांनाही सक्तीने तेथून काढले जात आहे. जोपर्यंत त्या लोकांना चांदिवली येथे घरे मिळत नाही तोपर्यंत त्यांना तेथून काढू नये. त्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी शासनाने घेतलेली आहे. त्यामुळे त्यांना निष्कासित करणार नाही अशी भूमिका घेतली जाणार आहे का ?

डॉ.पतंगराव कदम : त्यांचे पुनर्वसन होईपर्यंत त्यांना निष्कासित केले जाणार नाही.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील जात पडताळणी समित्यांची अध्यक्षपदे रिक्त असणे

**मु. शी.** : राज्यातील जात पडताळणी समित्यांची अध्यक्षपदे रिक्त असणे यासंबंधी ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री जयवंतराव जाधव, विक्रम काळे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री किरण पावसकर, अनिल भोसले, राणा जगजितसिंह पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ. अपूर्व हिरे, सर्वश्री दिपकराव साळुंखे, संदिप बाजोरिया,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.जयदेव गायकवाड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थी, कर्मचारी, अधिकारी इत्यादींना जातवैधता प्रमाणपत्र (कास्ट व्हॅलिडिटी सर्टिफिकेट) सक्तीचे असणे, या प्रमाणपत्राशिवाय मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नती न मिळणे किंवा त्यांच्या नोकरीवर गदा येणे, विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश न मिळणे, या कामासाठी शासनाने राज्यात १५ समित्यांवर चेअरमन नियुक्त करुनही त्यांपैकी १२ जागा रिक्त असणे, मार्च महिन्यात शाळा महाविद्यालयाचे प्रवेश सुरु होत असणे, आधीच १२ लाख प्रमाणपत्रे प्रलंबित असणे, त्यात आणखी भर पडण्याची शक्यता, त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांत व अधिकारी/कर्मचाऱ्यांत पसरलेले चिंतेचे वातावरण, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.शिवाजीराव मोघे ( सामजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अपूर्व हिरे : सभापती महोदय, मी दिलेली लक्षवेधी सूचना या सूचनेत क्लब केलेली आहे. मी आदिवासी विकास विभागाकडे या विषयाची लक्षवेधी सूचना दिली होती. मी मागील अधिवेशनामध्ये सामाजिक न्याय विभागाकडे लक्षवेधी सूचना दिली होती. त्या लक्षवेधी सूचनेवर चर्चाही झालेली आहे. त्यामुळे मी दिलेली लक्षवेधी सूचना यामध्ये क्लब करु नये अशी माझी आपल्याला विनंती आहे.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, राज्यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थी, अधिकारी यांच्या जातपडताळणीसाठी राज्यात 15 समित्या नेमलेल्या होत्या. परंतु या समित्यांपैकी दोनच समित्यांचे कामकाज चालू आहे अशी माहिती मिळते. या समित्यांमध्ये अध्यक्ष, सदस्य व सचिव असतात. परंतु अनेक समित्यांमध्ये अध्यक्षच नाहीत. काही समित्यांमध्ये सदस्यही नाहीत. त्यामुळे त्या समित्यांचे कामकाज चालू नाही. सध्या राज्यात 1 लाख 20 हजार 717 अर्ज प्रलंबित आहेत. ही संख्या मोठी आहे. हे लोक जात पडताळणीसाठी या समित्यांच्या कार्यालयात चकरा मारत असतात. काही लोकांना 15 वर्षानंतर जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले आहे अशी माहिती मिळाली आहे. काही केसमध्ये 2-3 वर्षे लागतात. ही दिरंगाई का होत आहे ? या कामासाठी 2-4 महिने लागले तर मी समजू शकतो. या संदर्भात वर्षानुवर्षे तक्रारी येत आहेत. अतिरिक्त जिल्हाधिकारी या समित्यांचे अध्यक्ष असतात. परंतु त्यांची या समित्यांवर नियुक्ती झाल्यावर ते रुजू होत नाहीत. अशा किती अधिकाऱ्यांनी ही नियुक्ती नाकारलेली आहे आणि या समित्यांचे कामकाज केव्हा सुरु होणार आहे आणि प्रलंबित अर्जांचा निपटारा कधी होणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : 11 जात पडताळणी समित्यांचे अध्यक्ष नाहीत. हे खरे आहे. परंतु त्या समित्यांचे काम थांबलेले नाही. अन्य समित्यांकडे अतिरिक्त पदभार देऊन अध्यक्ष नसलेल्या समित्यांचे कामकाज सुरु आहे. 1 लाख 20 हजारामध्ये 1 लाख 2 हजार विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी इयत्ता अकरावी व इयत्ता बारावी मध्ये असतात. या विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंग व मेडिकलला प्रवेश मिळण्यापूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र द्यावे लागते. या सर्व विद्यार्थ्यांना 31 मे पूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र दिले जाईल. यामध्ये 17 हजार कर्मचारी आहेत. हे कर्मचारीही बढतीपूर्वी 5-6 महिने अगोदर अर्ज सादर करतात. या कर्मचाऱ्यांना सुध्दा वेळेच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र दिले जाईल.

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांसाठी शासनामार्फत अनेक चांगल्या योजना सुरु केल्या जातात. समाजाच्या मुख्य प्रवाहात काम करण्यासाठी चांगला निधी व योजना आणल्या जातात.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

त्यामध्ये शिक्षणाचा फार मोठा सहभाग असतो. हे जात पडताळणी प्रमाणपत्र जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत पात्र असणा-या विद्यर्थ्यांना सवलती देण्यामध्ये अडचण निर्माण होते. ही अडचण निर्माण झाली तर त्यांची पुढची शैक्षणिक प्रगती थांबते, ड्रॉप आऊटचे प्रमाण वाढते, त्यामुळे त्यांच्यात नैराश्याची भावना निर्माण होते. मग शिक्षणापासून लांब गेलेली मुले दुस-या मार्गाकडे जाण्याची शक्यता निर्माण होते. हा सामाजिक आणि महत्वाचा विषय आहे. यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या फार मोठी आहे. याबाबतीत पालकांचे प्रमाणपत्र असेल आणि त्या मुलाच्या प्रमाणपत्राची ॲडिशनल आवश्यकता असेल त्यावेळी त्याच्या जवळील उपलब्ध डेटा ऑन लाईनवर उपलब्ध असेल तर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यामध्ये कोणती अडचण निर्माण होते हा न समजण्यासारखा प्रश्न आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन, भावी पिढीचे नुकसान होऊ नये म्हणून, या समाजाला मुख्य प्रवाहात येता यावे म्हणून याबाबतीत त्वरित कारवाई होण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने ही रिक्त पदे तत्काळ भरणे गरजेचे आहे. अशा समित्यांमध्ये अध्यक्ष नसेल तर इतरांना काम करण्यामध्ये स्वारस्य रहात नाही, प्रकरणे प्रलंबित ठेवली जातात. या निमित्ताने या विद्यार्थ्यांवर किती मोठा अन्याय होतो याची जाणीव ठेवून आपण यामध्ये त्वरित सुधारणा करणार आहात काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे 1 लाख 2 हजार विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र द्यावयाचे आहे. या विद्यार्थ्यांना 12 वी नंतर मेडिकल आणि इंजिनिअरिंगच्या अभ्यासक्रमासाठी या प्रमाणपत्राची आवश्यकता असते. ज्यांना व्यावसायिक शिक्षण घ्यायचे आहे अशा विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी केली जाते. अकरावीमध्ये जे विद्यार्थी आहेत त्यांना या वर्षी प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यांना पुढील वर्षी म्हणजे ते जेव्हा 12वीला जातील त्यावेळी ते मिळेल. जे विद्यार्थी 12वीमध्ये आहेत त्यांना 31 मे पूर्वी प्रमाणपत्र दिले जाईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या आग्रहाप्रमाणे ऑनलाईन कास्ट व्हेरिफिकेशन सिस्टीम अमलात आणलेली आहे. या समित्यांवर महसूल विभागाचे अधिकारी होते. त्यांचा या समित्यांवर कंट्रोल नव्हता. या संदर्भात आपण रुल्स तयार केले. बार्टी नावाच्या संस्थेकडे काम दिलेले आहे. ही प्रलंबित असलेली प्रकरण शून्यावर आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी प्रशिक्षण देणे,

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे...

स्टेशनरी देणे,काही कर्मचारी काही काळासाठी आऊटसोर्सिंगसाठी देणे इत्यादी गोष्टी केलेल्या आहेत. हा अत्यंत नाजूक आणि महत्वाच प्रश्न आहे. सर्व कार्यालयामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. ऑनलाईन प्रक्रिया सुरु केलेली आहे. टोलफ्री हेल्पलाईन देखील सुरु केलेली आहे. या हेल्पलाईनचा क्रमांक 18002330444 या प्रमाणे आहे. ही हेल्पलाईन आताही सुरु आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : 11 समित्यांवर अध्यक्ष केव्हा नियुक्त केले जातील ? शालेयस्तरापासून जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यात येईल असे सभागृहामध्ये घोषित करण्यात आले होते. शालेयस्तरापासून जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केव्हा पासून सुरु करण्यात येणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : याबाबतीत माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांनी विशेष लक्ष घालून या समित्यावर काम करणा-यांना विशेष प्रमोशन दिलेले आहे. ज्याना प्रमोशन दिलेले आहे त्यांना या समित्यावर काम करणे अनवार्य आहे. 17 अधिकारी निवडलेले होते. त्यापैकी काही अधिका-यांचे सी.आर. उपलब्ध झाले नाहीत. आता 9 अधिकारी 7 दिवसात उपलब्ध होतील. बाकीचे अधिकारी एका महिन्यात उपलब्ध होतील. शालेयस्तरावर ही प्रक्रिया खूप व्यापक प्रमाणात होईल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, जात पडताळणी विभाग हा राज्यात प्रचंड भ्रष्टाचार चालू असलेला विभाग आहे. या विभागामध्ये लाखो नव्हे तर करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होत आहे. तीन महिन्यात जात पडताळणी करुन दिली पाहिजे असे शासन मान्य करीत आहे. परंतु तीन महिने राहू द्या, तीस महिने, तीन वर्षे, पाच वर्षे, दहा वर्षापर्यंतची सुध्दा अनेकांची जात पडताळणी झालेली नाही. बोगस जातीचे प्रमाणपत्र घेऊन विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळविलेले आहेत. अनेकांनी शासकीय नोकऱ्या मिळविलेल्या आहेत. जे मूळ प्रवर्गातील होते, त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. या समितीला क्वॉसी ज्युडिशियली पॉवर दिलेल्या आहेत. क्वॉसी ज्युडिशियली पॉवर दिल्याने एक जरी फोन केला तर आपल्याला समोरुन धमकी येते की, आम्ही तुमच्यावर केस करु. आम्ही तुम्हाला जेलमध्ये टाकू. माननीय सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी मागे हक्कभंगाचा प्रस्ताव आणला होता. श्री.कर्वे यांचे विरुध्द हक्कभंग चालविला. माझी पोटतिडीक यासाठी आहे की, आमची माणसे वर्षानुवर्षे अन्याय सहन, आंदोलने करुन जातीची प्रमाणपत्रे मिळवितात. या विभागातील भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांमुळे जे आमच्या जातीत नाहीत, जे आमच्या समाजात नाहीत, त्यांना बोगस जातीचे प्रमाणपत्रे देतात. त्यामुळे आमच्या समाजावर अन्याय होतो आहे. तीन महिने, पाच वर्षे, दहा वर्षे ज्यांची जातपडताळी झालेली नाही असे किती लोक आहेत ? त्यांच्या बाबतीत काय कार्यवाही करणार आहात, त्यांना जातीची प्रमाणपत्रे कधीपर्यंत देणार आहात ?

श्री.शिवाजीराव मोघे : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे रास्त आहे. पूर्वी या समितींमध्ये प्रलंबित प्रकरणे खूप असावयाची. आलेल्या प्रकरणाबाबत काहीही कार्यवाही करावयाची नाही, ती प्रकरणे प्रलंबित ठेवावयाची. त्यामुळे समोरच्या व्यक्तींना फायदा मिळायचा. एखादा बोगस जातीचे प्रमाणपत्र घेऊन शासकीय सेवेत असेल, त्याने त्याचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणीसाठी पाठविले. ते प्रकरण तेथेच प्रलंबित ठेवावयाचे. ते तेथे प्रलंबित असे पर्यंत तो कर्मचारी शासकीय सेवेत रहावयाचा. आम्ही बार्टी या संस्थेचे प्रमुख यांना आदेश दिलेले आहेत की, जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी वेळेच्या आत संपूर्ण कागदपत्रे संबंधितांनी दिली नाहीत तरी ते प्रकरण प्रलंबित ठेवावयाचे नाही. आता नियम आहेत, त्या नियमाप्रमाणे प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत.

21-03-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) FF-2
ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 13:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर : शासनाने यासबंधी एक जी.आर.काढला आहे. 1950 वर्षापूर्वी तुम्ही जेथे रहात होतात तेथील पुरावा देणे बंधनकारक केले आहे. मी तुम्हाला उद्या जी.आर.दाखवेन. सोलापूरचा रहिवासी होता, त्याच्या मुलाचा नवीन जातीचा दाखला काढावयाचा होता. त्याला सांगितले गेले की, तुम्ही 1950 साली ज्या ठिकाणी रहात होतात, तेथील पुरावा सादर करावा. त्या मुलाचे कुटुंब बोरिवलीमध्ये रहाते. बोरिवलीच्या तहसीलदारांनी मला शासनाचा जी.आर.पाठविला. त्या मुलाच्या आई-वडीलाचे जातीचे दाखले आहेत, त्याच्या भावाचा जातीचा दाखला आहे. त्या मुलाला त्वरित जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल काय?

श्री.शिवाजीराव मोघे : यासंदर्भात गैरसमज आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये असे म्हटले आहे की, एस.सी.आणि एस.टी. करिता 1950 च्या पूर्वीचे दाखले असणे गरजेचे आहे. 1950 चा दाखला मी आणू शकलो नाही. पूर्वीचे दाखले अस्तित्वात राहिलेले नाहीत. आज मी सांगतो आहे की, हे वर्ष पूर्ण व्हावयाचे आहे. आमच्या विभागाने 3 लाख 86 हजार 134 प्रमाणपत्रे दिलेली आहेत. त्यांनी रेकॉर्ड केला आहे की, सहा महिन्यात जवळपास 1लाख जातीची प्रमाणपत्रे दिली आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्याचे स्पेसिफिक उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. तुम्ही सांगितले की, 3 लाख जातीचे प्रमाणपत्रे दिली आहेत. त्या मुलाच्या आई, वडील व भाऊ यांचे जातीचे दाखले आहेत. मुलाला दाखला देण्याकरिता 1950 पूर्वीचा दाखला मागितला जात आहे. एक तर तुम्ही त्याच्या मातृत्वावर आणि पितृत्वावर शंका निर्माण करणे हा एक गुन्हाच आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी सांगितले की, जातीचे बोगस दाखले या कार्यालयांकडून दिले जातात. जे मूळ मागासवर्गीय समाजातील आहेत, त्यांना वंचित ठेवले जाते. सन्माननीय सदस्य सत्तारुढ पक्षात आहेत. त्यांना आपण बोलवा. त्यांनी दोन जरी बोगस प्रमाणपत्रे आपणाकडे दिली तर संबंधितांवर कारवाई करा. या बाबतीत आपण कोणावरही कारवाई केली नाही. बोगस प्रमाणपत्रे देणाऱ्यांवर काय कारवाई करणार आहात ?

यानंतर श्री.भोगले...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-7.....

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, असत्य प्रमाणपत्र दिले जाणार नाही अशी व्यवस्था केली आहे. असत्य प्रमाणपत्र दिले गेले तर त्याबाबत प्रॉसीक्यूट करीत नव्हतो. आता प्रत्येक समितीला रुल्सनुसार अधिकार दिलेले आहेत. त्यासाठी एक्स्ट्रा मनुष्यबळ देणार आहोत, त्या संदर्भात कारवाई होईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या विषयाबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना आणि वेगवेगळे अनुभव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मंत्री महोदयांनी किती प्रमाणपत्रे दिली आहेत याची आकडेवारी सभागृहाला सांगितली आहे. मी स्वत: विधानमंडळ समितीच्या माध्यमातून पुणे येथील कार्यालयाला भेट दिली होती. तेथे इन्फ्रास्ट्रक्चरची स्थिती शून्य आहे. मंत्री महोदयांनी माहिती दिली की, ऑनलाईन व्यवस्था केली आहे. पुणे येथील कार्यालयात वर्षभरासाठी ऑन कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत. मोठ्या प्रमाणात प्रमाणपत्रे द्यायची असल्यामुळे इन्फ्रास्ट्रक्चर वाढवून देण्यासाठी काय करणार आहात? या समित्यांचे कार्यालय म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण बनलेले आहे. भ्रष्टाचार बंद करावा असे मंत्री महोदयांना वाटत असेल तर आतापर्यंत किती अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली व भविष्यात किती अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे?

श्री.शिवाजीराव मोघे : ज्या संस्थेला काम दिले आहे ती संस्था ॲटॉनॉमस बॉडी आहे. त्या संस्थेच्या प्रमुखांना आवश्यक असणारी यंत्रसामुग्री, कर्मचारी नेमण्याचे अधिकार दिले आहेत. ते आऊटसोर्सिंग करीत आहेत. म्हणूनच एवढ्या मोठया प्रमाणात काम होऊ शकले. पूर्वी स्टाफ कमी होता.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, काम सुरु आहे असे मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले आहे त्याच्याशी मी सहमत होऊ शकत नाही. अनुसूचित जमातीच्या समित्या कार्यरत असल्यामुळे अनुसूचित जमातीच्या लोकांना प्रमाणपत्रे मिळत आहेत. अनुसूचित जातीसाठी ज्या 15 समित्या नियुक्त केल्या आहेत त्यापैकी 11 समित्यांचे अध्यक्षपद रिक्त आहे, अनेक समित्यांचे सचिव पद रिक्त आहे. अध्यक्ष आणि सचिव पद रिक्त असताना प्रमाणपत्रावर सह्या कोण करतो? अनेक समित्यांचे अध्यक्ष व सचिव पद रिक्त असल्यामुळे या समित्यांचे काम ठप्प झालेले आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड..........
मला अशी माहिती मिळाली की, महसूल विभागातील अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची अनुसूचित जातीच्या समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक केली असता ते सामाजिक न्याय विभागाच्या या समितीवर काम करण्यास तयार नाहीत. त्यामुळे समित्यांचे काम ठप्प झालेले आहे. नव्याने नेमणूक दिलेले अधिकारी जर रुजू होत नसतील तर त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहात?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, फक्त कास्ट व्हॅलिडिटी समितीच्या चेअरमन पदासाठीच पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात आलेली आहे. नेमणूक दिलेले अधिकारी रुजू झाले नाहीत तर त्यांना इतर पदासाठी त्या पदोन्नतीचा लाभ घेता येणार नाही. या समित्या पुणे, औरंगाबाद अशा मोठमोठ्या शहराच्या ठिकाणी कार्यरत आहेत. त्या ठिकाणी ॲडिशनल कमिशनर समितीचे चेअरमन म्हणून काम करतात. त्यांच्या सहीने प्रमाणपत्र दिले जाते.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेखाच्या सूचना**</u>

**पृ. शी./मु. शी.** : मुलुंड, मुंबई येथील अतिरिक्त जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाचा वीज पुरवठा खंडित केल्याबाबत श्री.विनायक राऊत,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, "मुंबईतील मुलुंड येथे उपनगर जिल्हयाचे अतिरिक्त जिल्हाधिकारी व तहसील कार्यालय आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी, तहसीलदार व तलाठी कार्यालयाचा वीज पुरवठा मागील एक महिन्यापासून खंडित करण्यात आला आहे. माझ्या माहितीनुसार 6.5 लाख रुपयांचे वीज देयक न भरल्यामुळे वीज पुरवठा कंपनीने ही कारवाई केलेली आहे. मागील एका महिन्यापासून या कार्यालयात अंधाराचे साम्राज्य पसरलेले आहे. सायंकाळी उशिरा बसून काम करावयाचे झाल्यास कर्मचाऱ्यांना मेणबत्तीच्या उजेडात काम करावे लागते. वीज पुरवठ्याअभावी या कार्यालयाचे कामकाज पूर्णपणे ठप्प झालेले आहे. विजेअभावी संगणक सुरु करता येत नाहीत. नागरिकांना आवश्यक असलेली प्रमाणपत्रे वा कागदपत्रे मिळू शकत नाहीत. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. शासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने या कार्यालयाचा वीज पुरवठा सुरु करावा," अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो.

---------

नंतर 2एच.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अधिसभेच्या बैठकी अधिवेशनादरम्यान आयोजित करण्यात येऊ नये याबाबत सन्मननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"राज्यातील सर्वच अकृषि विद्यापीठांच्या अधिसभेवर विधानसभा व विधान परिषदेंच्या अनेक सदस्यांच्या नियुक्त्या केल्या जातात, या सदस्यांना अधिसभेला हजर राहण्याची इच्छाही असते, मात्र अधिसभेच्या वर्षातून दोन सभा होतात, त्या सभा देखील डिसेंबर व मार्च महिन्यातच घेतल्या जातात, नेमक्या याच कालावधीत अर्थसंकल्पीय व हिवाळी अधिवेशन भरत असते, अशावेळी आम्ही विद्यापीठांच्या अधिसभांना हजर राहू शकत नाही, या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास अशी विनंती करतो की, शासनाने विद्यापीठांना अधिसभेच्या बैठकी अधिवेनादरम्यान आयोजित करु नयेत असे निर्देश द्यावेत ही विनंती."

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: टंचाई परिस्थितीत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना शासकीय मदत देण्या बाबत सन्मननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. अमरसिंह पंडित ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"गेवराई, जि.बीड तालुक्यात पाणी टंचाईमुळे तीन जणांचे बळी जाणे, तालुक्यातील मौजे साठेवाडी येथील रंजित रोहिदास धोत्रे, देवप्रिंप्री येथील भागवत ब्रम्हदेव मंचरे आणि पाचेगाव येथील कु. पूजा विश्वनाथ राठोड या तिघांचा खोल विहिरीतील पाणी काढतांना विहिरीत पडून दुर्दैवी मृत्यू होणे, तालुक्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होणे, टंचाई परिस्थितीत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना शासकीय मदत देण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे मृत झालेल्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यास शासनाकडून होत असलेला अक्षम्य विलंब, तालुक्यातील पिण्याचे पाणी घेतांना मृत्युमुखी पडलेल्या तिन्ही मृत व्यक्तींच्या वारसांना तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी", अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अल्पबचत विभागातील 10 हजारांवर अभिकर्त्यांच्या (एजंट) उपजीविकेचा प्रश्न निर्माण होणे याबाबत सन्मननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील,वि.प.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"ग्रामीण भागात बचत संस्कृती रुजवण्यासाठी अल्पबचत खात्यामार्फत ही अल्पबचत योजना सुरु करण्यात येणे, परंतु या अल्पबचत विभागाकडे आता शासन दुर्लक्ष करीत असून हा विभाग बंद होण्याच्या मार्गावर असणे, विदर्भातील तीन कार्यालये बंद करण्यात आली असून नागपूरचे कार्यालयही बंद होण्याच्या मार्गावर असणे, या अल्पबचत विभागात 10 हजारांवर अभिकर्ते (एजंट) आपले पोट भरत असून हे अल्पबचत विभाग बंद झाल्यास त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असणे, सदरहू अल्पबचत विभाग बंद होत असल्यामुळे शासनाप्रती नागरिकांच्या मनात निर्माण झालेली चीड व संताप, शासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, हा विभाग सुरु ठेवण्याबाबत नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व यावर शासनाची भूमिका." यासाठी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: वार्षिक उत्पन्नाची मर्यादा 1 लाख रुपयांवरुन 3 लाख रुपये करणे याबाबत सन्मननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे, वि.प.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दुर्बल घटकातील ज्या लोकांचे वार्षिक उत्पन्न 1 लाख रुपये आहे अशाच पालकांच्या मुलांना शिक्षण सवलत दिली जाते. परंतु सद्याची परिस्थिती पाहता रोजंदारी कामगार, शेतकरी, शेतमजूर व चतुर्थश्रेणीचे कर्मचाऱ्यांचे वार्षिक उत्पन्न जवळपास 1 लाख रुपयांपेक्षा अधिक असल्यामुळे या आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. तरी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा 1 लाख रुपयांवरुन 3 लाख रुपये करावी अशी आर्थिक दुर्बल घटकांकडून शासनाकडे वारंवार मागणी केली जात आहे. त्यामुळे या घटकांची मागणी विचारात घेता वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये 3 लाख रुपये इतकी करण्यात यावी" अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----------------

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: ओबीसी क्रिमिलियरची मर्यादा वाढविणे याबाबत सन्मननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे,वि.प.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. सुधीर तांबे ( नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांच्या फी सवलतीसाठी असलेली 4,50,000/- रुपयांची क्रिमिलियर मर्यादा फार पूर्वीची असून व सध्या शिक्षकांचे पगार वाढल्यामुळे ही क्रिमिलियर मर्यादा फारच कमी असल्यामुळे शिक्षक पाल्यांच्या उच्च शिक्षणाच्या फीची गंभीर समस्या वाढली आहे. सदरहू मर्यादेत शिक्षकांचे पाल्य बसत नाहीत. यामुळे त्यांना उच्च शिक्षणाचे भरमसाठ शुल्क नाईलाजाने भरण्याची वेळ आलेली आहे. यामुळे ओ.बी.सी. विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची संधी दुरावू नये, तसेच आर्थिकदृष्टया सामान्य परिस्थितीतील सर्वांना उच्च शिक्षणाचा लाभ घेता यावा, यासाठी सध्या असलेल्या क्रिमिलियरची मर्यादा वाढविण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता आहे. अशा अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

----------

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: एफडीआय मध्ये अधिक पदे भरण्याबाबत सन्मननीय सदस्य श्री. किरण पावसकर,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील 11 कोटी जनतेचे आरोग्य एफडीआयच्या हातात असून एफडीआय मध्ये केवळ 165 ड्रग इन्स्पेक्टर्स आणि 200 फूड इन्स्पेक्टर्स आहेत. मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, आपल्याकडे ड्रग इन्स्पेक्टर्स 165 असून 68000 कंपन्या आहेत. आपल्याकडे फूड इन्स्पेक्टर्स 200 आहेत आणि आस्थापनांची संख्या 15 लक्ष आहे. आपल्याला जवळ जवळ 1000 ड्रग इन्स्पेक्टर्सची तसेच 2000 फूड इन्स्पेक्टर्सची गरज आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

11 कोटी जनतेला भेसळयुक्त अन्न मिळत आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाकडे कर्मचारीवर्ग नाही. ही संख्या वाढविण्याची सरकारची इच्छा असली तरी त्यामध्ये इन्स्पेक्टरचे राजकारण देखील असते. कारण यामध्ये या अधिकाऱ्यांना वाटा मिळतो. त्यामध्ये त्यांना घाटा नको, अशा प्रकारचा आरोप आहे. मोठ्या कंपन्या, हॉटेल्स यांच्यावर सतत छापे टाकले जातात. पण छोट्या कंपन्यांवर धाड टाकली जात नाही. त्यासाठी अपुरा वर्ग ही कारणे वारंवार दिली जातात. भेसळ युक्त अन्न व औषध हे संपूर्ण जनतेला घ्यावे लागत आहे. याला कारण अपुरा असलेला कर्मचारीवर्ग. त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने कारवाई करून ड्रग्ज इन्स्पेक्टरची संख्या वाढविण्याकरिता कार्यवाही करण्यासाठी मी हा विशेष उल्लेख येथे उपस्थित करीत आहे.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : नागरिकांच्या समस्या प्रामाणिकपणे सोडविणाऱ्या अधिकाऱ्याच्या मागे शासनाने खंबीरपणे उभे राहणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमी विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"राज्यात अनधिकृत बांधकाम, अनैतिक धंदे, फेरीवाल्यांची अरेरावी चढ्याभावाने माल विकून सर्वसामान्यांची लूट करण्यात येत असणे, नागरिकांसाठी चालण्यासाठी असलेला पदपथ फेरीवाल्यांकडून व्यापला जाणे, नाईलाजास्तव रस्त्यावरून चालावे लागत असल्यामुळे नागरिकांना अपघातांना सामोरे जावे लागणे, या विरोधात पोलीस दलातील सहायक पोलीस आयुक्त श्री.वसंत ढोबळे यांनी फेरीवाल्यांवर कारवाई केली असता त्यांची तडकाफडकी बदली केली जाणे, असेच चांगले काम करणाऱ्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांना अशी वागणूक दिली जात असल्याचे त्यांचे खच्चीकरण होणे, परिणामी नागरिकांच्या समस्या प्रामाणिकपणे सोडविणाऱ्या अधिकाऱ्यांचा आत्मविश्वास ढळमळणे, कर्तव्यदक्ष, प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मागे शासनाने समक्षपणे उभे रहावे अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

...................

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : रत्नागिरी जिल्ह्यातील खेड,दापोली,मंडणगड येथील रस्त्यांची झालेली दुरवस्था याबाबत श्री.रामदास कदम वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला संधी दिल्याबद्दल साष्टांग नमस्कार. मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"रत्नागिरी जिल्ह्यातील विशेषत: खेड, दापोली, मंडणगड तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते मागील चार वर्षापासून नादुरूस्त असून रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडल्यामुळे एस.टी.सेवा ही काही ठिकाणी बंद झालेली आहे. सदर रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडून 3.5 कोटी रूपयांचा प्रस्ताव आलेला असताना, फक्त सव्वा कोटीचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. त्यामुळे तेथील ग्रामस्थांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याने सदरची बाब मी विशेष उल्लेखाद्वारे निदर्शनास आणीत आहोत."

मी येथे असेही निदर्शनास आणून देत आहे की, तेथील एस.टी.डेपो मॅनेजरने 1 तारखे पर्यंत संबंधित रस्ते दुरूस्त झाले नाहीत तर आम्ही एस.टी.बससेवा बंद करीत आहोत असे ग्रामपंचायतीला लेखी कळविले आहे. तेव्हा विशेष बाब म्हणून शासनाने याची नोंद घ्यावी व कोकणातील या चार तालुक्यातील दळणवळण सुरू करावे ही विनंती करीत आहे.

......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :महाराष्ट्र औद्योगिक संस्थांमधील निदेशक व गट निदेशक यांना सेवेत नियमित करणे याबाबत
श्रीमती शोभा फडणवीस वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"शासनाच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्यांतर्गत येणाऱ्या शासकीय महाराष्ट्र औद्योगिक संस्थांमधील निदेशक व गट निदेशक हे पात्रता पूर्ण असून व शासनाची निवड व गरज असताना बऱ्याच कालावधीपासून कंत्राटी तत्त्वावर काम करीत असणे, त्यांना अद्यापही अल्पवेतनात काम करण्यात भाग पडणे, त्याकरिता न्याय देण्याकरिता शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज, नियमाप्रमाणे पाच वर्षे झाल्यामुळे त्यांना नियमित करण्याची आवश्यकता व करावयाची कारवाई याकरिता सदर विषयावर मी विशेष उल्लेखाद्वारे मुद्दा उपस्थित करीत आहे."

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : पुणे जिल्ह्याच्या पर्यावरण संवर्धन व संरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या समितीची दर तीन महिन्यांनी बैठक घेणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, पुणे जिल्ह्याच्या पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी गेल्या वर्षी एक समिती गठीत केली होती. या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी, श्री.जयदेवराव गायकवाड व मी आमदार या नात्याने पदसिद्ध सदस्य आहोत. पण गेल्या दीड वर्षात या समितीची बैठकच झालेली नाही. चाकण, रांजणगाव, बारामती, इंदापूर या भागातील नद्यांवर वाढत्या औद्योगिकीकरणामुळे काय परिणाम होत आहे याची विचारणा करतो त्यावेळी तत्संबंधातील माहिती या सभागृहात देण्याचा प्रयत्न होतो. परंतु, जिल्ह्यातच बैठक झाली नाही तर पर्यावरणासंबंधात कोणत्या तक्रारी आहेत व त्यावर कोणती कारवाई झाली, कशा प्रकारे तपासणी होते याची माहिती उपलब्ध होणार नाही. यातील एक सदस्य श्री.अमित अग्रवाल यांनी वर्तमानपत्रात बातमी दिल्यामुळे आम्ही देखील या समितीवर आहोत हे कळले. त्यामुळे हे अधिवेशन संपल्यानंतर समितीची त्वरित बैठक घेऊन नियमितपणे आढावा घेतला जावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

...........

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मध्यमवर्गीय गुंतवणुकदारांना पैसे दाम दुपटीने परत करण्याचे आमिष दाखविणाऱ्या मल्टी लेव्हल मार्केटिंग कंपन्यांना आळा घालण्याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, सन 2011-2012 मध्ये स्पीक एशिया नामक मल्टीलेव्हल मार्केटींग कंपनीने लाखो गुंतवणूकदारांकडून करोडो रुपये घेऊन त्यांना फसविले. आजही बाजारात दामदुप्पटीने पैसे परत करण्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करायला लावणाऱ्या कंपन्या कार्यरत आहेत. जोपर्यंत पैसे मिळतात तोपर्यंत गुंतवणूकदार लाभ घेत राहतात आणि इतरांना देखील त्या कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यास उद्युक्त करतात. गुंतवणूकदारांना अचानकपणे पैसे मिळणे बंद झाल्यावर भ्रष्टाचाराला वाचा फुटते. परंतु तोपर्यंत लाखो लोकांची फसवणूक झालेली असते. शासनाने अशाप्रकारच्या कंपन्यांचा शोध घेऊन त्यावर प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे आवश्यक आहे. तेव्हा मध्यमवर्गीय कुटुंबातील गुंतवणूकदारांना आमिष दाखविणाऱ्या मल्टीलेव्हल मार्केटींग सारख्या कंपन्यांना आळा घालण्यासाठी व सामाजिक हिताच्या दृष्टीने मी हा विशेष उल्लेख मांडत आहे."

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी या ठिकाणी जो विशेष उल्लेख मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

"सभापती महोदय, सन्मानीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी सांगितीले की, राज्यातील वेगवेगळ्या विद्यापीठांवर आमदारांची मॅनेजमेंट कमिटीवर नियुक्ती होते. सन्माननीय सदस्यांना जो अनुभव आलेला आहे तसा अनुभव आम्हाला देखील आलेला आहे. या समितीच्या वर्षातून दोन किंवा तीन बैठका होतात. या बैठका हिवाळी अधिवेशनात किंवा अर्थसंकल्पीय अधिवेशनात होतात. आजच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची अर्थसंकल्पीय बैठक मुंबई येथे होत आहे. त्या बैठकीस उपस्थित राहणे आम्हाला शक्य होणार नाही. सन्माननीय सदस्यांची नेमणूक दिखाव्यासाठी करण्यात येत असेल तर कृपया आमच्या नेमणुका करु नयेत. तसा उद्देश नसेल तर त्यामध्ये सुधारणा करण्याची विनंती आहे."

---------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु. शी**. : ठाणे येथील हॉस्पिटलला सेंटर ऑफ एक्सलन्सचा दर्जा मिळणे या बाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"केंद्र सरकारने येरवडा, पुणे येथील नॅशनल हेल्थ इन्स्टीटयुशनला "सेंटर ऑफ एक्सलन्स" दर्जा प्रदान केलेला आहे. त्या हॉस्पीटलला 30 कोटी रुपयांचा निधी देखील दिलेला आहे. ठाणे येथे देखील अशाप्रकारचे मोठे हॉस्पीटल आहे. त्या हॉस्पीटलला देखील असा दर्जा मिळणे आवश्यक आहे. हा दर्जा प्राप्त होण्यासाठी काही गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यामध्ये अद्ययावत यंत्र सामुग्री, आवश्यक तज्ज्ञ मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. ज्या ज्या राज्यांतून असे प्रस्ताव येतात त्यांनी वार्षिक खर्च करण्याची तयारी दर्शविली तर त्याचा केंद्र शासन विचार करते. ठाणे हॉस्पिटललसाठी टाटा इन्स्टीटयुट ऑफ सोशल सायन्सेस, एसएनडीटी विद्यापीठ आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ या संस्थांनी रस दाखविला आहे. तेव्हा राज्य शासन पुढाकार घेऊन ठाणे येथील हॉस्पीटलाही "सेंटर ऑफ एक्सलन्सचा" दर्जा मिळण्याच्या दृष्टीने त्वरेने कार्यवाही करावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे."

--------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कर्नाटक राज्यातील हायस्पीड ट्रॉलर्सने केलेल्या जाळ्यांच्या हानीचा मानसिक धक्का बसल्यामुळे दांडा (जि.सिंधुदुर्ग) येथील मच्छीमार कृष्णा तारी यांचा झालेला मृत्यू, याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, कर्नाटक राज्यातील हायस्पीड ट्रॉलर्सने केलेल्या जाळ्यांच्या हानीचा मानसिक धक्का बसल्यामुळे दांडी, जि.सिंधुदुर्ग येथील मच्छीमार कृष्णा तारी यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब मार्च महिन्याच्या सुरुवातीस उघडकीस आली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अगदी बारा वावपर्यंत येऊन कर्नाटक राज्यातील हायस्पीड ट्रॉलर्स मासेमारी करीत असताना मयत तारी यांची जाळी सलग दुसऱ्या वर्षी कर्नाटक राज्यातील ट्रॉलर्सनी तोडून नेलेली होती. या हायस्पीड ट्रॉलर्समुळे राज्यातील मच्छीमारांचे होत असलेले नुकसान व मासेमार बांधवाच्या मृत्युमुळे श्रमिक मच्छीमार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित ट्रॉलर्सवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी शासनाकडे मागणी केलेली आहे. सदरहू मागणीकडे शासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे राज्यातील समस्त मच्छीमारांच्या मनात शासनाविषयी नाराजीची भावना पसरलेली आहे. जाळ्यांच्या नुकसान भरपाईबाबत तसेच फयान वादळानंतर मत्स्य विभागाने नुकसान झालेल्या जाळ्यांचे पंचनामे शासनानेच खोटे ठरवून मदतीसाठी आलेले चार कोटी रुपये वितरित केलेले नाहीत. केंद्र शासनाकडून होणाऱ्या नुकसानीची भरपाई शासनाकडून मिळत नाही. या बाबत शासनाने राज्यातील मच्छीमारांना तामिळनाडूच्या धर्तीवर अनुदानित केरोसिनचा पुरवठा करावा, पर्ससीनेट फिशींग प्रश्नावर नवीन अधिसूचना निर्गमित करावी, परप्रांतीय ट्रॉलर्सच्या अतिक्रमणावर प्रभावी उपाययोजना करावी व श्रमिक मच्छीमारांची पेन्शन योजना राबवावी अशी विनंती या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

-------------

..2..

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.  सभागृहाची बैठक दुपारी 2.30 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.01 ते 2.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : आता नियम 260 अन्वये दिलेला प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.31 ते 2.41 पर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.44 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ D/ ST/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:00

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.**: (पुरवणी) विनियोजन विधेयक.

L.A. BILL NO. II OF 2013

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2013.)

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013चे वि.स.वि.क्रमांक 2 दिनांक 31 मार्च 2013 रोजी संपणा-या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घ्यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी**

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझा पॉईण्ट ऑफ प्रोसिजर आहे. ही गोष्ट खरी आहे की, कायदा आणि सुव्यवस्था हा सर्वांच्या स्वारस्याचा प्रश्न आहे. दोन्ही सभागृहामध्ये एक एक दिवस चर्चा लागतात. दोन्ही सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे असा आग्रह असतो. आज देखील विधानसभेमध्ये कायदा आणि सुव्यवस्था या विषयावर चर्चा चालू आहे. या सभागृहामध्ये देखील नियम 260 अन्वये त्याच विषयावर चर्चा दाखविलेली आहे. त्यामुळे एकाच वेळी दोन्ही सभागृहामध्ये कसे हजर रहायचे हा प्रश्न आहे. त्यामुळे आज कामकाजपत्रिकेमध्ये नियम 260 अन्वये दाखविण्यात आलेली कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील चर्चा सोमवार दिनांक 25 मार्च 2013 रोजी घ्यावी अशी माझी आणास विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : नियम 260 अन्वयेची चर्चा सोमवार, दिनांक 25 मार्च 2013 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 या वेळेत विशेष बैठक घेऊन घ्यावी.

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेली नियम 260 अन्वयेची कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील चर्चा सोमवार, दिनांक 25 मार्च 2013 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 या वेळेत घेण्यात येईल. ही चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तरासह पूर्ण करावयाची आहे.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप..........

मागील दोन दिवस 24 तास दूरदर्शनच्या ठराविक चॅनेल्सवर ही एकच घटना वेगवेगळ्या पध्दतीने दाखविण्याचा प्रयत्न झाला. या घटनेबाबत विश्लेषण करीत असताना जे वक्तव्य केले गेले ते योग्य नव्हते. श्री.राजीव खांडेकर यांच्यासारख्या ज्येष्ठ पत्रकाराच्या तोंडून असे वक्तव्य केले गेले की, छत्रपतींचे वारंवार नाव घेता, छत्रपतींचे नाव घेण्याची तुमची औकात आहे का? अशा प्रकारचे वक्तव्य केले जाणे हे लोकशाहीला घातक आहे. पत्रकारिता किंवा मीडिया हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे हे आम्ही मान्य करतो. लोकशाही अधिक बळकट कशी होईल हे पाहण्याची चारही स्तंभांची जबाबदारी आहे. परंतु एखाद्या घटनेचा आधार घेऊन सगळ्याच लोकप्रतिनिधींना दोष देणे हे योग्य नाही. खालच्या सभागृहात 289 सदस्य आणि या सभागृहाचे 78 सदस्य आहेत. या घटनेचा उल्लेख करुन सातत्याने म्हटले गेले की, आमदार गुंड आहेत, राडेबाज आहेत. जी भाषा वापरली गेली त्याचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. त्यांनी केलेल्या वक्तव्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो.

सभापती महोदय, काल राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. आज राज्यातील 11 जिल्हयांमध्ये शेतकऱ्यांची अवस्था गंभीर झालेली आहे, 11 जिल्हयांमध्ये पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई आहे. त्यासाठी सरकारने काय नियोजन केले आहे या संदर्भात एका वाक्यानेही कोणत्याही वाहिनीवर उल्लेख केलेला नाही किंवा चर्चा झाल्याचे ऐकिवात नाही. राज्यातील बारीकसारीक घटनांवर लक्ष पुरविले जात असताना विश्लेषण करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. परंतु राज्याचा अर्थसंकल्प त्यांना दिसला नाही. त्यातील दोष तरी त्यांनी दाखववयास हवे होते. एका वाक्यानेही कोणत्या मीडियाने त्याबाबत वाच्यता केली नाही.

सभापती महोदय, मी विधानपरिषद नियम 240 अन्वये हक्कभंगाची सूचना मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या राज्यामध्ये आज मीडियाकडून शासन, प्रशासन, पोलीस आणि लोकप्रतिनिधी यांच्यात वाद निर्माण करुन देण्याचा प्रयत्न केला जात असेल तर माझी विनंती आहे की, कृपया गैरसमज करुन घेऊ नये. श्री.सचिन सूर्यवंशी यांच्या संदर्भातील सी-लिंकवरील घटनाक्रम आपण सगळ्यांनी पाहिला. दुसऱ्या घटनाक्रमाबद्दल गेले दोन दिवस दूरदर्शन वाहिन्यांवर सातत्याने चर्चा सुरु आहे. श्री.सचिन सूर्यवंशी यांची वागणूक मीडियाने प्रत्यक्षपणे.....

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप......

वाहिन्यांवर दाखविली आहे. लोकप्रतिनिधींशी ते 'अरे तुरे'च्या भाषेत बोलत होते. आपण सर्वांनी ते प्रत्यक्षपणे पाहिले आहे. माननीय विधानसभा सदस्य श्री.क्षितीज ठाकूर हे सभ्य भाषेतून त्यांच्याशी संभाषण करीत असताना श्री.सूर्यवंशी मात्र एकेरी भाषेतून बोलत होते. तुला जे काही करायचे ते कर, मी बघून घेईन, मी एफआयआर दाखल करतो, अशा मस्तवाल भाषेत ते बोलत होते. या घटनेबद्दल आम्ही खेद व्यक्त केला आहे. असे करीत असताना आपल्याला हवे तेवढे घ्यायचे आणि राजकारण्यांविषयी मनामध्ये असलेली मळमळ बाहेर काढायची, या गोष्टीचा मी तीव्र शब्दात निषेध करतो आणि विनंती करतो की, पहिली जी घटना झाली त्याची सुध्दा योग्य पध्दतीने चौकशी होणे आवश्यक आहे. मी सभागृहाच्या भावनांच्या माध्यमातून विनंती करतो की, नियम 240 अन्वये मी जी विशेषाधिकार भंगाची सूचना मांडली आहे ती आपण मान्य करावी.

--------

नंतर 2क्यू.1..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप, विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. कपिल पाटील,सतीश चव्हाण, अमरसिंह पंडित, रामदास कदम, चंद्रकांत पाटील, हेमंत टकले अशा सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी विशेषाधिकार भंगाच्या सूचना दिलेल्या आहेत.

याविषयाच्या संदर्भात सदनामध्ये जी चर्चा झाली होती त्यावेळेस असा विचार पुढे आला होता की, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी अशा प्रकारचा ठराव मांडल्यानंतर या विषयाच्या संदर्भात अन्य सन्माननीय सदस्यांना आपल्या तीव्र भावना व्यक्त करावयाच्या असल्यामुळे मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विचार मांडण्याची परवानगी देणार आहे. आता सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विशेषाधिकार भंगाच्या सूचने संदर्भात आपले विचार मांडावेत अशी विनंती करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, गेल्या दोन तीन दिवसापासून महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक जीवनातील वातावरण दूषित झालेले असून ते महाराष्ट्राला भूषणावह नाही. वरळी सी फेस येथे यासंदर्भातील घटना घडल्यानंतर त्या दिवशी सभागृहाचे कामकाज थोडावेळ तहकूब झाले होते. या विषया संबंधी नक्की काय झाले आहे याची संपूर्ण माहिती घेतल्यानंतर आपण पुन्हा सभागृहाचे कामकाज पुढे सुरु केले. या घटनेची माहिती घेण्यास पुरेसा अवधी मिळावा, खात्री पटावी, यासाठी आपण सभागृहाची बैठक काही काळ तहकूब केली होती. सभागृहात जे मांडले गेले तशी वस्तुस्थिती होती किंवा नाही याची आपण पूर्ण खातरजमा केलेली आहे. सर्व प्रमुख नेत्यांनी यासंदर्भातील क्लिप 4-4, 5-5 वेळा बघितल्यानंतरही एकदम निर्णय न घेता चौकशी करुन कारवाई करु असा आपण निर्णय घेतला. त्या दिवशी आपण सस्पेन्शन सुध्दा मान्य केले नव्हते इतका बेनिफिट ऑफ डाऊट देण्याचा आपल्याकडून पूर्ण प्रयत्न झालेला आहे.

सभापती महोदय, मला असे वाटते की, विधिमंडळाच्या अधिवेशनाला येणाऱ्या विधानसभा सदस्यांना अशा पध्दतीने वागणूक देणे योग्य नाही. अशा प्रकारची वागणूक दिल्यामुळे स्वाभाविकपणे सदस्यांना अधिवेशनाच्या कामात भाग घेण्यासाठी झालेला उशीर, प्रश्नोत्तराचा तास चुकणे अशा गोष्टी घडलेल्या आहेत.

सभापती महोदय, हे सर्व होत असतांना मला असे वाटले की, अधिकारी अशा प्रकारे वागलेला असतांना सुध्दा आबा त्याला एवढे का प्रोटेक्शन देत आहेत ? परंतु यासंदर्भात सस्पेन्शनचा आग्रह न धरता या प्रकरणाची सखोल चौकशी लवकर करु असा निर्णय घेण्यात आला. या विषयाच्या संदर्भात आपल्या प्रमुख नेत्यांनी अशा प्रकारची मानसिकता दाखवली व त्या पध्दतीने चर्चा पुढे गेली.

सभापती महोदय, दुसऱ्या दिवशी विधिमंडळात जी घटना घडली त्याविषयी आपल्या सभागृहात माननीय सभापती महोदयांनी या विषयीचे सगळयांचे मत ऐकून घेऊन त्यासंदर्भात खेद व्यक्त केला व विधानसभेच्या माननीय अध्यक्षांनी यासंदर्भात माफी मागगितली. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी तसेच माननीय गृह मंत्री महोदयांनी तसेच माननीय विधानसभा विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथराव खडसे तसेच मी स्वत: या प्रकरणी चॅनलवर सुध्दा माफी मागितली होती.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

त्यानंतर माध्यमांमध्ये याची चर्चा झाली. ही चर्चा होत असताना योग्य याची ती दखल घ्यायला पाहिजे होती. पण ती घेण्यात आली नाही. मी एका चॅनेलवर चर्चेसाठी गेलो असताना सर्वप्रथम माफी मागितली व वस्तुस्थिती सांगण्याचा प्रयत्न केला. चलन का फाडले, तू मला का अडवले, शिवी का दिली,असे सन्माननीय सदस्य का विचारत होते याबाबत माझ्याकडे विचारणा करण्यात आली. तेव्हा मी सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी शिवी दिली नाही. असे काही घडले नाही. त्यांनी चलनाचे पैसे भरले आहेत. ते भरल्यानंतर दोन कलमे कुठली लावली आहेत अशी विचारणा सन्माननीय सदस्यांनी पोलीस शिपायाकडे केली असता ते आमच्या अधिकाऱ्यांना विचारावे असे त्याने सांगितले. त्यामुळे मी तुम्हाला विचारीत आहे, मी लोकप्रतिनिधी आहे, आमदार आहे, असे त्यांनी सांगितले. तेव्हा लोकप्रतिनिधी या नात्याने कुठली कलमे लावली आहेत ते तरी मला कळू द्यावे असेही त्यांनी सांगितले. त्यावर तो अधिकारी म्हणाला की, आमदार असशील तर घरचा. हे सर्व वक्तव्य मी चॅनेलवरून सांगण्याचा प्रयत्न करत असताना तुम्ही त्याचे समर्थन करता काय, अशी विचारणा करण्यात येत होती. मी वस्तुस्थिती मांडण्यासाठी गेलो होतो. पण त्या वस्तुस्थितीचा विपर्यास काढण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. जे काही घडले आहे, त्याचे विश्लेषण करण्याचा अधिकार माध्यमाना आहे. लोकशाहीतील प्रत्येकाला आहे. विश्लेषण करीत असताना वास्तव समोर आले तर त्यावर मत देण्याचाही अधिकार आहे.एका बाजूने ही अशी मानसिकता ड्राईव्ह करत जायची हे बरोबर नाही. राजकीय व्यवस्था खिळखिळी केल्यामुळे लोकशाही बळकट होईल असे मला वाटत नाही. मीडिया ट्रायल चालवित असताना ती योग्य पद्धतीने चालवली पाहिजे. लोकशाहीमध्ये चार स्तंभ आहेत. त्यापैकी मीडिया हा एक स्तंभ आहे. नोकरशाही, न्यायपालिका आणि आपण या सर्वांनी एकमेकांना पाडायचा प्रयत्न केला तर त्यातून लोकशाही बळकट होणार नाही. चुकले असेल तर ते जरूर दाखविले पाहिजे. जे चुकले आहे ते दाखवत असताना सगळेच्या सगळे आरोपी आहेत असे कसे दाखवतात. एफआयआरमध्ये दोनच नावे घेतली आहेत. बाकी पंधरा हिरवे आणि लाल बिल्ले लावलेले होते असा उल्लेख त्यांनी केलेला आहे. लाल बिल्ले म्हणजे आपल्या सदनातील सदस्य असा अर्थ होतो. जेव्हा ही घटना घडली तेव्हा आपण सर्वजण सभागृहात बसलो होतो. ही घटना घडली आहे

..2

श्री.विनोद तावडे...

हे आपल्याला देखील माहीत नव्हते. याचा अर्थ हा एफआयआर देखील नीट लिहिलेला आहे, असे म्हणता येत नाही. तरी देखील आपण संशयाचा फायदा देऊया. दोन नावे असताना देखील माननीय विधान सभा अध्यक्षांनी विधान मंडळामध्ये जे घडले आहे ते बघून कारवाई केली. असे असताना काही चॅनेल्सनी जास्त नावे दाखविली. सन्माननीय सदस्य डॉ.कुटे व कॅ.अडसूळ हे या प्रकरणात नव्हते हे दुसऱ्या दिवशी सिद्ध झाले. तेव्हा माझी अशी अपेक्षा होती की, या दोघांना आम्ही चुकून मवाली बोललो अशी स्ट्रीप त्या चॅनेलवर तरी येईल. त्यासंबंधी दिलगिरी व्यक्त होईल असे वाटले होते. पण तेही नाही. सन्माननीय सदस्य डॉ.कुटे यांच्या पत्नी व त्यांची मुले गाव सोडून मुंबईत आले. चॅनेल्सवर सतत बातमी आल्यामुळे मुलांना शाळेमध्ये हीन वागणूक मिळाली. त्यात फॅक्ट नव्हते. ते यात कुठेही नव्हते. मग त्यांनी या मुलांवर अन्याय झाला हे कव्हर का केले नाही ? आम्ही दिलगिरी व्यक्त करतो. असे मीडियाने म्हणायला पाहिजे होते. मीडियाने फेअरपणे काम केले पाहिजे. आमच्याकडून काल चूक झाली, त्यांचे नाव नव्हते त्याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करतो हा मोठेपणा दाखविला असता तर त्यांचे इंटेन्शन प्रमाणिकपणाचे होते असे म्हणायला वाव होता. जे घडले त्याची चीड येथे बसलेल्या प्रत्येकाला होतीच. यासंबंधी आम्ही सर्वजण आमची मते व्यक्त करीत होतो. विधानसभेच्या आवारात असे घडणे आम्हाला अपेक्षित नव्हते. पण बाहेर वेगळे चित्र रंगविले गेले. राज्य कायद्याने चालले पाहिजे, घटनेनुसार चालले पाहिजे, असे म्हणणारे संपादक सुद्धा कायद्याने चालणाऱ्या विधान सभेच्या माननीय अध्यक्षां सुद्धा प्रश्न विचारू लागले की, यांनी कोणती नैतिकता पाळली? एखादी घटना चुकीची असेल तर त्या घटनेवर आघात केलाच पाहिजे. तसा आघात प्रिंट मीडियाने ही केला आहे. परंतु,प्रिंट मीडियाने असभ्यतेची रेषा कुठेही ओलांडली नाही. मी सगळे अग्रलेख आणि बातम्या वाचल्या. प्रिंट मीडियाने पत्रकारितेचे सर्व मापदंड पाळून कठोर टीका केली आहे. अशा टीकेचे आपण स्वागत केले आहे. अशा टीका जे वास्तव आहे ते स्वीकारून देखील झेलल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक मीडियामधील काही ठराविक व्यक्ती आपण न्यायालयात बसलो आहोत असे मानतात. हा जनतेचा आवाज आहे, हे जनतेचे प्रश्न आहेत असे ते मानतात.

यानंतर श्री.अजित.....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

चॅनेलवर, 80 टक्के, 92 टक्के लोक "होय" म्हणतात असे दाखविले जाते तेव्हा किती एसएमएस आले याची माहिती घ्यावी.

सभापती महोदय, माझे एकदा दुपारी रेकॉर्डींग झाले आणि त्यावर एसएमएस घेतले. माझे म्हणणे आहे की, असे कधी कधी करावे लागते. पण अशा काही गोष्टी मीडियाने केल्यास आम्ही त्याकडे दुर्लक्ष करतो. परंतु मागील दोन दिवसांपासून ज्या पध्दतीने चित्र रंगविणे चालू आहे त्याचा कन्सर्न सभागृहाला नक्की घ्यावा लागणार आहे. केवळ आमदार नाही तर विधानसभेचे माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री यांचा त्याच्याशी संबंध जोडणे योग्य नाही. ज्या गोष्टी चुकीच्या असतील त्या दाखविल्या पाहिजेत. आम्ही आमच्या चुका मान्य करतो. परंतु चॅनेल्सवाले आपल्या चुका न दाखविता, न्यायाधीशाच्या भूमिकेत जाऊन बोलतात. ते ज्या पध्दतीने बोलतात त्यावरुन मला असे वाटते की, महाराष्ट्रामध्ये राजकीय व्यवस्थेबद्दल आणि आमदारांबद्दल जे गढूळ वातावरण झालेले आहे आणि त्या विषयी आपणास नक्की चिंता आहे. हा जो प्रकार चालू आहे तो योग्य आहे काय ? विधानसभेतील सन्माननीय सदस्य कॅप्टन अभिजित अडसूळ यांनी मी तेथे नव्हतो असे सांगितल्यानंतर "तू तेथे नव्हता तर कोठे गेला होता ? म्हणजे कोठूनही काही तरी करुन त्या थोड्या वेळात डम्प करणे हे अन्यायकारक आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी विशेषाधिकार प्रस्तावाची सूचना दाखल करण्यात आलेली आहे आणि त्यावर ज्या भावना व्यक्त केल्या जात आहेत त्या भावना त्यांनी सकारात्मक पध्दतीने घेतल्या पाहिजेत अशी माझी अपेक्षा आहे. आमच्या ज्या काही चुका झाल्या असतील त्या दुरुस्त करण्याची आम्ही तयारी दाखविली आहे. त्यांचे काही चुकले हे आम्ही दाखविले तर त्यांनी ते दुरुस्त करण्याची तयारी दाखविली पाहिजे. या दोन्ही पध्दतीने लोकशाहीतील चार स्तंभानी काम केले तर ही लोकशाही अधिक मजबूत होईल आणि आपण लोकशाही मजबूत होण्यासाठी काम केले पाहिजे हे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, गेल्या दोन-तीन दिवसांपासून घडत असलेल्या दुर्दैवी घटनेबद्दल आणि लोकशाहीतील सर्वात सार्वभौम संस्था असलेल्या विधिमंडळांच्या प्रमुखांवर तसेच या विधिमंडळात जनतेने निवडून पाठविलेल्या लोकप्रतिनिधींच्या बाबतीत ज्या पध्दतीने वाहिन्यांवर वृत्तांकन करण्यात आले, विश्लेषण करण्यात आले, ते योग्य नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, काल, या ठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सभागृहाची बैठक स्थगित झाली. येथील प्रकारामुळे जे सदस्य थांबले होते ते सोडून अन्य सर्वजण पक्ष कार्यालयात किंवा आपापल्या निवासस्थानी गेले होते. मी देखील घरी जाऊन काय बातम्या आहेत म्हणून टीव्ही लावला तर चॅनेलवर "मवाली आमदार नं.1 आणि त्या आमदाराचा फोटो," अशी बातमीची सुरुवात होती. दोन्ही सभागृहात बसलेले सदस्य हे गुंड आहेत, मवाली आहेत, समाज विघातक कृत्य करणारे आहेत आणि कोणालाही न जुमानणारे आहेत अशाप्रकारचे चित्र चॅनेलवर रंगविण्यात आले.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

महोदय, या निमित्ताने मी या सभागृहाचे दिवंगत सदस्य डॉ.वसंत पवार यांच्या बाबतीत घडलेली घटना सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. डॉ.वसंत पवार सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर नाशिकला विमानाने जावयास निघाले होते. त्यांच्या स्वीय सहायकाने त्यांचे रिव्हॉल्व्हर चुकून त्यांच्या बॅगेमध्ये ठेवले. परंतु त्या बॅगेमध्ये रिव्हॉल्व्हरचे लायसेन्स नव्हते. विमानतळावर तपासणी झाली असता त्यांच्या बॅगेमध्ये रिव्हॉल्व्हर सापडले. सभापती महोदय, सायंकाळी 5 वाजेपासून रात्रीच्या 12 वाजेपर्यंत "विधिमंडळ सदस्याच्या बॅगेमध्ये रिव्हॉल्व्हर सापडले, लायसेन्स नाही, चौकशी सुरु...." या मथळ्याखाली बातमी दाखविणे सुरुच होते. सन्माननीय सदस्यांनी रिव्हॉल्व्हर बाबत विमानतळावर स्पष्टीकरण दिले. त्यांनी सांगितले की, हे रिव्हॉल्व्हर मी तुमच्याजवळ ठेवतो, मी सुध्दा तुमच्याजवळ थांबतो. माझा माणूस नाशिकला जाईल आणि लायसेन्स घेऊन तुमच्याकडे येईल. परंतु तरी सुध्दा ती बातमी पाच-सहा तास त्या पध्दतीने दाखविली गेली.

महोदय, लोकांना हल्ली वर्तमानपत्र वाचावयास वेळ कमी मिळतो की काय माहीत नाही. आज चॅनेल्स हे इन्स्टंट फूड सारखे झाले आहे. घटना घडली की ती लगेच दाखविली जाते. त्यामुळे चॅनल्समध्ये स्पर्धा सुरु होते. स्पर्धा सुरु झाल्यानंतर छोटीतली छोटी घटना असली तरी ती राष्ट्रीय स्तरावर कशी न्यायची हा चॅनेल्सवाल्यांचा प्रयत्न असतो. एखादे मूल खेळताना बोअरमध्ये अडकले की सर्व चॅनेल्स त्या बातमीच्या मागे लागतात. त्या वेळी दुसरी कोणतीच बातमी दाखविली जात नाही. त्या मुलाला वाचविण्यासाठी क्रेन कशी आणली, त्या मुलाला कसे वाचविले, मुलाची अवस्था कशी आहे, इत्यादी अनेक बाबी रंगवून दाखविल्या जातात. त्या वेळी लोकांसमोरील इतर प्रश्न संपले आहेत की काय, असे दाखविण्याचा प्रयत्न केला जातो. बोअरमध्ये पडलेले मूल हा देशातील एकमेव प्रश्न असून, त्याला बाहेर कसे काढायचे या बाबतच्या बातम्या रंगवून दाखविल्या जातात.

महोदय, मी तर म्हणेन की, हा गुंगी आणणारा प्रकार आहे. मला वाटते या मागे षडयंत्र आहे. यातून एकूण व्यवस्था कशी कोलमडून पडेल याचा विचार केला जातो. शिवाय या माध्यमांचा दुरुपयोग करुन आंतरराष्ट्रीय पातळीवर सत्ता उलथविता येतात. किंबहुना त्यातून अनाइकी तयार केली जाऊ शकते. लोकांना पळायला लावू शकतो अशा प्रकारची जादूची ताकद आमच्या हातात

श्री.हेमंत टकले....

या माध्यमांनी दिली आहे, आम्ही काहीही करु शकतो अशा प्रकारची एक दहशत या चॅनेल्सच्या माध्यमातून सर्व सामाजामध्ये निर्माण झाल्याचे आपण पाहतो.

महोदय, कोणाकडून चूक घडतच नाही असे माझे म्हणणे नाही. एखाद्या शिक्षण संस्थेने चूक केली असेल, एखादे चुकीचे कागदपत्र सादर केले असेल किंवा त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला असेल तर, ती व्यक्ती किती मोठी गुन्हेगार आहे याची बातमी 2-3 दिवस सातत्याने दाखविली जाते. ज्यांच्यावर या राज्याचे कायदे करण्याची जबाबदारी आहे, किंबहुना कायद्याने राज्य चालावे यासाठी प्रशासन व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याची ज्यांची जबाबदारी आहे त्या विधिमंडळातील सदस्यांना टार्गेट केले तर मुळावर घाव घातल्यासारखे होईल, असा त्यांचा समज आहे. सबंध जनमाणसात विधिमंडळ सदस्यांबद्दल घृणा निर्माण झाली पाहिजे असा त्यांचा प्रयत्न असतो. एखाद्या ब्लॅकमेल करणाऱ्याची जशी दहशत असते तशा पध्दतीची दहशत चॅनेल्सवाल्यांची होते की काय, इथपर्यंत ही मर्यादा आता जाऊन पोहोचली आहे. एखादी बातमी जोरात दाखविण्यास सुरु केली की सर्व आपल्याला शरण येतात, सर्व आपल्यापुढे खाली मान घालून उभे राहतात असा चॅनेल्सवाल्यांचा समज आहे. मी तर म्हणेन की, त्यांना न्यायालयाच्या निर्णयाची सुध्दा गरज वाटत नाही. कार्यक्रमातच 94 टक्के लोक या बाजूने आहेत, 99 टक्के लोक या बाजूने आहेत असे सांगून मोकळे होतात. या माध्यमातून एक प्रकारचा लोकक्षोभ तयार करावयाचा, जे सुरु असेल त्यामध्ये कशा पध्दतीने बाधा येतील आणि कशा प्रकारे जास्तीत जास्त बदनामी होऊ शकेल हे दाखविले जाते.

त्यामध्ये एक उप कथानक असते.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

त्या चॅनेल्सवर ही चर्चा आणि विश्लेषण चालू असताना ते स्वत: आव्हानात्मक भाषा वापरण्यास सुरुवात करतात. ती आव्हानात्मक भाषा अशी असते की, ठीक आहे, मी हे जे बोलत आहे ते जनतेच्या वतीने बोलत आहे. हे सर्व चॅनेल्सवाले कोणत्या तरी मजल्यावरच्या स्टुडिओमध्ये बसून आम्ही 11 कोटी जनतेच्या वतीने प्रश्न मांडतो असे म्हणतात. म्हणजे आम्ही कोणीच नाही. त्यांना कोणीही निवडून दिलेले नाही. त्यांच्या हातामध्ये यंत्रणा आहे आणि त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणारे काही समूह आहेत. ते समूह त्यांच्या भल्यासाठी हे करतात. आता याच्या पुढचे टार्गेट कोण याची यादी सुध्दा कदाचित त्यांच्याकडे तयार असेल. त्याप्रमाणे हा सर्व कारभार चाललेला दिसतो.

सभापती महोदय, हे सर्व करीत असताना ते पुन्हा आव्हान देतात की, ठीक आहे, मला माहीत आहे, हे सर्व मवाली लोक आहेत, यांची अवकात नाही, अशा पध्दतीचा प्रचार करतात अणि वर सांगतात की, हे झाले तर माझ्याविरुध्द हक्कभंग सुध्दा येण्याची शक्यता आहे आणि तुमची हिंमत असेल तर हक्कभंग कराच, हक्कभंग ठराव टाकून दाखवाच. म्हणजे त्यांना त्यातून पुन्हा एकदा लोकासमोर जाण्यासाठी या यंत्रणेला आणि या व्यवस्थेला आणि या सार्वभौम सभागृहामधील प्रमुखांबद्दल, राज्याच्या प्रमुखांबद्दल अशा पध्दतीने या चॅनेलवरुन बोलणे किंवा ते दाखविणे चालू असते.

सभापती महोदय, ते दाखविण्यामध्ये सुध्दा एक गंमत असते. त्यांच्याकडे आधीचे शूट बऱ्यापैकी असते ते आपल्याला दाखवितात. काही वेळा मंत्र्यांच्या बैठका होत असतात, लोक जात-येत असतात आणि आतले दृश्य दाखविताना आधी कोठे तरी शूट केलेला भाग दाखवितात आणि त्याचा काही संबंध नसतो. अशा प्रकारचे जगलिंग करताना त्यांना जे उपयोगी पडणारे आहे ते दाखवितात. मला कित्येक वेळा आश्चर्य वाटते की, पहिला शॉट सह्याद्रीच्या बाहेरचा येतो आणि आता जाऊन बघावे तर दुसरेच कोणते तरी सभागृह असते. कारण ज्या पध्दतीने ते हे सर्व जुळवतात ती त्यांच्या एडिटींगची कमाल आहे. त्यांना हवा तो मतितार्थ त्यातून व्यक्त होत नाही तोपर्यंत तेच ते दिवसभर सातत्याने चालू ठेवतात. सकाळी उठून बघितले तरी तेच सुरु असते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

दुपारी विश्रांतीच्या वेळी बघितले तरी तेच दिसते. रात्री बघितले तर पुन्हा तेच दिसते. हे सर्व कशासाठी ? हे सर्व यासाठी करतात की, आता आमची ताकद अशी आहे आणि आम्हाला कोणीही अडवू शकत नाही. या सर्व मंडळींना आपण सर्वांनी एकत्र येऊन जबाब देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, या सर्वांना कोड ऑफ कंडक्ट आहे की नाही ? त्यांच्यावर कोणतेही नियंत्रण आहे की नाही ? एकीकडे हे दाखवितात आणि दुसरीकडे आपले उत्पन्न वाढावे म्हणून अश्लील जाहिराती दाखवितात. या ठिकाणी आपण अनेक विषयांवर बोलतो. आपण अंधश्रध्देवर बोलतो. त्या ठिकाणी अंधश्रध्दा वगैरे काही नाही. सकाळी उठून पाहिले कोणी तरी एखादा मणी गळ्यात घातल्यानंतर तुम्हाला काय काय फायदे होतील हे दाखवितात. कारण त्यांनी पैसे दिलेले असतात. त्या मण्यासाठी त्यांना तेवढे करावेच लागते. त्यामध्ये कमर्शियल व्हायेबिलिटी हा मुख्य भाग असतो. त्यांच्या लक्षात आले आहे की, आपण जर या सार्वभौम सभागृहाबद्दल बोललो तर आपली कमर्शियल व्हायेबिलिटी सर्वात जास्त वाढते, आपला प्रेक्षकवर्ग वाढतो, एमएमएस करणारे 99 टक्केच काय तर 100 टक्क्याच्या पुढे जातात. त्यामुळे या जीवघेण्या स्पर्धेमध्ये उतरताना त्यांच्यावर कोणतेही निर्बंध राहिलेले नाहीत. या सर्वांवर निर्बंध आणण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मला असे वाटते की, या पध्दतीने अवमानित करण्याचा केवळ प्रयत्नच केलेला नाही तर हेतुपुरस्सर केलेला हा प्रकार आहे. या सर्व प्रकाराचा आपण सर्वांनी तीव्र शब्दात निषेध केला पाहिजे. सभापती महोदय, या निमित्ताने ही हक्कभंगाची सूचना आपण स्वीकारावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधिमंडळ आणि या विधिमंडळाच्या सदस्यांच्या संदर्भात जनक्षोभ कसा निर्माण होईल आणि विविध मतदार संघातून आपल्या घरादाराची, कुटुंबाची पर्वा न करता लोकांमध्ये रात्रंदिवस असणारे लोकप्रतिनिधी, जनतेच्या प्रश्नावर झोकून देऊन काम करणारे लोकप्रतिनिधी, एवढेच नव्हे तर ते केल्यानंतर जनतेला सामोरे जाऊन आपल्या कामाची पोचपावती मागणारे लोकप्रतिनिधी. अशा प्रकारे 3-3, 4-4 वेळा निवडून आलेले लोकप्रतिनिधी आहेत. परंतु या महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींना प्रचलित भाषेत व्हिलन म्हणतात असेच हे आहेत. त्यांनी महाराष्ट्राचे कसे वाटोळे केले आहे, कायदा व सुव्यवस्थेच्या पलीकडेही जाऊन हे कसे दरोडेखारे आहेत, चंबळच्या खोऱ्यातून आले आहेत, आता या समाजाचे काय होणार अशा प्रकारचे वातावरण गेले दोन दिवस निर्माण झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी उल्लेख केला आहे. त्या चॅनलवर बघा, बघा, पृथ्वीराजजी चव्हाण, आपण ऐकत आहात काय ? महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण तुम्ही ऐकत असाल तर.... म्हणजे काय ? राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा असा उल्लेख केला जातो ? ही कोणती भाषा आहे ?

सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ त्यावेळी त्यांनी काय केले होते, त्यावेळी काय झाले होते, त्यांच्या मागे काय लागले होते की शेवटी त्यांनी चॅनलच सोडून दिला. आमचे तर सोडून द्या. शिवसेनाप्रमुखांची बदनामी आम्ही सहनच करत नव्हतो. एकदा तसा प्रयत्न झाल्यावर आम्ही झी टी.व्ही.ला धडाच शिकवला होता.

मला आठवते की, आमचे श्री.बाबासाहेब कुपेकर यांचे व्यक्तिमत्व बिलंदर, बदमाश असे नव्हते. म्हाडाच्या फ्लॅटच्या प्रकरणात त्या वाहिनीवर असे काही दाखवित होते, असे काही दाखवित होते की विचारु नका. त्या वेळी माझा फोटो झूम करुन दाखवित होते. एरवी माझा फोटो कधीही दाखवित नाहीत. हा बघा बदमाश, म्हणजे मी, बदमाश. श्री.बाबासाहेब कुपेकर यांनी विनवणी करुन सांगितले की, माझे काही नाही हो. ते विधिमंडळाचे पीठासीन अधिकारी होते. त्यांनी कशी बदमाशी केली, कशी लुच्चेगिरी केली, स्वत:चे दहा फ्लॅटस् असताना आणखी एक फ्लॅट घेतला. ते म्हणत होते की, माझा कोठेच फ्लॅट नाही, मुंबईही फ्लॅट नाही. मी मागितलाही नाही. हे सर्व दाखविले जाते त्यावेळी आपण नक्की काय करीत आहोत ? वाहिनीचा टीआरपी

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.दिवाकर रावते.......

वाढविण्यासाठी कोणत्या व्यक्तीला लोकांसमोर नेतो, कशासाठी नेतो याचे कोठेही भान ठेवता बघा, बघा, बघा काय चालले आहे ? यांच्यावर हल्ले झाले की मीडियावर हल्ला केला जातो. पण हल्ले होईल असे तुम्ही का वागता ? तुम्ही चौथा स्तंभ आहात, आमच्यातील वैगुण्य तुम्ही दाखवा. आमचे चुकत असेल तर आमच्यावर टीका करावी असे माझे मत आहे. समाज जीवनामध्ये वावरत असताना आमच्याकडून चुका होतात, कारण आम्हीही माणूस आहोत. त्या चुका सुधारण्याची आम्हाला संधी आहे या दृष्टीने आम्ही त्या बघतो. आमच्यातील वैगुण्य दाखविल्यानंतर त्या चुका सुधारण्याकरिता आम्ही वापरले पाहिजे. आमच्या मानसिकतेबाबत लोकांमध्ये चीड येईल असे लोकांमध्ये दाखववावयाचे ही जी पध्दत निर्माण झाली आहे ती चुकीची होती.

सभापती महोदय, आपण आमच्यासाठी आपल्या स्थानावरुन ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, झालेल्या घटनेबद्दल दु:ख व खेद व्यक्त केला, त्याचा निषेध केला होता त्यामध्ये सर्व आले होते.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांच्या मुलाचा व मुलीचा काही दिवसापूर्वी विवाह झाला. या ठिकाणी मराठवाड्यातील काही सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत. त्या भागात साध्या माणसाच्या घरचे लग्न असले तरी त्यासाठी 20-25 हजार माणसे उपस्थित असतात.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:45

श्री. दिवाकर रावते....

मराठवाड्यातील परिस्थिती मला माहीत आहे. तेथील कार्यक्रमांसाठी मी नेहमी जात असतो. मराठवाड्यामध्ये सावडायला इतकी माणसे येतात की.... ग्रामीण भागातील ती एक पध्दत आहे. अतिरेक केला तर तो दाखवायला पाहिजे, इतरांनी त्यापासून धडा घ्यावा अशी परिस्थिती आहे. राज्यमंत्री महोदय श्री.भास्कर जाधव यांच्या मुलाच्या लग्नाच्या बाबतीत त्यांनी इतके दाखविले, इतके दाखविले की, झक मारली आणि मुलाचे लग्न केले असे त्यांना वाटले असेल. शेवटी श्री. शरद पवार साहेबांनी जाहीर केले की त्यांनी माफी मागितलेली आहे त्यामुळे हा विषय संपलेला आहे.

ग्रामीण भागामध्ये अत्यंत तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या दुष्काळी परिस्थितीचे चित्रण जेव्हा आपल्या माध्यमातून दाखविता त्यावेळी जनतेमध्ये जागरुकता निर्माण होते. त्यामुळे लोक खाऊचे पैसे घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांकडे येत आहेत. त्या 500 रुपयानी दुष्काळ निवारण होणार नाही, त्या 500 रुपयात पाण्याचा एक हंडाही येणार नाही. पण त्या 500 रुपयाच्या पाठीमागे दुष्काळ निवारण्यासंबंधीची 5 कोटी रुपयाची जी भावना आहे ती व्यक्त होत असते. ती भावना तुमच्या माध्यमातून व्यक्त होत असते त्यावेळी आम्हाला बरे वाटते, आम्ही तुमचे आभार मानत असतो.

या दुष्काळासंबंधी श्री. उदय निरगुडकर हे पाण्यासंबंधी तज्ज्ञांच्या बैठक घेत आहेत. ते सर्व बघण्यासारखे असते. मला जे ज्ञान नसते ते मला तेथून प्राप्त होते. मी रात्रंदिवस काम करतो. परंतु मला जे समजत नाही ते त्यातून समजते. या सगळया विषयांची जाण आम्ही तुमच्याकडून घेण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी अजाणते की जाणतेपणाने तुम्ही आमच्या सर्व तंगडया तोडून, हातपाय तोडून आम्हाला निर्बुध्द करुन येथे बसविता, किती मुर्ख आहात तुम्ही असा प्रश्न निर्माण होतो. आपण सर्व टीकाटिपणी करीत असता. पण एका मर्यादेच्या पलीकडे जाऊन... आम्ही असे म्हणतो की कालच्या घटनेमध्ये जे घडले ते अयोग्य असले तरी दोघांनी दोघांच्या मर्यादा सांभाळल्या पाहिजेत. आमदारांनी आमदारांच्या मर्यादेत राहिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. हर्षवर्धन जाधवला मारण्यामध्ये पोलिसांनी अतिरेक दाखविलेला आहे, त्यांनी त्यांच्या मर्यादा सांभाळल्या पाहिजेत असा हा विषय आहे. हा विषय मांडत असताना मी माननीय गृहमंत्र्यांना

..2..

श्री. दिवाकर रावते...

अत्यंत नाराजीने सांगू इच्छितो की, दोन आमदारांना पकडायचे आहे, गुन्हा दाखल झालेला आहे. या देशातील कायदा त्याची काळजी घेईल. कायदा कोणालाही सोडत नाही. कितीही आतंकवादी आणि किती अतिरेकी असला तरी तो पळून जाऊ शकत नाही एवढी आपल्या कायद्याची ताकद आहे. त्याबद्दल आम्ही पोलिसांचे अभिनंदन करतो. हे दोन आमदार घेऊन जाण्याकरिता पोलिसांची फौज होती. विधान भवनाच्या इमारतीला दोन गेट आहेत. दोन आफिसर तेथे उभे राहून आमदार बाहेर पडल्यानंतर त्याना सांगितले असते की तुम्हाला आम्ही अटक करतो, तर ते तुमच्या बरोबर आले असते. पण काल पोलिसांनी हिडीस असे प्रदर्शन दाखविले. सगळ्या गेटवर 10-10 अधिकारी होते, चार-चार गाड्या लावल्या होत्या. कोण दरोडखोर आहेत, कोण बदमाश आहेत त्या पकडण्यासाठी उभे आहोत अशा प्रकारे ते उभे होते, आणि ते मीडियाला एसएमएस करीत होते, थांबा, लाईव्ह दाखवतो, आमदारांना पकडून नेणार आहोत, त्यांना फरफटत नेणार आहोत, बघा. आणि ते सर्व मीडियावाले आमदारांना कधी पकडून नेतात, कधी फरफटत नेतात आणि ते दृश महाराष्ट्राला कधी दाखवतो याच्या प्रतीक्षेत होते. एवढे हिडीस आणि अयोग प्रदर्शन पोलिसांनी केलेले आहे. या पोलिसांच्या हिडीस प्रदर्शनाचा निषेध माननीय गृहमंत्र्यांकडून व्हायला पाहिजे. त्यांनी सांगितले पाहिजे की, जे झाले ते बरोबर नाही. पोलीसांच्या माराच्या किती तरी घटना आहेत. मी धुळयाला गेलो.

श्री. आर.आर.पाटील : आता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उल्लेख केला की, दोन पोलीस कर्मचारी विधान भवनामध्ये आले होते...

श्री. दिवाकर रावते : मी म्हटले की गेटवर पोलीस उभे होते...

श्री. आर.आर.पाटील : विधानसभेमध्येही याबाबत चर्चा झाली. एकाने पास काढला होता आणि त्याच्या बरोबर एक अधिकारी आला होता. त्यांचे म्हणणे असे आहे की, सीसीटीव्हीचे फूटेज गुन्हा नोंदविण्याकरिता घेण्यासाठी आलो होतो, परवानगी घेऊन आलो होतो, आम्ही लेखी पत्र दिले होते. तरी सुध्दा विधानसभेमध्येही हा प्रश्न उपस्थित झाला आपणही हा प्रश्न उपस्थित केला. आम्ही सुध्दा ब्रिफिंगसाठी अधिका-यांना बोलावतो त्यावेळी साधारणत: पोलिसांनी येथे येऊ नये, लोकशाहीचे वातावरण रहावे, मोकळेपणाने बोलता यावे म्हणून ड्रेसवर या सदनामध्ये कुणालाही प्रवेश दिला जात नाही....

...नंतर श्री. गिते...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

तसेच कोणी प्रवेश सुध्दा करीत नाही. अनेक वेळा अचानकपणे अधिकाऱ्यांना बोलाविले जाते. माझी अशी माहिती आहे की, अंगावर ड्रेस असतो आणि सर्व ड्रेस बदलून येण्यास सुध्दा अडचण होते. म्हणून अनेक वेळा गाडीत बसून दुसऱ्याचा ड्रेस घालून अधिकारी भेटावयास येतात. काल एक पी.आय.ने विधानभवनाचा प्रवेश पास न घेता त्याने विधान भवनात प्रवेश केला, त्याने परवानगीसाठी अर्ज केला होता. परंतु त्याने पास न घेता विधानभवनात प्रवेश केला. तो कशाला आला होता अशी विचारणा झाली असता त्याने सांगितले की, मी सी.सी.कॅमेराचे फुटेज घेण्यासाठी आलो होतो. सन्माननीय आमदारांचे म्हणणे तो आमदारांना अटक करण्यासाठी आला होता. त्याने विधानभवनात पासाशिवाय प्रवेश करणे ही चूक होती. मी त्याला आज निलंबित करण्याची कारवाई करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब, माझा मूळ उल्लेख वेगळा होता. विधानभवनाच्या दोन्ही गेटवर दोन-दोन पोलीस ठेवले असते तर आमचे आमदार त्यांच्याकडे सहज गेले असते एवढाच मी उल्लेख केला आहे.

श्री.आर.आर.पाटील : मी माननीय अध्यक्षांना देखील विनंती करणार आहे. सभापती महोदय, सिक्युरेटी विभागात पोलीस दलाचे कर्मचारी काम करणारे असले तरी हा संपूर्ण प्रिमायसेस आपल्या अखत्यारित येतो. त्याला प्रवेश कसा दिला गेला याची चौकशी आपल्या कार्यालयाकडून व्हावी त्यात जे दोषी असतील त्यांच्यावरही कारवाई केली जावी, अशी माझी मागणी आहे.

**सभापती** : आपण सांगितले त्या पध्दतीने जरुर चौकशी करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : आबासाहेब, आपण गृहमंत्री म्हणून शोभता. विधानभवनात दोन पोलीस अधिकारी आले होते याचा मी उल्लेखच केला नाही. तो आमचा विषय नव्हता. तो विधानसभा सभागृहाचा विषय होता.

श्री.भाई जगताप : मी तो उल्लेख केला आहे.

श्री.दिवाकर रावते : मी असे म्हणालो की, विधानभवनात दोनच गेट आहेत, त्या ठिकाणी दोन-दोन अधिकारी उभे केले असते तरी आमदार त्यांच्याकडे गेले असते. पोलीस अधिकाऱ्यांनी

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सापळा रचून, मीडीयाला एसएमएस करुन कळविले. तुम्ही थोडे थांबा. आता आम्ही त्यांना घेऊन जाणार आहोत, ते सर्व अश्लाध्य होते. मूळ मुद्दा असा आहे की, या सगळया पध्दतीमधून पीठासीन अधिकारी कसे अयोग्य आहेत. त्यांनी योग्य निर्णय का घेतला नाही. त्यांनी त्यांना का पकडू दिले नाही. अमुक का झाले नाही, तमुक का झाले नाही असे बाहेर असे वातावरण केले गेले की, विधिमंडळ म्हणजे काहीच नाही. विधिमंडळाला आमदार मालक समजतात काय, तुम्ही विधिमंडळाचे मालक समजता काय ? आम्ही विश्वस्त आहोत. मालक आणि विश्वस्त यामध्ये खूप फरक असतो. परंतु विश्वस्तावर मालकापेक्षा जास्त जबाबदारी असते. मालक म्हणेल "शेंडी तुटो अथवा परंबी तुटो", खड्यात गेलो तरी चालेल, वर चढत गेलो तरी चालेल. परंतु विश्वस्ताला ते करता येत नाही. विश्वस्ताला अत्यंत जबाबदारीने सर्व करावे लागते म्हणून आम्ही विश्वस्ताच्या भूमिकेतून काम करीत असतो. अशा पध्दतीने हेळसांडणा करणे बरोबर नाही.

महोदय, छत्रपतींचे नाव कशाला घ्यावयाचे? छत्रपतींचे नाव घेऊन आणि दुसऱ्यांची अवकात काढणे ही गोष्ट अतिशय दुर्देवी आहे. एक वेळा, दोन वेळा नव्हे तर सातत्याने त्यांचे बोलणे चालूच होते. राग आला तर ती बाब मी आपण माणसे आहोत त्यामुळे राग येणे स्वाभाविक आहे. मला देखील त्या दिवशी राग आला होता. ही घटना बघून मी सुध्दा उद्विग्न झालो होतो. या सभागृहात मी सर्व प्रथम निषेध मांडावयास निघालो होतो. परंतु आमचे काही सन्माननीय सदस्य बोलले की, थोडे थांबा. घाई करु नका. या विषयाच्या बाबतीत आपण माननीय विरोधी पक्ष नेत्यांशी चर्चा करु. त्यावेळी मीही रागावलो होतो. तशी तुमची भावना असेल ते मला मान्य आहे. कदाचित तुमचा तोल गेला असेल, भावनेचा स्फोट झाला असेल, त्यातून तुम्ही तुमचे म्हणणे एकदा मांडले तर ते मी समजू शकतो. परंतु ते बारंवार मांडले जात होते. तसेच मी किती छान मांडले आहे, मी किती ताकदीने मांडले आहे, किती बदमाश लोक आहेत, हे किती गुंड लोक आहेत, हे किती मवाली आहेत, तीच क्लिप सारखी दाखविली जात होती. मी किती ताकदीने बोलू शकतो. तुम्ही बोला. मी माझी नाराजी कळविली आहे. एका सुसंस्कृत संपादकाकडून अशी अपेक्षा नाही. मला चार मुले आहेत, त्यातील एक मुलगा बदमाश निघाला तर संपूर्ण कुटुंब बदमाश नसते हे लक्षात ठेवा. संपूर्ण कुटुंब कधी बदमाश होत नाही.

3...

"सब घोडे बारा टक्के" सरसकट सर्वांना म्हणणे बरोबर नाही.

महोदय, माजी अध्यक्ष माननीय बाबासाहेब कुपेकर यांच्या वेळी मला दाखविले त्याचे मला दु:ख झाले नाही. कारण मी आता अंधेरी येथे राहतो....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ KTG/ गितेनंतर 15:55

श्री.दिवाकर रावते.........

मला त्यावेळी फार दु:ख झाले. माजी विधानसभा अध्यक्ष स्व.बाबासाहेब कुपेकर यांची बदनामी झ ाली, त्यावेळी हे सगळे असह्य झाले होते. आताच माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, आम्हाला काही मर्यादा आहेत. आम्ही मर्यादा ओलांडली तर तो आमचा दोष आहे. मर्यादा सर्वांना आहेत. चौथ्या स्तंभाला देखील मर्यादा आहेत. पीठासीन अधिकारी आणि विधीमंडळाच्या संदर्भात केलेले भाष्य योग्य नव्हते. व्यक्तिगत रावते किंवा जगताप यांच्याबद्दल बोलले तर समजू शकतो. आम्हीही एका भूमिकेतून उभे राहतो, त्यातून चूक होऊ नये म्हणून तुमच्या टीकेतून आमच्यात सुधारणा होण्याची अपेक्षा असेल तर ते महत्वाचे आहे. परंतु तुम्ही आमच्याबद्दल बोलत असताना बिघडलेले आहेत, नादान आहेत, नालायक आहेत असे बोलून समाजामध्ये विधीमंडळाला आणि लोकप्रतिनिधींना वेगळ्या पध्दतीने नेणार असाल, पीठासीन अधिकारी आणि विधीमंडळ कसे अयोग्य आहे असे जाणीवपूर्वक लोकांपर्यंत मांडण्याचा प्रयत्न होत असेल तर ते अयोग्य आहे. म्हणून माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जी विशेषाधिकार भंगाची सूचना मांडली आहे ती आपण स्वीकृत करावी, अशी विनंती करतो.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, 19 मार्च रोजी विधानभवन इमारतीमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.सचिन सूर्यवंशी यांच्या बाबतीत घडलेल्या घटनेबद्दल त्याच दिवशी रात्रौ 9.15 वाजता एबीपी माझा या दूरदर्शन वाहिनीवर विश्लेषण कार्यक्रमाचे प्रसारण सुरु होते. या कार्यक्रमाचे शीर्षक 'मग्रूर आमदारांना काय शिक्षा द्यायची' हे होते. या विश्लेषण कार्यक्रमामध्ये विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, माजी मंत्री श्री.विजय वडेट्टीवार, वाहिनीचे मुख्य संपादक श्री.राजीव खांडेकर, काही वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि नामवंत पत्रकार सहभागी झाले होते. ज्येष्ठ पत्रकार आणि मुख्य संपादक श्री.राजीव खांडेकर हे वारंवार एकाच मुद्यावर बोलत होते आणि त्यांचा बोलण्याचा ओघ लक्षात घेता अतिशय स्पष्ट जाणवत होते की 'Out of vindiction' हे सगळे चालले आहे. मग्रूर, हरामखोर असे शब्द निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींबद्दल वापरले गेले. इलेक्ट्रॉनिक्स मीडियाच्या माध्यमातून राज्यातील 11 कोटी जनतेपुढे अशा प्रकारचा संदेश प्रसारित करण्याचे काम सुरु होते. सर्वच्या सर्व लोकप्रतिनिधी बदमाष आहेत, सगळेच या घटनेबद्दल दोषी आहेत अशा प्रकारचे चित्र आयबीएन लोकमत, स्टार माझा आणि त्यांना रिलेटिव्ह असलेल्या वृत्तवाहिन्यांवरुन प्रसारित करणे सुरु होते.

सभापती महोदय, दुसरी घटना घडली. सन्माननीय आमदारांना ते म्हणतात, 'Law will take its own course.' जो काही कायदेशीर गुन्हा नोंदवायचा, कायदेशीर प्रक्रिया करायची ती केली जाईल. त्यानंतरही या सभागृहातील सर्व लोकप्रतिनिधी दोषी आहेत अशा पध्दतीची मांडणी केली गेली. माननीय पीठासीन अधिकारी आणि सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री हेही याला दोषी आहेत, ते आमदारांची अटक होऊ देत नाहीत अशा प्रकारचे चित्र महाराष्ट्रातील जनतेसमोर इलेक्ट्रॉनिक्स मीडियाच्या माध्यमातून मांडण्यात आले. दुर्दैवाने या घटनेचे विश्लेषण करीत असताना श्री.निखिल वागळे अगदी पराकोटीला जाऊन तुम्ही या कृतीचे समर्थन करता का? असे विचारुन या विषयी चर्चेमध्ये सहभागी झालेल्यांकडून अभिप्राय जाणून घेण्याचे काम करीत होते.

सभापती महोदय, कायदेशीर गुन्हा नोंदविल्यानंतर सन्माननीय आमदारांना अटक व्हायची असेल तर तो भाग वेगळा आहे. पहिल्यांदा जी घटना घडली ती फक्त एकाच वृत्तपत्राने मांडली, अगोदरची क्लिप एकाच दैनिकामध्ये छापून आलेली होती. अतिशय स्पष्टपणे जाणवत होते, माननीय सदस्य श्री.क्षितीज ठाकूर हे तीन लाख मतदारांमधून निवडून आलेले आहेत, त्यांनी.......

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.........

आमदार म्हणून स्वत:चा परिचय करुन दिल्यानंतर त्यांच्याशी श्री.सूर्यवंशी हे 'तुला काय करायचे ते कर, मी एफआयआर दाखल करणार आहे' अशा एकेरी भाषेत बोलत असल्याची क्लिप आपण पाहिली. या पोलीस निरीक्षकाविरुध्द कोणती कारवाई करणार आहात हे त्याच दिवशी सभागृहाला कळणे गरजेचे होते.

नंतर 2 झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित.......

सभापती महोदय, विधानमंडळात आल्यानंतर ही व्यक्ती त्या सदस्यांना ऐकू येईल अशा उर्मटपणे बोलत होती. विधानमंडळाच्या आवारामध्ये सी.पी. आणि. राष्ट्रवादीच्या कार्यालयासमोर आर.ए.एफ. उभे होते तसेच अट्टल दरोडेखोराला घेऊन जातात त्या प्रमाणे या सदस्यांना घेऊन जाण्यासाठी रॅपीड ॲक्शन फोर्सची गाडी सुध्दा उभी केली होती. सरळ सरळ सांगितले असते तर आज जे सन्माननीय सदस्य पोलीस स्टेशनला हजर झाले आहेत ते कालच हजर झाले असते.

सभापती महोदय, परंतु एसएमएस पाठवून अट्टल गुन्हेगाराला जसे घेऊन जातात त्या प्रमाणे आमदारांना नेले जाईल अशा प्रकारचे चित्र राज्यातील 11 कोटी जनतेसमोर नेले गेले. या विषयाच्या संदर्भात अन्याय झाला म्हणून राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक झाली होती. त्या बैठकीचे एसएमएस सर्वत्र पाठविले गेले हे योग्य आहे काय ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना स्वीकृत करावी अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, विधान परिषद नियम 240 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जी विशेषाधिकार भंगाची सूचना दाखल केलेली आहे त्याच्या समर्थनार्थ मी उभा आहे.

सभापती महोदय, न्यायालय, प्रशासन, संसद आणि प्रसार माध्यमे ही लोकशाहीची चार आधारस्तंभ असतांना सद्या कोणी कोणावर टेक ओव्हर करायचे यामध्ये स्पर्धा लागली आहे. गेल्या दोन दिवसापासून प्रसार माध्यमांनी आमदारांची इमेज राडेबाज, मवाली अशी उभी केली आहे.

सभापती महोदय, मला 13 वर्षाची मुलगी आहे. सकाळी शाळेत जातांना टीव्ही सुरु होता त्यावेळेस ती म्हणाली बाबा टीव्हीवर जे काही बोलत आहेत ते तुमच्या विषयी बोलत आहेत का ? त्यावेळेस मी तिला काहीही उत्तर देऊ शकलो नाही. या सार्वभौम सभागृहात आम्ही कार्यकर्ते म्हणून आलो आहोत. रस्त्यावर संघर्ष करीत करीत येथ पर्यंत आलेलो आहोत. आमची जी मिळकत आहे त्या मिळकतीमुळेच आम्ही आमदार झालेलो आहोत. प्रसार माध्यमे जर आम्हाला चोर, मवाली, राडेबाज म्हणून पदव्या देत असतील तर ते योग्य नाही. समाजात राहून आम्ही पदव्या मिळवल्या, समाजाचे जे प्रेम मिळवले ते मातीत मिळवण्याचा अधिकार यांना कोणी दिला आहे ? गेल्या दोन दिवसापासून जे काही चालले आहे त्यामध्ये हे न्यायाधीश झालेले आहेत काय ? न्यायालय हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून तो स्तंभ यांच्याकडे कोणी दिला ? शिवसेना पक्ष प्रमुख श्री. उद्धवजी ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, प्रत्येकाने आपापल्या मर्यादेत रहावे.

सभापती महोदय,आमदारांनी आपली भूमिका बजवावी, त्यांनी आपल्या मर्यादेत रहावे. प्रसार माध्यमांनी सुध्दा आपली भूमिका बजवावी, त्यांनी आपल्या मर्यादेत रहावे. परंतु एकमेकावर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात हल्ली कोणतेही प्रकरण झाले की, संध्याकाळी जज्मेंट चॅनलवर यापुढे काय होणार आहे ते दाखवले जाते. काय करायचे ते हेच लोक ठरवित आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टींना कोठे तरी चाप बसणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांच्या बाबतीत देखील कडक कायदे होणे गरजेचे आहे. आज टीआरपीची जी काही स्पर्धा सुरु आहे याच्यातील एकाला तरी सांगा की, निवडणुकीला उभा राहा आणि निवडून या. एक संपादक लोकसभेला उभा राहिला तेव्हा त्याला केवळ 708 मते मिळाली होती. अशी यांची विश्वासार्हता. या संपादकाचे मी नाव घेऊ शकतो परंतु नोटीस दिली नसल्यामुळे त्या संपादकाचे नाव सांगत नाही. असे असतांना ते आमची अशा प्रकारे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब .......

विश्वासार्हता कशी काय मोजता ? आम्ही शिक्षण घेऊन पी.एचडी. मिळवली आहे असे असतांना ते आम्हाला चोर, राडेबाज म्हणत असतील तर ते योग्य नाही. आम्ही राजकीय कार्यकर्ते आहोत, आमच्यावर देखील असंख्य केसेस आहेत. परंतु गुन्हा केला म्हणून शरमेने मान खाली घालण्याची वेळ आमच्यावर आलेली नाही आणि तशी परिस्थिती यांनी आमच्यावर आणू नये. त्यामुळे प्रत्येकाने आपापल्या मर्यादा सांभाळणे गरजेचे आहे, प्रशासनाने सुध्दा आपल्या मर्यादा सांभाळणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, कौल-शकधर यांनी सभागृहाच्या प्रथा-परंपरेच्या संदर्भात लिहिले आहे की, जर तुम्हाला एखाद्या आमदाराला अटक करावयाची असेल तर तुम्हाला प्रथम माननीय सभापती किंवा माननीय अध्यक्षांची परवानगी घ्यावी लागते. असे असतांना काल विधिमंडळाच्या आवारात पोलीस अधिकारी कसे काय आले होते ? काल सायंकाळी 6 वाजता डी.जी.ऑफिसमध्ये मिटिंग झाली व त्या मिटिंगचे मेसेज बाहेर गेले हे काय सुरु आहे ? हे होत असतांना प्रशासनाला मीडियाची मदत मिळत होती की, बघा आता आम्ही एक एक आमदारांना कशा प्रकारे झोडून काढतो. आम्हाला आज जे काही संरक्षण मिळाले आहे ते भारतीय संहितेने दिलेले आहे. ब्रिटिश कालीन संरक्षण पुढे चालत आलेले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

आम्हाला एक दोन दिवसात संरक्षण मिळाले नाही. आम्ही आमचे काम कोणालाही न घाबरता करावे, कोणाच्याही दबावाखाली करू नये म्हणून हे संरक्षण देण्यात आले आहे. काल पासून यांना विशेषाधिकार कोणी दिले, हे कुठल्या कायद्यात बसते यावर मीडियात चर्चा सुरू आहे. असे ठरविणारे हे कोण आहेत ? विशेषाधिकाराचा भंग होतो किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार समितीला आहे. आम्हाला हक्कभंग मांडण्याचा अधिकार आहे. श्री.सचिन सूर्यवंशी प्रकरणात हक्कभंग मांडण्या मागचा उद्देश एवढाच होता की, केलेल्या चुकीबद्दल कोणती कलमे लावले आहेत हे जाणून घेण्याचा अधिकार सन्माननीय सदस्यांना होता. तो अधिकार त्या सरकारी अधिकाऱ्याने डावलल्यामुळे विशेषाधिकार भंगाचा मुद्दा उपस्थित केला होता. आमदाराला उलट उत्तर दिले म्हणून हक्कभंग नव्हता. माझा जर गुन्हा झाला असेल तर कुठल्या गुन्ह्या खाली अटक केली हे विचारण्याचा अधिकार सामान्य माणसाला देखील आहे. त्याप्रमाणे त्यांनी विचारणा केली. यात त्यांनी कोणती चूक केली. त्यांनी दंड भरून पावती घेतलेली आहे. कलम कुठले लावले आहे हे विचारल्यावर प्रशासनातील एक अधिकारी मुजोर वागत असेल तर त्याला जाब विचारण्याचा अधिकार देखील आम्हाला दिलेला आहे. काल येथे जो प्रकार घडला त्याचे एकाही आमदाराने समर्थन केलेले नाही. कुठल्याही राजकीय पक्षाने या घटनेचे समर्थन केलेले नाही. आम्हाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा अधिकार कोणालाही देण्यात आलेला नाही. काल पोलीस प्रशासनाची वागणूक कशी होती त्यासंबंधी देखील चॅनेलवर चित्र उभे करण्यात आले. चारही बाजूने गाड्या लावल्या आहेत. पोलीस अधिकारी आतमध्ये आले. आम्हाला उचलून घेऊन जाणार आहेत, अशा प्रकारचे चित्र उभे केले होते ? आम्ही काय गुन्हा केला ? काल मी अधिकाऱ्यांचे स्टेटमेंट वाचले. दोनच नावे दिलेली असताना पाच आमदारांना निलंबित केले गेले. तो विषय वेगळा आहे. आम्ही कधी पोलीस प्रशासनावर घसरलो नव्हतो. एका सुनील मोरेने मरीन ड्राईव्ह येथे बलात्कार केला होता. तेव्हा आम्ही सर्व पोलिसांना वेठीस धरले होते काय ? आम्ही सर्व पोलीस दलाला बलात्कारीत म्हटले काय ? पोलिसांचे खरे मित्र आम्ही आहोत ? रस्त्यावरचा कार्यकर्ताच पोलिसांचा खरा मित्र असतो. पोलीस आणि आमदार यांच्यामध्ये जाणूनबुजून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

भांडण लावून समाजामध्ये वेगळा मेसेज पाठविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आमदार झाला म्हणजे चोर झाला, आमदार झाला म्हणजे राडेबाज झाला, आमदार झाला म्हणजे बदनाम झाला असा मेसेज पाठविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अशा प्रकारे ते बदनाम कॅटेगिरी तयार करीत आहेत. एका बाजूने म्हणायचे की, चांगले लोक आले पाहिजेत. दुसऱ्या बाजूने चांगल्या लोकांना प्रतिबंध करण्यासाठी अशा प्रकारची वागणूक दिली जाते. मी याचा निषेध करतो आणि सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मांडलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेला समर्थन देतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अत्यंत व्यथित मनाने सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी दिलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेवर मी सही केलेली आहे. ज्या मीडियातून मी आलो, त्या मीडियातील माझ्या ज्येष्ठ मित्राला असंख्य हल्ल्यातून माझ्या छातीचा कोट करून वाचविले, त्यालाच तुमची लक्ष्मण रेषा ही आहे हे सांगण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ज्या दोन घटना घडल्या त्याची पुनरुक्ती मी करीत नाही. विधान सभेतील माझे सन्माननीय मित्र श्री.क्षितीज ठाकूर हे त्या अधिकाऱ्याशी सन्मानाने बोलत होते हे त्या क्लिपमधून दिसत होते. तो अधिकारी अरेरावीप्रमाणे, उन्मत्तपणाने उत्तरे देत होता. तू हक्कभंग आण, मी जुमानत नाही. तो अधिकारी सन्माननीय सदस्य श्री.क्षितिज ठाकूर यांना आव्हान देत नव्हता तर या विधी मंडळाच्या सर्वोच्च सभागृहाच्या अधिकाराला देत होता. परवाच्या घटनेचे कोणीही समर्थन करणार नाही. ती अत्यंत दुर्दैवी, निंदनीय घटना होती. सर्व पक्षीय आमदारांनी त्याचा निषेध केलेला आहे. भावना तीव्र असताना, परवाच्या घटनेबद्दल असंतोष असताना विधान सभेच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी अत्यंत महत्त्वाचा निर्णय दिला. त्यांनी जनतेची माफी मागितली. गरज नसताना देखील पोलिसांची माफी मागितली. एवढे उदार मन केल्यानंतर त्याच पीठासीन अधिकाऱ्यांबद्दल काल दोन्ही वृत्तवाहिन्यांनी अत्यंत कलुषित वातावरण निर्माण केले आणि संशय निर्माण केला.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.भारवि... 16:10

श्री.कपिल पाटील..

त्यांनी विधिमंडळाचे अवहेलना केलेली आहे, अवमूल्यन केलेले आहे. माननीय अध्यक्ष आणि माननीय मुख्यमंत्री यांनी मिळून अटक थांबविण्याचे कारस्थान केलेले आहे अशाप्रकारचा गर्हणीय आरोप या दोन्ही चॅनेल्सनी केलेला आहे. आमदारांना मस्तवाल म्हणणे, गुंड म्हणणे, मवाली म्हणणे हे काही फक्त आमदारांबद्दल नव्हते तर संविधानाने निर्माण केलेल्या विधिमंडळासारख्या संस्थेबद्दल ते आग ओकत होते.

सभापती महोदय, त्या चॅनेल्सनी तीन आव्हाने दिलेली आहेत. पहिले आव्हान, जे इन्स्पेक्टरने देखील दिलेले आहे ते म्हणजे विशेषाधिकारासंबंधीचे आहे. कौल व शकधर यांच्या पुस्तकात स्पीकर फ्रेड्रीक व्हाईट यांचे एक कोटेशन या ठिकाणी कोट करतो. "The whole question of Privileges in respect of the Legislatures in India was one of the great importance...."मी संपूर्ण मजकूर वाचून दाखवीत नाही. त्यामध्ये फ्रीडम ऑफ प्रेस संबंधीची चर्चा आहे. प्रेस ऑफ कौन्सिलने घेतलेल्या आक्षेपाबद्दलची चर्चा आहे. तरी सुध्दा विधिमंडळाचे आणि संसदेचे विशेषाधिकार किती महत्वाचे आहेत त्याची चर्चा त्यामध्ये आहे. हे विशेषाधिक्‍ार आमदारांचे किंवा खासदारांचे नाहीत तर हे विशेषाधिकार देशातील सार्वभौम जनतेचे आहेत. त्यांच्या हितासाठी ते दिलेले आहेत. सभागृहात बोलताना कोणत्याही प्रकारचे दडपण येऊ नये, काम करताना कोणत्याही मोहाला बळी पडता कामा नये, कोणी त्रास देऊन आडवे येऊ नये, यासाठी हे विशेषाधिकार दिलेले आहेत. या विशेषाधिक्‍ाराबद्दल त्यांनी आक्षेप घेतला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील अनुच्छेद 194 (1),(2),(3) आणि (4) अन्वये हे अधिकार आम्हाला दिलेले आहेत. जनतेने जे संविधान स्वीकारलेले आहे त्या संविधानाने आम्हाला हे अधिकार दिलेले आहेत. हे अधिकार केवळ आमदारांचे नाहीत.

सभापती महोदय, काल चॅनेलवर चित्र रंगविण्यात आले होते की, विशेषाधिकाराच्या नावाखाली आमदार हैदोस घालतात. सभागृह जनतेची फसवणूक करीत आहे. आपला टीआरपी वाढविण्यासाठी आणि फ्रीडम ऑफ प्रेसच्या नावाखाली मीडिया विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना आणि या संस्थेला बदनाम करण्याचा प्रयत्न करीत होते. फ्रीडम ऑफ प्रेस आहे. त्यांना स्वातंत्र्य आहे, त्यांना भाषणाचे स्वातंत्र्य आहे, लेखनाचे स्वातंत्र्य आहे, बोलण्याचे स्वातंत्र्य आहे. वृत्तपत्रांना

..2..

श्री.कपिल पाटील..

देखील सर्वप्रकारचे स्वातंत्र्य दिलेले आहे. पण हे स्वातंत्र्य अनिर्बंध नाही आणि हे संविधान सांगते. संविधानाच्या अनुच्छेद 19(2) मध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, सार्वजनिक सुव्यवस्था,सभ्यता आणि नीतिमत्ता यांच्या हितासाठी अवमान, अब्रू, नुकसान आणि अपराध यांना आपणास चिथावणी देता येणार नाही अशाप्रकारेच निर्बंध संविधानाने फ्रीडम ऑफ प्रेसवर घातलेले आहेत. त्याचा विसर माझ्या मित्रांना पडलेला दिसतो.

सभापती महोदय, कॅप्टन अभिजित अडसूळ आणि डॉ.संजय कुटे यांची नावे चॅलेनवर झळकत होती. त्यांच्या डोळ्यात पाणी आले होते. त्यांचा त्या घटनेशी सूतराम संबंध नव्हता. परंतु त्यांचे नाव सारखे घेण्यात येत होते. सन्माननीय सदस्य कॅप्टन अभिजित अडसूळ फोनवर आल्यावर त्यांना आरोपी असल्यागत वागणूक दिली. ते वारंवार सांगत होते की, मी निर्दोष आहे. माननीय मंत्री श्री.मधुकर चव्हाण यांना आपण विचारावे त्यांनी हे प्रकरण सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. पण मीडियाने त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली नाही. किंवा आमचे चुकले, आम्ही शब्द मागे घेतो असे म्हटलेल नाही. आपणास स्वातंत्र्य आहे, परंतु ते अनिर्बंध नाही. स्वातंत्र्य आहे, पण दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर गदा घालण्याचे स्वातंत्र्य कोणालाही दिलेले नाही याचा विसर या मंडळींना पडलेला आहे.

सभापती महोदय, दोन्ही मीडियांनी या देशातील सर्वोच्च संस्थाबद्दल आव्हान दिलेले आहे आणि तो सर्वात गंभीर धोका आहे. काल माननीय मुख्यमंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांच्या दालनात जे अनेक आमदार गेले होते. तेव्हा दुपारची घटना घडली होती किंवा कसे मला माहीत नाही. त्यावेळी मी म्हणालो होतो की, आपण कृपा करुन पोलीस अधिकाऱ्यांना आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांना हिरो करु नका. गेली अनेक वर्षे या देशात अनेक आंदोलनातून, मीडियातून, सोशल नेटवर्कींगमधून लोकशाही संस्थेमधील प्रतिनिधींना जाणीवपूर्वक बदनाम करायचे, त्यांना डाकू, लुटारु म्हणायचे, देशाचे दुष्मन म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला ज्यांच्यावर कोणतीही अकाऊन्टीबीलिटी नाही त्यांना हिरो करायचे असे प्रकार सुरु आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

अस्यंपादित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

पोलीस अधिकाऱ्यांना हिरो करणे याचा अर्थ काय होतो ? भारतीय संविधानाने जी लोकशाही संस्था उभी केली आहे ती मोडून काढण्याचा तुमचा प्रयत्न आहे काय ? मला नम्रपणे सांगायचे आहे की, या देशातील लोकशाहीने, या देशातील संविधानाने हजारो वर्षे उभी असलेली सामाजिक व्यवस्था आडवी केली आणि सर्वांना एकाच पातळीवर आणून ठेवले. त्यामुळे जे शिखरावर होते त्यांच्या सत्तेला नख लागले. ती खळखळ तुम्ही व्यक्त करीत आहात का ? सभापती महोदय, धोका या ठिकाणी आहे. यातून अराजकाकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न सुरु आहे.

महोदय,कॉर्पोरेट जगतातील मीडिया ज्या पध्दतीने वागत आहे ते योग्य नाही. या देशातील गरिबांच्या, शोषितांच्या बाजूने लढणाऱ्या ज्या ज्या संस्था असतील त्यांना मोडून काढायचे किंबहुना त्यांना बदनाम करायचे काम केले जात आहे. चुकीच्या घटना घडतच नाहीत असे नाही. चुकीच्या घटना सुध्दा घडतात. परंतु एका चुकीच्या घटनेमुळे सर्व सामाजिक संस्थांना बदनाम करणे योग्य नाही. त्यांचा प्रयत्न असा आहे की, यातून सार्वजनिक धृणा निर्माण करायची. महोदय, सामाजिक संस्था मोडकळीस आणल्या की, स्वत:ची ताकद आणि वर्चस्व निर्माण करायचे, हा प्रयत्न सुरु आहे. महोदय, हा प्रयत्न केवळ सूर्यवंशी बाबत नाही किंवा तीन आमदारांच्या पुरता मर्यादित नाही. म्हणूनच दोन मीडियांच्या प्रमुखांबद्दल मांडलेली ही विशेषाधिकार भंगाची सूचना आहे.

महोदय, या देशातील लोकशाही आपण वाचविणार आहोत की नाही ? भारतीय संविधानाने आम्हाला आणि जनतेला अधिकार दिलेले असले तरी, आम्ही केवळ त्याचे प्रतिनिधी आहोत. आमचे चुकत असेल तर परत आम्हाला या सभागृहात पाठवायचे की नाही याचा जनतेला अधिकार आहे. आम्हा लोकप्रतिनिधींना दर पाच वर्षांनी अग्निपरीक्षा द्यावी लागते. परंतु ज्यांना कोणतीही परीक्षा द्यावी लागत नाही, ते सुध्दा कायद्याने बांधलेले आहेत. या देशातील घटना आणि कायदा सर्वोच्च आहे. ज्यांनी आमच्या देशाची घटना मोडून लोकशाही हक्कांची थट्टा उडविली होती त्यांच्याबद्दल हीच मंडळी काही दिवसांपूर्वी कशा पध्दतीने बोलत होती ? ते त्यांची भलावण करीत होते. एका बाजूला त्यांची भलावण करायची आणि दुसऱ्या बाजूला लोकशाही संस्थांच्या बदनामीचे अशा पध्दतीने कारस्थान रचायचे असे चालणार नाही. मीडियावरील स्वातंत्र्याला मर्यादा घाला असे मी म्हणत नाही. पण त्यांना त्यांची लक्ष्मणरेषा सांगितली पाहिजे. मीडियाला सुध्दा सभ्यता असली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

पाहिजे. सभ्यता आणि नीतीमत्तेच्या मर्यादा तुम्हाला ओलांडता येणार नाहीत. हे संविधानातील डायरेक्टीव्हज् नव्हे तर कलम आहे. संविधानाचा आदर तुम्हाला करावाच लागेल. भारतीय संविधानाचा आदर तुम्हाला करता येत नसेल तर तुम्हाला स्वातंत्र्याचा अधिकार मिळणार नाही. तुमची संविधानावर श्रध्दा असेल तरच तुम्हाला स्वातंत्र्यांचा अधिकार आहे. तो नसेल तर तुम्हाला तो अधिकार नाही, हे सांगण्याची आज वेळ आली आहे. मी आज अत्यंत व्यथित मनाने ही विशेषाधिकार भंगाची सूचना आपण स्वीकारावी अशी विनंती करतो व माझे भाषण थांबवितो.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहामध्ये मांडण्यात आलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, काही दिवसांपूर्वी दुसऱ्या राज्यात घडलेल्या घटनेचे एका चॅनेलवर दृश्य दाखविले जात होते. काही माणसे मारामारी करीत होते. एक गरीब शेतकरी खाली पडलेला होता आणि त्याच्या मानेवर मोठा बांबू टाकलेला होता. दोन बाजूला दोन गुंड पायाने तो बांबू दाबून त्या माणसाला मारत होते. महोदय, या घटनेचे चित्रीकरण करणारी व्यक्ती चित्रीकरण थांबवून त्या माणसाला सोडविण्याचा प्रयत्न करीत नव्हती. एक लहान मूल रडताना त्याच्या समोर फणा काढलेला साप असला तरी त्याचे चित्रीकरण केले जाते. परंतु त्या मुलाला वाचविले जात नाही. आपल्या चॅनेल्सचा टीआरपी वाढविण्यासाठी काहीही गोष्टी केल्या जात आहेत. लोकशाहीमध्ये राजकारण्यांविषयी या लोकांनी आज मोठ्या प्रमाणावर घृणा निर्माण केली आहे. 'राजकारणी' ही आज एक शिवी झाली आहे. राजकारणातील लोक काहीच चांगले काम करीत नाहीत, असे भासविण्याचा प्रयत्न केला जातो. महोदय, एकाच बाजूच्या बातम्या दाखवून राजकारण्यांना गुंड प्रवृत्तीचे आणि वाईट म्हणणार आहात काय ?

महोदय, मला कुठल्याही गोष्टीचे वा मारामारीचे समर्थन करायचे नाही. टी.व्ही. वरील जाहिरातींमध्ये महिलांचे देह प्रदर्शन आणि अंग विक्षेप खूप घाणेरड्या प्रकारे दाखविले जातात. हा सर्व प्रकार पैशासाठी चालला आहे. आम्ही आमदारांनी दुष्काळग्रस्तांसाठी एक महिन्याचा पगार दिला. मला सर्व चॅनेल्सना आव्हान करायचे आहे की, आपण एक महिन्याच्या जाहिरातीचे उत्पन्न दुष्काळग्रस्तांना द्या. कारण तुम्ही दुष्काळाग्रस्तांच्या बातम्या रोज दाखविता आणि त्यामुळे तुमचा टीआरपी वाढतो.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

आम्ही नालायक आहोत असे जर तुम्ही म्हणत असाल आणि तुम्ही जर चांगले असाल तर मग तुम्ही दुष्काळग्रस्तांना काहीच मदत का करीत नाही ? तुम्ही दुसऱ्यांकडून पैसे जमा करण्याचे आव्हान करता. तुम्ही ज्या सिरियल्स दाखविता त्यामध्ये महिलांचे फार घाणेरडे रुप दाखविता. येथील सर्व सासू-सुना व्हॅम्प आहेत असे दाखविता. घरातील महिला आपले घरकाम सोडून अर्ध्या तासाची सिरियल बघते. त्या अर्ध्या तासामध्ये पंधरा मिनिटे जाहिराती असतात आणि पंधरा मिनिटांची सिरियल असते. तुम्ही संपूर्ण हिंदुस्थानातील स्त्रियांचे काय चित्रीकरण करीत आहात ? सर्व इतके भयंकर चालले आहे. ही मीडियाची संवेदनहीनता फार वाढत चाललेली आहे, असे मला वाटते. संध्याकाळच्या प्राईम टाईममध्ये चार तास बसायचे आणि हा किती नालायक आहे, तो किती नालायक आहे, मी किती चांगला आहे अशा प्रकारे दाखविणे जे मीडियामध्ये चालले आहे ते खूप वाईट आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, मघाशी कोणी तरी आपल्या भाषणामध्ये श्री. बाबासाहेब कुपेकर यांच्याबद्दल उल्लेख केला. श्री. बाबासाहेब कुपेकरांबरोबरच मला आणखी एक सांगावयाचे आहे की, श्री. फाटक साहेब मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त होते. ते अतिशय चांगले आणि सज्जन आहेत. पण त्यांनाही बदनाम करण्याचे काम मीडियाने केले. त्यांची कोठे तरी पूर्वीची प्रॉपर्टी होती ती विकून या ठिकाणी फ्लॅट वगैरे घेतला. अशा प्रकारे एखादी व्यक्ती राजकारणातील असो किंवा प्रशासकीय सेवेतील असो, प्रत्येक माणूस चांगला असू शकतो आणि प्रत्येक माणूस वाईटही असू शकतो. परंतु एखादा माणूस राजकारणात गेला म्हणून वाईट आहे असे दाखविले जाते. मी राजकारणात आले त्यामुळे माझ्याकडे सुध्दा लोक अशाच दृष्टीने बघतात की या राजकारणात आहेत म्हणजे काही तरी भयंकर करीत आहेत.

सभापती महोदय, मला प्रत्येकाला आवाहन करावयाचे आहे. आज जो मध्यमवर्गीय आहे तो सिनेमाला जातो, हॉटेलमध्ये जातो. त्या सर्वांनी चांगले राजकारण करण्यासाठी एक दिवस तरी काम करावे. राजकारण्याला पूर्ण आयुष्य राजकारणात घालवावे लागते. सकाळपासून रात्रीपर्यंतचा वेळ राजकारणामध्ये घालवावा लागतो. लोकांच्या अडीअडचणीला धावून जावे लागते. पण हे सर्व

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्रीमती विद्या चव्हाण ...

करण्यासाठी इतर कोणालाही वेळ नाही. जो तो आपला बँक बॅलन्स बघण्यामध्ये, हॉटेलिंग करण्यामध्ये आणि करमणूक करण्यामध्ये मश्गूल असतो. चॅनेलवाल्यांनी थोडी तरी संवेदनशीलता दाखवावी असे मला वाटते. अशा प्रकारे सर्वच राजकारणी चोर आहेत, लुटारु आहेत, दरोडेखोर आहेत हे जे दाखविण्याचे काम चालले आहे ते बंद करावे. सभापती महोदय, मी या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेला पाठिंबा देते.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

अॅड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जी विशेषाधिकार भंगाची सूचना मांडलेली आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. ज्युरिसप्रूडंस मध्ये इंग्रजीमध्ये एक म्हण आहे. या तीन दिवसाचा सर्व घटनाक्रम बघता या घटनाक्रमाला ती म्हण बरोबर लागू पडते. ती म्हण अशी आहे की, "Limitless encroachment of one Authority on another Authority is leading to chaos." एका लिमिटलेस ॲथॉरिटीने दुसऱ्या ॲथॉरिटीवर जर एन्क्रोचमेंट करण्याचा प्रयत्न केला तर त्यातून केऑस निर्माण होतो असा त्याचा अर्थ आहे. वकील म्हणून बोलावयाचे झाले तर तीन वेगवेगळ्या घटना वेगवेगळ्या पध्दतीने बघितल्या पाहिजेत. वरळीच्या सी-लिंकवर झालेली घटना, त्यातील कायदेशीर बाबी यावर भाष्य करणारे सभागृह आजचे तरी नाही. दुसरी जी घटना आहे त्या घटनेचा निषेध या सदनामध्ये सर्वांनी केला आणि मी सुध्दा करतो, या ऐतिहासिक सभागृहामध्ये झालेली झटापटीची, मारामारीची जी काही घटना आहे तो सुध्दा कायदेशीर टेस्टीमनीचा भाग आहे. त्या घटनेचा आपण सर्वांनी निषेध केलेला आहे. त्यानंतर चॅनेल्सनी जी भूमिका घेतल्यानंतर येणारा हक्कभंगाचा प्रस्ताव ही तिसरी वेगळी घटना आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ पूर्वी श्री.बरवड 16:25

ॲड.आशिष शेलार.....

सभापती महोदय, कालपर्यंत आपण असे म्हणत होतो की, पोलीस अधिकाऱ्यांची चूक आहे. त्या पोलीस अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे आमदारांचे कर्तव्य किंवा त्यांनी केलेले काम किंवा आमदारांकडून झालेली गोष्ट ही समर्थनीय असू शकत नाही. आज आपल्याला म्हणावे लागत आहे की, "Aggressiveness of MLAs is not pardonable." आमदारांचा अतिरेक हा माफीला लायक असू शकला नसला तरी, "Intolerance of Channel is not justifiable." त्यामुळे चॅनेलचा इनटॉलरन्स जस्टीफाय होऊ शकत नाही, कारण आमदारांकडून चुकीची घटना घडलेली आहे. त्यामुळे आमदारांना स्पेशल प्रिव्हिलेज आहे की नाही ? काही पत्रकार इन्फॉर्मली असे बोलतात की, तुम्हाला कसला प्रिव्हिलेज ? यू डोन्ट डिझर्व्ह स्पेशल प्रिव्हिलेज, मग असे म्हणणाऱ्यांना मला असे सांगावयाचे आहे की, अशा चॅनेलवाल्यांना सुध्दा स्पेशल प्रिव्हिलेजेस दिलेले नाहीत. त्यांना वाटेल ते करावे व दाखवावे. अशा प्रकारचा घटनाक्रम व ही कार्यपध्दती काही चॅनेल्सनी अनुभवली म्हणून आमचे या हक्कभंगाच्या सूचनेला समर्थन आहे.

पूर्वी आमच्याकडे कॅरेक्टर सर्टिफिकेटस् मागण्यासाठी लोक येत होते. आजही काही लोक येतात. हल्ली काही चॅनेल्सनी स्वत:च कॅरेक्टर सर्टिफिकेट देण्याचे काम सुरु केलेले आहे. कोणाला तरी काही तरी म्हणावयाचे, कोणाचे इंटेन्शन साफ आहे हेही त्यांनीच डिक्लेअर करावयाचे, कोर्टाने ते करावयाचे नाही. कोणाला राडेबाज म्हणावयाचे, कोणाला धोकेबाज म्हणावयाचे, कोणत्याही कायद्यामध्ये कन्व्हिक्टेड आरोपी नसला तरी त्याच्या कॅरेक्टरवर बोलण्याचा अधिकार फक्त यांनाच आहे. कॅरेक्टर सर्टिफिकेटचे भांडार आहे. ही निषेधार्ह गोष्ट आहे. कॅरेक्टर सर्टिफिकेट डिस्ट्रीब्यूट करण्याचे काम आज तरी भारतीय संविधानाने कोणत्याही चॅनेलवाल्यांना दिलेले नाही, हे कृपा करुन लक्षात घ्यावे. त्यामुळे त्याचा निषेध करण्याची गरज आहे. केवळ कॅरेक्टर पुरते नाही तर हे लोक आता हेतू व इंटेन्शनपर्यंत जाऊ लागले आहेत. हे एखाद्या माणसाच्या मनातल्या, मनातल्या कोपऱ्यातल्या, कोपऱ्यातल्या भावनेत काय आहे येथपर्यंत जाऊ लागले आहेत.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

सभापती महोदय, दुर्दैवाने मला सांगावे लागेल की, या सभागृहाचे माननीय उप सभापती श्री.वसंतराव डावखरे यांच्याबद्दलही एका चॅनेलवर विधानसभेच्या एका सदस्यांनी चर्चा करताना थोडेसे लिडिंग दिले आहे. माननीय श्री.डावखरे साहेबांनी काय चुकीचे केले आहे ? आपल्या जिल्ह्यातील एक आमदार, त्या आमदारांची जी काही झटापटी झाली असेल, त्याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत त्या अधिकाऱ्याला बोलविले. त्यावेळी त्यांच्या मनामध्ये काही काळेबेरे होते ? माननीय श्री.वसंतराव डावखरेजी हे या सदनाचे उप सभापती आहेत. ते सर्व पक्षीय मित्र समजले जातात. त्यांनी जर त्या अधिकाऱ्याला बोलविले आणि त्यातून काही मार्ग निघतो का ते बघण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या हेतूवरही शंका घ्यावयाची ? आता कॅरेक्टरवरच शंका घेतली जाते असे नाही तर फिजिकल शंका, हेतूवर शंका, हृदयावर शंका, हृदयाच्या कॉर्नरवरही शंका घेतली जाते. इतका मोठा सिटी स्कॅन चॅनेलवाल्यांनी लावलेला आहे. त्या सिटी स्कॅनचा निषेध करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला नाही तर ती चूक होईल. या महाराष्ट्रात कोणत्याही आयपीएस अधिकाऱ्यांना किंवा पोलीस अधिकाऱ्यांना युनियन करण्याची मुभा नाही. त्या दिशेने पावले टाकण्याची मुभा नाही. जर कोणताही घटनाक्रम घडला असेल व त्याबाबत या सदनातून न्याय मिळत नसेल तर खूप रस्ते मोकळे आहेत. परंतु दबावतंत्राचा वापर करण्याच्या दृष्टीने अशी घटना घडणे हे सुध्दा पोलीस सर्व्हिसमध्ये असलेल्या माणसाला लागू नाही. हे सुध्दा या सदनाच्या माध्यमातून स्पष्ट करावयाचे आहे. त्यामुळे मला असे वाटते की, हा डाव आहे की काय ? जर सातत्याने दीड दोन महिन्यापासून घडत असेल्या घटनांचा घटनाक्रम पाहिला तर लक्षात येईल, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी केला आहे. एकेक आंदोलने उभी राहायची, एकेक घटनाक्रम उभा करावयाचा, एकेक व्यक्ती उभी करावयाची, प्रत्येक घटनाक्रम व प्रत्येक व्यक्तीची क्रेडिबिलिटी वेगळी आहे. कोणाच्या कॅरेक्टरवर बोलण्याचा मलाही अधिकार नाही. ते आता अगदी श्री.सूर्यवंशी पर्यंत. एखादा मोठा वटवृक्ष जर तोडावयाचा असेल तर त्याच्या मुळाशी एक, एक घाव सगळ्या बाजूने मारावयाचा, असे केल्याने आपोआप

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

वटवृक्ष कोलमडून पडतो. तशा प्रकारे एक आंदोलन, एक व्यक्ती, एका व्यक्तीने केलेला आरोप, त्यातून इंटरनॅशनल डाव आहे की काय अशी शंका यावी. ही डेमोक्रॅटिक पध्दत आहे. त्याच्या मुळावर एकेका बाजूने घाला घालावयाचा, मग तो वटवृक्ष पडावा अशी चिंता करावयाची हे काही बरोबर नाही. त्यामुळे संपूर्ण देशामध्ये ही चर्चा सुरु झालेली आहे.

आपण जर एक महिन्यापूर्वीची घटना बघितली असेल तर प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाच्या श्री.काटजूंवर सुध्दा राज्यसभेचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.अरुण जेटली यांनीही शंका उपस्थित केली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 16:30

ॲड. आशिष शेलार....

ही घटना नवीन नाही. मी त्या राजकारणाच्या भूमिकेमध्ये जाऊ इच्छित नाही. शासनकर्त्यांनी काय केले पाहिजे, प्रेसवाल्यांनी काय केले पाहिजे, प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाच्या चेअरमनने, अध्यक्षांनी काय केले पाहिजे यावर सुध्दा या देशामध्ये डिबेट चालू आहे. असे असताना आपल्याला अनिर्बंध अधिकार आहेत असे कुठल्या चॅनलने मानण्याचे कारण नाही. आपण घटनेचा उल्लेख केला. होय, जर आमदार दोषी असतील तर ते कुठल्याही कायद्यापेक्षा मोठे नाहीत. संविधानामध्ये म्हटलेले आहे की, "Equality before the law." कायद्यासमोर सर्व समान आहेत. पण त्यापुढील संविधान हे चॅनलवाले विसरतात. "Equality before the law" एवढे सत्य ते जाणतात. त्याच्या पुढे असे आहे की, "Equal protection by the law." त्यामुळे सदनातील आमदार असतील किंवा सदनाच्या बाहेरील आमदार असतील त्यांना देखील कायद्याने प्रोटेक्शन दिलेले आहे. त्यांच्या कॅरेक्टरला काही प्रोटेक्शन दिलेले आहे, त्यांच्या इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टीला काही प्रोटेक्शन दिलेले आहे. त्यामुळे केवळ अर्धवट "Equality before the law" एवढेच मानू नका तर "Equal protection by the law" हेही माना. तेव्हा या घटनेचा निषेध करुन सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मांडलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेला समर्थन देऊन मी माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, दोन दिवसापूर्वी जी घटना घडली त्या घटनेचे समर्थन कोणी करीत नाही. परंतु सतत दोन दिवस चालू असलेल्या या घटनेसंबंधीचा संताप सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी व्यक्त केलेला आहे. मी या निमित्ताने माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना विनंती करतो की, सरकार हे पालकाच्या भूमिकेमध्ये असते. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन ही त्याची दोन मुले आहेत. आपण एका मुलाला न्यायाची भाकर देतो त्यावेळी दुस-या मुलावर अन्याय होऊन तो उपाशी राहाता कामा नये. खाकीचा निश्चितच आदर केला पाहिजे. पण खाकीच्या आड राहून जर कोणी चुका करीत असेल तर त्याबाबतीत योग्य ते शासन करणे गरजेचे आहे.

सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी योग्य मुद्दा या ठिकाणी मांडलेला आहे. दीड एक वर्षापासून चॅनेलच्या माध्यमातून गोंधळाचे वेगवेगळे प्रसंग दाखविले जात आहेत. खरे तर आपल्या समाजामध्ये अराजकता माजविण्याचा प्रयत्न कोण करीत आहे हे तपासून पाहाण्याची गरज आहे. आधी वरळी सीलिंक येथे घडलेली घटन आणि त्यानंतरची घडलेली घटना या दोन्ही घटनांमध्ये योग्य तो न्याय व्हावा अशी मी या प्रस्तावाच्या माध्यमातून विनंती करतो आणि सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी मांडलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेला समर्थन देऊन माझे दोन शब्द संपवितो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : आदरणीय सभापती महोदय, आदरणीय श्री. भाई जगताप, यांनी मांडलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गेले दोन-तीन दिवस महाराष्ट्राचे सामाजिक आणि राजकीय जीवन चिंताजनक बनविण्याचा प्रयोग महाराष्ट्रातील काही वृत्तवाहिन्यांनी केलेला आहे. पहिली घटना वरळी सीलिंकवर घडली. सूर्यवंशीच्या तथाकथित मारहाणीवरुन प्रकरण उद्भवले. या सबंध गोष्टीचा निषेध महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आणि सभापती महोदय, आपण देखील तो केलेला आहे. मी वाहिन्यांवरील एकंदरीत चित्र पाहिले ते अतिशय काळजी वाटणारे आणि अतिशय चिंताजनक असे आहे. माननीय संपादक श्री. खांडेकरजी हे जेव्हा बोलत होते त्यावेळी त्यांच्या चेह-यावर तिरस्कार, द्वेष ओसंडून वहात होता.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ ST/ D/ प्रथम श्री.शिगम 16:35

प्रा.सुरेश नवले...

"तुम इतने गिरे हुओ है" असे त्यांचे उद्‌गार आहे. आमदार म्हणजे मवाली, चंबळ खोऱ्यात काम करणारे दरोडेखोर अशा प्रकारचे चित्र दुर्देवाने उभे केले जाते आहे. या पाठीमागे मोठ्या प्रमाणात पडद्याआड एखादे षडयंत्र असावे की काय अशा प्रकारची शंका येते.

सभापती महोदय, ही कॅमेराची नशा आहे. ही नशा चढण्याचा हा दुष्परिणाम आहे. एक वृत्तवाहिनी आपल्या हातात आहे, तर ठोका राजकारण्यांना पूर्वीच्या चित्रपटामध्ये पोलिसांची टवाळी केली जावयाची, आजच्या चित्रपटांमध्ये राजकीय लोकांची टवाळी होते आहे. अशाच प्रकारची टवाळी आमचे सन्माननीय श्री.निखिल वागळे करीत आहेत. खरे तर मी त्यांना चांगले वागण्याची विनम्रपणे सूचना त्यांना देणार आहे. हेच वकील, हेच फिर्यादी आणि हेच न्यायाधीश आणि फाशी देण्यासाठी खिशामध्ये लोणी लावून दोरखंड घेऊन आलेले असतात. तुम्ही आरोपी आहात. फाशी देण्याचा अधिकार आमचा आहे अशा प्रकारचे त्यांचे दुर्देवी वर्तन आहे. या दुर्देवी वर्तनामुळे महाराष्ट्रामध्ये सर्वसामान्य माणसांचा राजकीय व्यक्तींकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा दुर्देवाने दुषित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पूर्वग्रहदूषित भावनेने विश्लेषण करण्याची ही जी प्रवृत्ती आहे, या प्रवृत्तीला आळा घालण्याची आवश्यकता आहे म्हणून हा हक्कभंग आपण स्वीकारला पाहिजे अशा प्रकारचा आग्रह मी निमित्ताने करणार आहे.

महोदय,सन्माननीय श्री.निखिल वागळे यांना अपेक्षित उत्तर मिळाले नाही तर ते समोरच्या व्यक्तीवर तुटून पडतात. मी सांगतो तीच पूर्व दिशा, मी सांगतो तेच तोरण, मी सांगतो तेच धोरण ही गोष्ट उभा महाराष्ट्र पहात आहे. त्यामुळे हे जे एकेरी चित्र आहे, त्यांच्या भात्यामधील जी शस्त्रे आहेत, या शस्त्राच्या बळावर महाराष्ट्रातील एकूण राजकीय व्यक्तींची प्रतिमा मलिन करण्याचा जो प्रयत्न होतो आहे हा विचार मुळामध्ये चुकीचा आहे. परंतु या गोष्टीस अप्रत्यक्ष आपण सुध्दा जबाबदार आहोत. सी-लिंकवर घडलेल्या प्रकरणानंतर त्या अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केली असती तर नंतरची प्रकरणे उद्‌भवली नसती. काही अधिकारी तर अतिशय उध्दट आहेत. विधानसभा सदस्य श्री. हर्षवर्धन जाधव मला वाटते स्वातंत्र्यानंतर एखाद्या व्यक्तीला इतकी बेदम मारहाण, निघृण मारहाण कदाचित लोकप्रतिनिधींना पहिल्यांदा केली असेल. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला, तो मुद्दा माझ्या दृष्टीने अतिशय महत्वाचा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

आहे. विधानभवनाच्या बाहेर पोलिसांच्या गाडया, रॅपीड ॲक्शन फोर्स, ठेवले होते. विधानभवनाच्या दोन्ही प्रवेशव्दारावर पोलीस ठेवले होते. जसे काही चंबळच्या खोऱ्यामधून मानसिंग डाकू पळून जाणार आहे. सभापती महोदय, विशेषत: आपल्या अधिकाराला पोलीस खात्याने चॅलेंज दिले आहे हे दुर्देव आहे.

सभापती महोदय, विधानभवनाच्या प्रांगणामध्ये येणे, लोकप्रतिनिधींचा शोध घेणे, कोणत्या दरवाज्याने लोकप्रतिनिधी पळून जातात याची वाट पाहणे, चॅनेलवाल्यांना एसएमएस करणे...

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..........

आणि बघा, आम्ही कसे त्यांना पकडून घेऊन जातो. हे जे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न झाला या चित्राला पुढील काळात आपण लगाम घालावा अशी विनंती करुन माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मांडलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेला मी पाठिंबा देतो आणि थांबतो.

---------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेच्या निमित्ताने माध्यमांच्या संदर्भात आपण किती भावनाशील आहोत आणि आम्ही मवाली नाही, दरोडेखोर नाही, चांगले वागणारे, शाळेमधील एखाद्या उत्तम विद्यार्थ्यांसारखे आहोत याची जाणीव आमदारांना आहे, ही आजच्या घडीला फार महत्वाची गोष्ट आहे. त्यामधून समाजामध्ये आशा निर्माण होईल की, आमदारांच्या अपप्रवृत्तीबद्दल एवढी टोचणी आणि खंत आहे. त्याबद्दल आपल्याला अंत:करण आहे अशी खात्री श्री.निखिल वागळे आणि श्री.राजीव खांडेकर यांची होईल असे मला वाटते. विशेषाधिकार भंगाची सूचना दाखल करण्याचा हेतू हाच आहे की, घडलेल्या घटनेच्या वेळी उपस्थित नसताना, त्यांची नावे त्या घटनेमध्ये आहेत की नाही याची शहानिशा न करता ज्यांची आज अपप्रसिध्दी झाली त्या संदर्भात ही विशेषाधिकार भंगाची सूचना दिली आहे.

सभापती महोदय, मला या अनुषंगाने दोन तीन महत्वाच्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत. कोणाचा आदर्श नाही असे रहात नाही का? माध्यमांना खरे स्वातंत्र्य आहे की नाही हा एक प्रश्न आहे. आज माध्यमे ही एक फार मोठी सत्ता तयार झाली आहे. माध्यमे आमदार, खासदार यांचे चुकीचे चित्रीकरण करतात याचे एक कारण म्हणजे दुर्दैवाने मध्यमवर्गामध्ये राजकारण्यांबद्दल अतिशय वाईट प्रतिमा निर्माण झाली आहे. ही प्रतिमा फक्त माध्यमामुळे निर्माण झाली की अन्य कारणामुळे निर्माण झाली याचा अंत:करणातून विचार करायचा. पुन्हा एखाद्या वेळी सी-लिंकवर आमदाराची गाडी थांबविली जाईल, अशा वेळी आमदार स्वत: जागृत असतात. मी अनेकदा पाहिले आहे. आमदारांची गाडी त्यांचा ड्रायव्हर चालवित असतो, शेजारी सुरक्षा रक्षक बसलेले असतात, गाडीच्या दर्शनी भागातील काचेवर आमदार म्हणून स्टिकर लावलेला असतो. हे पाहिल्यानंतर कसे कंट्रोल करणार हा प्रश्न असतो.

सभापती महोदय, जेव्हा 25 आमदारांच्या गाड्या एकाच वेळी निघतात, त्या एकमेकाशी कसे वर्तन करतात हे जेव्हा आम्ही बघतो त्यावेळी समाज सुध्दा ते बघत असतो. श्री.निखिल वागळे यांनी या कार्यक्रमामध्ये ज्या पध्दतीची भाषा वापरली त्या संदर्भात विशेषाधिकार भंगाची सूचना दाखल केली आहे. श्री.राजीव खांडेकर यांनी ज्या प्रकारचे प्रश्न विचारले त्या पलीकडे जाऊन कोण कसा आहे, ती व्यक्ती चांगली आहे की वाईट आहे........(अडथळा).....त्यांना कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात मीडियामध्ये विश्लेषण करावयाचे असेल तर स्वतंत्र चर्चा आयोजित करावी.

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

आपण कितीही आवाहन करु, आमच्यावर निष्कर्ष काढू नका, ताशेरे ओढू नका. ते त्यांचे काम करीतच राहणार आहेत........(अडथळा)......आपण श्री.सूर्यवंशी यांच्याविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना दाखल करणार होतो. श्री.सूर्यवंशी यांना विधानभवनात बोलावले. निदान श्री.निखिल वागळे आणि श्री.राजीव खांडेकर यांना कोणी आतमध्ये बोलावू नये.

श्री.सूर्यवंशी यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले आहे. आज विधानसभेच्या प्रत्येक आमदाराच्या मनामध्ये जे वैफल्य आहे ते हेच आहे. यातून आपल्या मतदारसंघात असा मेसेज जातो की, काही केले तरी चालते. दुसऱ्या आमदारांना वाटते म्हणून आम्ही कायदा हातात घेतो. आम्ही विधानपरिषदेतील जे आमदार आहोत. तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. शापित गंधर्वासारखी आमची परिस्थिती आहे. ना विधानसभेत, ना विधानपरिषदेत. विधानपरिषद सभागृहात फरफटल्यासारखी भूमिका घेतो. कोणीही आमदाराचे समर्थन करीत नव्हते. तरी सुध्दा कोणाला असे वाटले नाही की उरलेले आमदार समर्थन करीत नाहीत. तुमचे त्यांच्याशी मतभेद आहेत हे तरी सांगावे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी तशी भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्याशी काय ट्रिटमेंट होती हे दिसत होते. म्हणजे चार आमदारांनी जे काही वर्तन केले तेच उरलेल्या 350 आमदारांचे आहे याबद्दल माध्यमांची खात्री होती, समाजाची खात्री आहे. आम्ही आमचा आवाज, आमची सत्यता, आमची इमानदारी, आमची भूमिका पोहोचविण्यामध्ये कुठेतरी कमी का पडतो याबद्दल मला निश्चित वाईट वाटते.

नंतर 3आय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ......

त्यात त्यांचा दोष आहे की, नाही यावर चर्चा होऊ शकते. त्यामुळे मी हक्क भंगाचे समर्थन करीन. आपल्याला असे वाटत असेल की, ताई निखिल वागळेंच्या संदर्भात, राजीव खांडेकरांच्या संदर्भात काही बोलणार नाही. मतभेद असतात तेव्हा कायमचे शत्रुत्व नसते हे आपण सर्वांनी लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. मतभेद होऊ शकतात परंतु मॅच्युरिटी म्हणून जो ॲक्सेप्टन्स असावयास हवा तो मला आहे. माननीय शिवसेना प्रमुखांमुळेच मी पक्षाची प्रवक्ता आहे. आपण काही लहान मूल नाही. हक्कभंग दाखल झाला म्हणून कोणी रडत बसत नाही. परंतु विधिमंडळाची गरिमा टिकवण्यासाठी तसेच आपल्यालावर समाजाचा जो विश्वास आहे त्या दृष्टिकोनातून बेजबाबदार चित्र बाहेर जाऊ नये हे महत्वाचे आहे. या ठिकाणी श्री. संजय कुटे, अभिजित अडसूळ यांचा या प्रकरणात काही संबंध नसतांना त्यांची नावे गोवली गेली आहेत. त्यांची आज बदनामी झालेली आहे. अशा बदनामीचा अनुभव आपल्याला अनेक केसेसमध्ये आलेला आहे व तो सहन करुन, पचवून आपण पुढे गेलेलो आहोत. म्हणून मला असे वाटते की, विधिमंडळ हा लोकशाहीचा एक स्तंभ आहे त्यातील हा हक्कभंग असून या घटनेच्या निमित्ताने पुढील काळात माध्यमांनी आपली जबाबदारीची भूमिका निभावली आणि त्याच बरोबर आमचीही प्रतिमा सुधारण्याच्या दृष्टिकोनातून काही पावले उचलली गेली व सूर्यवंशी सारखे जे पोलीस अधिकारी आहेत त्यांनी कुठे तरी एक अपमानास्पद भूमिका घेतली. त्यामुळे यासंदर्भात सर्वांना संदेश मिळाला तर ते या 3-4 दिवसामधील एक मोठे पाऊल पडेल असे मला वाटते.

धन्यवाद.

-----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी विशेषाधिकार भंगाची सूचना मांडली आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. खरे म्हणाल तर आमदार आणि पोलीस अधिकाऱ्यामध्ये तक्रार झाली. त्यानंतर सी फेसचे प्रकरण झाल्यानंतर येथे चर्चा झाली, दुसऱ्या दिवशी मारहाणीचा प्रकार झाला. परंतु आज आपण दुसऱ्या प्रकारासंदर्भात चर्चा करीत आहोत. या प्रकरणामध्ये दोषी कोण आहे याबाबत चर्चा होत आहे. खरे आणि खोटे जनतेसमोर आणण्याचे काम हे वृत्तपत्र व मीडियाचे असते. परंतु खरे न आणता सर्व खोटे आणण्याचा प्रकार चालला आहे व त्यासाठीच आपण हा हक्कभंग आणीत आहोत असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. सद्या टीव्हीवर, मीडियावर आज जे काही दाखवले जात आहे ते योग्य नाही. आम्हाला टीव्हीवर सर्व काही रेडीमेड दिसते त्यामुळे आम्ही आळशी झालेलो आहोत.. संध्याकाळी घरी गेल्यानंतर महाराष्ट्रात कोठे काय घडले याची माहिती मिळत असल्यामुळे आम्ही कोणी घराच्या बाहेर जात नाही. यामध्ये मग दुष्काळी भागातील एक गाय कायम तीच ती दाखवली जाते, तीच जमीन दाखवली जाते. 2006 मध्ये आपल्याकडे अतिवृष्टी झाल्यामुळे मुंबईमध्ये जो महापूर आला होता त्याचे चित्रीकरण आजही थोडा पाऊस पडल्यानंरही दाखवले जाते, तशाच बसेस सुध्दा अडकल्याचे दाखवले जाते. मंत्र्यांनी टीव्हीवर सांगितले आहे की, तेच तेच चित्रीकरण पुन्हा पुन्हा दाखवून लोकांमध्ये घबराट निर्माण करु नका.

सभापती महोदय, आपण स्वातंत्र्य कसे मिळवले याची आठवण येते. स्वातंत्र्यापूर्वी लोकमान्य टिळकांनी केसरी वृत्तपत्र सुरु केले, जनतेला जागृत केले व त्यानंतर आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. मला सांगतांना वाईट वाटते परंतु आपणही मान्य कराल की, जर आज इंग्रज असते आणि आज ज्या प्रकारे टीव्हीवर दाखवले जात आहे तर कदाचित आपल्याला स्वातंत्र्य मिळालेही नसते. त्यावेळची वृत्तपत्रे खऱ्या गोष्टी जनतेपुढे मांडत होती.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात आपण सर्वांनी पोलीस यंत्रणेचे मनोबल कसे वाढविता येईल, जे धारातीर्थी पडले त्यांच्यासाठी काय करता येईल, अत्याधुनिक हत्यारे कशी देता येतील, दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी पोलिसांना अजून काय इन्फ्रास्ट्रक्चर्स देता येईल यासंदर्भात या सभागृहात मदत केलेली आहे. कायदा व सुव्यवस्था चांगली नसेल तर इंडस्ट्रीज सुध्दा चांगली राहणार नाही, आमदारांना आणि जनतेलाही संरक्षण मिळणार नाही. त्यामुळे पोलिसांना त्रास व्हावा असे आपल्या कोणालाही वाटत नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

स्कॉटलंड यार्डनंतर मुंबई पोलीस अशी ऐककाळी मुंबई पोलिसांची ओळख होती. मुंबईवर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर आम्ही जी काही भाषणे केली आहेत ती पोलिसांचे मनुष्यबळ वाढविणारी आहेत. एका पोलीस कॉन्स्टेबलने मरीन ड्राईव्ह येथे बलात्कार केला म्हणून संपूर्ण पोलीस दल बलात्कारी होऊ शकत नाही. काल जो प्रकार घडला त्यात 4-5 आमदारांची नावे आली म्हणजे 350 आमदार वाईट आहेत असे म्हणण्याचा प्रश्न येत नाही. पण काल जनते समोर जे चित्र गेले ते घाणेरडे आहे. विदारक आहे. आमदार जनते पेक्षा वगळे आहेत काय ? हा देखील प्रश्न विचारला गेला आहे. मी स्पष्ट शब्दात म्हणेन की, होय, जनते पेक्षा आमदार वेगळे आहेत म्हणून 350 लोकांच्या गाड्या येथ पर्यंत येत आहेत. बाकी जनतेच्या गाड्या सोडल्या जात नाहीत. तुम्ही इकडचे मालक नाहीत. काल खांडेकर तर बेंबी पासून ओरड मारत होते की, हे काय महाराष्ट्राचे मालक नाहीत. होय आम्ही मालक नाही, पण ट्रस्टी जरूर आहोत. आम्ही येथे विश्वस्त म्हणून काम करीत असताना काय खरे, काय खोटे जेवढे म्हणून तुम्ही दाखवत आहात त्यापेक्षा जास्त आम्ही येथे दाखवून देऊ. आम्ही कार्यक्रमासाठी वेगळे आहोत. सरकारी कार्यक्रमात राजशिष्टाचार पाळला जातो. माझ्या गाडीसाठी पास मिळतो. मला निमंत्रणपत्रिका येते. उद्या माननीय राष्ट्रपती, माननीय पंतप्रधान येत असतील तर आम्हाला पास मिळतो. होय, आम्ही वेगळे आहोत ना. तुम्हाला आम्ही वेगळे नाही असे म्हणता येणार नाही. पण ते जनतेसमोर असे काही नियम दाखवतात की, विचारायला नको. त्यांनी असाही मुद्दा उपस्थित केला की, माननीय उप सभापती त्यांना बोलावू शकतात काय ? अरे, का नाही बोलावू शकत ? माननीय उप सभापती ज्या विभागातून आलेले आहेत त्या भागातील आमदाराने आपली तक्रार त्यांच्याकडे दिली तर काय होते ? उद्या माझी तक्रार असेल तर मी देखील त्यांनाच देणार. सन्माननीय उप सभापती श्री.डावखरे साहेबांनी एका आमदाराचे ऐकून घेतले आणि त्यावर निर्णय दिला तर त्यात काय चूक आहे. He is doing his duty. त्यांनी सांगितले की, होय त्या अधिकाऱ्याला बोलावून मला दुसरी बाजू समजावून घ्यायची होती. त्यावर देखील चर्चा. लोकांमध्ये असा संभ्रम झाला की,

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ 16:50

श्री.किरण पावसकर....

उप सभापती या नात्याने श्री.डावखरे यांना बोलाविण्याचा अधिकारच नाही. मग बोलाविण्याचे अधिकार कोणाला आहेत ? निखिल वागळे यांना आहेत काय ? त्या खांडेकरना आहेत ? ही परिस्थिती आपण जनते समोर का आणू देत आहात ? बाबा आमटे यांच्या ट्रस्टची चर्चा सुरू झाली की, हे सर्व मवाळ होतात आणि ताबडतोब अशी भाषा बदलतात की, यांच्यावरच समाज घडविण्याचे बर्डन आले आहे. समाज घडविण्यासाठी तुमचा चौथा स्तंभ एवढा मजबूत आहे असे वाटत असेल तर ते चुकीचे आहे. आज चारही स्तंभ महत्त्वाचे आहेत. एकच स्तंभ महत्त्वाचा आहे असे समजू नका. प्रशासन देखील महत्त्वाचे आहे. जनता महत्त्वाची आहे. राजकीय पक्ष महत्त्वाचे आहेत. त्याच बरोबर मीडियाचा चौथा स्तंभ देखील महत्त्वाचा आहे. तुम्ही असे दाखवतात की, आम्हीच महत्त्वाचे आहोत, आमच्यामुळे तुम्ही आहात. हा प्रकार चुकीचा आहे.

आताच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, इतर काही बोलण्याची गरज नाही. काही लोकांवर बोलण्याचे लिमिटेशन्स आहेत. हा निषेध चार दिवस राहील. त्यानंतर पुन्हा जर टीव्हीवर जाos लागले तर काय होईल ? त्यामुळे मी तुमची कुचंबणा समजू शकतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन शिवसेनाप्रमुखांनी तुम्हाला येथे पाठविले आहे. होय, मी देखील त्या पक्षात काम केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हार घातल्याशिवाय कुठलीही सभा होत नव्हती. ती प्रथा शिवसेनाप्रमुखांनी सुरू केली. शिवसेनाप्रमुखांमुळे, शिवसेनेमुळे तुम्ही या सभागृहात आला आहात आणि ते खांडेकर तुम्हाला सरळ विचारतात की, उठसूठ शिवाजी महाराजांची नाव घेण्याची लायकी तरी आहे काय ? अवकात आहे काय, असे शब्द देखील वापरले गेले. त्यानंतर देखील आपण इकडे-तिकडे बघून का वागत आहात ? हे सर्व कशासाठी ? त्यांनी तर पद दिले नसते तर सभागृहात आला नसता, सभागृहात आला नसता तर तुम्हाला कॅमेऱ्याने बोलाविले नसते.

आम्ही शिवाजी महाराजांचे नाव घेऊन मोठे झालो. शिवाजी महाराजांचे नाव घेऊन बोललो. शिवाजी महाराजांचे नाव घेऊन असंख्य आंदोलने केली. कॅमेऱ्या समोर बसून लढलो नाही. पोलिसांच्या असंख्य लाठ्या काठ्या खाल्ल्या आहेत. मी माझ्या स्वत:वर केसेस घेऊन पुढे आलो आहे. या बाबत सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम सांगू शकतील. ते

..3

श्री.किरण पावसकर....

स्वत: मंत्री होते. त्यांनी मला मदत केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब सांगू शकतील. शिवाजी महाराजांचे नाव घेण्याची लायकी आहे असे विचारणाऱ्याने पोलिसांच्या किती लाठ्या काठ्या खाल्ल्या आहेत ? या खांडेकरने किती लाठ्या खाठ्या खाल्ल्या आहेत. वागळेंचा प्रश्न वेगळा आहे. त्यांना कुत्र्या सारखे झोडताना मी पाहिले आहे. मी त्याचा आय विटनेस आहे. शिवाजी मंदिर, दादर येथे शिवसेनेने केलेल्या आंदोलनात त्याला थोबडवले. ही भाषा मी मुद्दाम वापरत आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

मालवण येथे त्यांना कुत्र्या सारखे एवढे मारले की, त्यांना वाटले हा मेला म्हणून ते त्याला टाकून निघून गेले. एखाद्या व्यक्तीमध्ये 100 गुण वाईट असतात तेव्हाच समाज त्याला लाथाडतो, मारतो , थोबाडतो. मग एखादा पाच-पन्नास गुण काढण्याचा प्रयत्न करतो. त्यातला हा प्रकार आहे. कोणी कोणावर चिखल उडवावा याचा देखील विचार करावा.

सभापती महोदय, मीडियामध्ये नेहमी दाखविले जाते की, इकडे बलात्कार झाला, तिकडे बलात्कार झाला आणि पुन्हा एक टायटल येते की, सर्व प्रथम बलात्काराची बातमी "झी" ने दाखविली. म्हणजे ते पण क्रेडीट घेतात. आयबीएन लोकमत वर सर्व प्रथम बातमी. अरे बाबा, त्या ठिकाणी तू पोहोचलास कसा, सर्वात प्रथम तुला सांगितले कोणी, तू कशाला तेथे गेला होतोस किंवा व्हायच्या पूर्वी पोहोचलास होता काय, या सर्वाची चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, आपण नेहमी सांगतो की, आपले राज्य औद्योगिक क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर, शिक्षणामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे, पर्यटनामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. परंतु चॅनेलवर रोज महिलांच्या संदर्भातील बातम्या दाखववयास लागलो तर आपण खरोखर पहिल्या क्रमांकावर राहू काय ? आजही आपल्या मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय जगतातून 350 फ्लाईटस येत आहेत. त्याठिकाणी एकसारख्या बलात्काराच्या बातम्या यायला लागल्या तर त्यातून आपणास काय दाखववयाचे आहे ?

सभापती महोदय, चॅनेलवर एकच बातमी वारंवार दाखविली जाते. दुष्काळातील तीच गाय वारंवार दाखविली जाते, दुष्काळी भागातील जमिनींना पडलेल्या भेगा वारंवार दाखविल्या जातात. पाऊस भरपूर आला तर तेवढे मोठे पाणी दाखविले जाते. कुठे छोटा बलात्कार झाला असेल तर शाळेमध्ये विनयभंग झाला अशाप्रकारच्या बातम्या वारंवार दाखविल्या जातात. अशा बातम्यातून आपण यातून काय दाखवू इच्छित आहात ? आपण अशाप्रकारच्या बातम्या वारंवार दाखवून महाराष्ट्राला मागे खेचण्याचा प्रयत्न करीत आहात. मला तर असे वाटते की, या दोन चॅनेल्सनी महाराष्ट्रात वाईट चालले आहे हे दाखविण्याची सुपारी घेतली आहे. त्या दिवशीच्या चर्चेमध्ये ते म्हणाले की, आपण बिहारचे नाव घेऊ नका, तुम्ही बिहारच्या मागे कधीच पडला आहात. मला

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

त्यांना विचारावयाचे ते कुणाची सुपारी घेऊन आले आहेत ? कोणत्या देशाची, कोणत्या राज्याची सुपारी घेऊन आला आहात ?

सभापती महोदय, पोलीस अधिकारी आणि पोलीस कॉन्स्टेबल वेगवेगळ्या केसमध्ये पकडले गेले आहेत, त्यांच्यावर कारवाई झालेली आहे. तेव्हा सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचारी वाईट आहेत असे आम्ही कधीच म्हटले नाही. त्याच बरोबर किती तरी पत्रकार ब्लॅकमेलिंगमध्ये पकडले गेले आहेत. किती पत्रकांवर ब्लॅकमेलिंगच्या केसेस झालेल्या आहेत त्याची यादी मी देऊ शकतो. "झ ी" चॅनेलच्या संपादकांनी प्रश्न विचारला जाऊ नये म्हणून 100 कोटी रुपयांची मागणी केली म्हणून त्यांना अटक झाली होती. त्यांना 100 कोटी रुपये मिळाले असते तर ते एकसारखे पाण्याचे आणि दुष्काळाचे चित्र दाखविता होते त्या ऐवजी एखादा तालुका किंवा जिल्हा समृध्द झाला असता. "झी" चॅनेलच्या संपादकांवर ब्लॅकमेलिंग करण्याबद्दल केसेस घातल्या असतील तर तुम्ही धुतलेल्या तांदळासारखे स्वच्छ आहात काय ? पेड न्यूज काय, आम्ही तर सर्वजण निवडून येतो...

सभापती महोदय, मी खालच्या सभागृहात माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांचे भाषण ऐकले. त्यांचे भाषण एका मर्दासारखे होते. मीडियाने अशी आगपाखड केली की सर्वजण मागे गेले. आता पाच जणांना काय शिक्षा द्यायची ? काही जण तर कसाब पर्यंत जाऊन पोहोचले. म्हणजे केवढे मोठे मन केले आहे ? माननीय श्री.नारायणे राणे सांगितले की, कोणीही घाबरण्याचे कारण नाही, मी तुमच्या पाठिशी आहे आणि त्यांनी हे सर्व चालू केले. कोणी तरी उभे राहायला पाहिजे होते. उद्या माझ्याकडून एखादा अपराध झाला तर त्याबाबत मला फाशीची शिक्षा झाली तरी मी भोगेन. परंतु काहीतरी असत्य सांगून जनतेसमोर एकसारख्या त्याच त्याच गोष्टी दाखवावयाच्या आणि त्या हॅमर करुन झाल्यानंतर लोकांनी तुमच्यावर दगड मारायचे ही कोणती पध्दत आहे ? हेच प्रश्न मी माननीय श्री.हुसेन दलवाई जे या सदनाचे सदस्य होते यांच्याकडे तीन महिन्यापूर्वी मांडले होते.

..3.

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांना मी विचारु इच्छितो की., त्यांनी कधी चॅनेलवर फिल्म इंडस्ट्रीतील दोघाजणांना एकमेकांवर आरोप करण्यासाठी समोरासमोर बसविल्याचे पाहिले काय ? चॅनेलवर मुलाखत घेणारी व्यक्ती "हा आता तुम्ही बोला, तुम्हाला प्रश्नाचे उत्तर द्यावेच लागेल, आता त्यांनी तुमच्यावर भयंकर आरोप केले आहेत, त्याचे उत्तर ताबडतोब द्या," अशी ॲक्टींग करीत फिल्म इंडस्ट्रीतील लोकांना प्रश्न विचारताना पाहिले आहे काय या प्रश्नाचे उत्तर "नाही" असेच आहे.दोन शिक्षक आमदारांच्या बाबतीत असे पाहिले आहे काय, को-ऑपरेटीव्ह सेक्टरच्या बाबतीत पाहिले आहे काय, दोन पोलीस अधिकाऱ्यांना समोरासमोर बसवून असे प्रश्न विचारल्याचे पाहिले काय या सर्व प्रश्नांची उत्तरे "नाही" अशीच आहेत. मग हे दुर्दैव फक्त आमच्याच नशिबी का ? आपल्याकडील प्रत्येकजण स्टुडिओ मध्ये जायचे नाही असे का ठरवित नाही ? मालवणीमध्ये एक म्हण आहे, दोन कोंबड्यांना कण्या टाकून झुंजवणे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आपण असे का ठरवित नाही की, तुम्ही आमच्याकडे आलात तरी चालेल, पण तुमचे दोन दाणे खाण्यासाठी तुमच्या स्टुडिओमध्ये अशा गोष्टी करायला पुन्हा येणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

आमचे भवितव्य निखील वागळे आणि खांडेकर ठरविणार असेल तर मी जे काही शिक्षण घेतले ते कशासाठी घेतले ? माझ्या शिक्षणाचा खर्च माझ्या आई-वडिलांनी केला, माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी कार्यकर्ता घडविण्यासाठी मला आशिर्वाद दिले आणि आता पी.जी. किंवा पी.एचडी करण्यासाठी माननीय श्री.अजितदादांकडे आलो आहे. ज्यांनी मला घडविले त्यांचे आशिर्वाद मानू की, खांडेकर आणि वागळेचे मानू ? महोदय, त्यांनी काय असा लढा उभा केला आहे, या लोकांचे शिक्षण काय आहे, त्यांनी समाजासाठी काय केले, त्यांनी समाजासाठी आपल्या अंगावर किती केसेस घेतल्या ? एखाद्या आमदारांनी आपले आयुष्य समाजासाठी वेचायचे, आपल्या मतदारसंघात 40-50 वर्षे छोट्यामोठ्या कार्यक्रमांना जायचे, बारशाच्या कार्यक्रमाला जायचे, कोणाची तब्येत बरी नसेल तर जायचे किंवा कोणाचे निधन झाले असेल तर त्या ठिकाणी सुध्दा जायचे. सभापती महोदय, आपली तब्येत बरी नसताना सुध्दा आपण जागरुकतेने या खुर्चीत येऊन बसला आहात. परंतु मीडियावाले शर्टवर टाय लावतात आणि ए.सी.मध्ये बसून हातात कॉफीचा कप घेऊन दुसऱ्यांना काहीतरी वेडेवाकडे प्रश्न विचारतात. एवढेच नव्हे तर मेकअप रुममध्ये लाली, पावडर लावतात. मी तर म्हणेन की, आपणच या लोकांना मोठे करीत आहोत. एवढेच नव्हे तर त्यांचे फोन आल्यानंतर काही लोकांना अशाही वाईट सवयी आहेत की, त्यांचा मुलगा परदेशात जायला लागला की त्यांना मदत करतात. मी विचारु इच्छितो की, एखाद्या पत्रकाराच्या किंवा संपादकाच्या मुलाला तुम्ही कसली मदत करीत राहणार ? महोदय, या बाबत मी यादी देऊ शकतो.

आजपर्यंत मी एअरपोर्ट युनियन सांभाळली. 27 वर्षाच्या काळात माझ्या कुटुंबातील एकाही व्यक्तीला प्रवास करताना तिकीट अपग्रेड करण्यासाठी मला मागणी करावी लागली नाही किंवा फर्स्ट क्लासमध्ये बसवा म्हणून सांगावे लागले नाही. परंतु पत्रकार मंडळीकडून मुलाचे इकॉनॉमिक क्लासचे तिकीट काढल्यानंतर ताबडतोब सांगितले जाते की, माझ्या मुलाला फर्स्ट क्लासमध्ये बसवा. असे प्रकार करणारे जास्तीत जास्त कोणी असतील तर ते पत्रकार आहेत.

महोदय, लोकप्रतिनिधींनी आंदालने करायची, लोकांची मने जुळवायची, लोकांकडे जाऊन त्यांचे प्रश्न समजून घ्यायचे, लोकांचे प्रश्न सोडविण्याचे काम करावयाचे. परंतु आमदार कसा वाईट आहे हे सांगून आमदारांना नग्न करण्याचे काम मीडिया करीत असेल तर त्यांच्याकडे जायचे







असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की नाही याचा विचार या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांची करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

महोदय, माझ्याकडून चांगले-वाईट घडले तर माझ्या पक्षाने माझे कान पकडावेत, विरोधी पक्षाने कान पकडावेत. पण कोणी तरी खोटी बातमी देऊन ती शेवटपर्यंत दाखविणे योग्य नाही. काही बातम्या लागल्यानंतर कधी कधी सांगितले जाते की, तुम्ही अमुक व्यक्तीशी बोलून घ्या, ते ती बातमी काढतील. मी म्हणतो कशाला हे करायचे ? तुम्हाला जे दाखवायचे ते दाखवा. काय फरक पडणार आहे ? उघड्यासमोर नागडा उभा.

**सभापती** : सन्माननीय सदस्य, आपली वेळ संपलेली आहे.

श्री.किरण पावसकर : महोदय, या चर्चेच्या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, आम्ही ज्या दोन व्यक्तीविरुध्द बोललो, जेवढे एखाद्या चॅनेल विषयी किंवा बातमीदाराविषयी बोललो तेवढेच विषय आमच्याकडे सुध्दा वळतात. ज्यावेळी आम्ही एक बोट त्यांच्याकडे दाखवितो त्या वेळी तीन बोटे आपल्याकडे येतात आणि अंगठा म्हणतो की हे खरे आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, यावर आपण कंट्रोल करणे गरजेचे आहे. कारण यावर कंट्रोल केले तरच यातून चांगल्याप्रकारे जनजागृती होऊ शकते.

महोदय, राज्याच्या 300-350 आमदारांनी ठरविले की, आम्हाला चांगले काम करावयाचे आहे, तर कोणी काही करु शकत नाही. माझी या निमित्ताने पोलीस अधिकारी आणि पोलीस विभागाला विनंती राहील की, एखाद्या चॅनेल्सने खोटी बातमी 10 वेळा दाखविली तर ती सत्य समजू नका. हे मी याच बातमीच्या बाबतीत नव्हे तर इतरही बातम्यांच्या बाबतीत सांगतो दरोडा पडल्यानंतर तीच तीच बातमी दाखविली जाते. मी म्हणेन की, त्या बाबतची चौकशी झाल्यानंतर सर्व काही समोर येणारच आहे ना. एकसारखी बातमी आली की, वरिष्ठांचे फोन येतात. त्यामुळे चॅनेल्सवाल्यांना पकडणे हा आपल्या कामातील एक अविभाज्य घटक बनला आहे. राजकारण्यांना वाटते की, माझ्याबरोबर चॅनेल्स असायलाच पाहिजे. कारण तो एक अविभाज्य घटक आहे. पोलीस

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

अधिकाऱ्यांना वाटते की, माझ्या विरुध्द कोठे तरी वाईट बातमी येईल, त्यामुळे त्यांच्या दृष्टीने सुध्दा तो एक अविभाज्य घटक वाटते.

महोदय, या निमित्ताने माझ्या ज्या भावना होत्या त्या मी स्पष्ट शब्दात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या ठरावाला समर्थन देताना उद्या सकाळपासून चॅनेल्सवर बातमी दाखविली जाईल की, किरण पावसकर यांची सिंधुदुर्ग जिल्ह्यात अमुक**पृ.शी.**: अमुक इतकी जमीन आहे, किरण पावसकर यांची मुंबईत चार घरे आहेत. अशा प्रकारच्या बातम्या दाखविण्यास सुरुवात होईल. मी तर म्हणेन की, अशा बातम्या दाखविल्या तरी त्या बाबत काळजी करण्याची गरज नाही. कारण त्यात जर चुकीचे असेल तर त्याची शिक्षा भोगण्याची आम्ही तयारी ठेवली पाहिजे. अशा प्रकारच्या बातम्या प्रसारित करुन आपल्याला टार्गेट केले जाईल. आमदार म्हणून काम करीत असताना मीडियावाले नक्कीच टार्गेट करतील. त्यामुळे त्यांचा एक कॅमेरा फिरत असेल तर आपण त्यांच्या मागे सुध्दा 10 कॅमेरे लावण्याची हिंमत ठेवली पाहिजे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

तुमची किती घरे आहेत, तुम्ही कोठे कोठे राहता, तुमच्याकडे पैसा कसा आला, तुमचा पगार किती आहे, शासनाकडून किती फ्लॅ्ट घेतले, स्वत:चे किती फ्लॅ्ट घेतले, हे काढण्यासाठी जर 10 कॅमेरे लागले तरी मी ते लावीन. सर्व सन्माननीय सदस्यांना सांगेन की, थोडी मलाही मदत करा, मी त्यांच्यामागे सुध्दा 10 कॅमेरे लावीन आणि पुढच्या वेळी ती माहिती सुध्दा सभागृहामध्ये ठेवीन.

सभापती महोदय, एक तर जनता आमच्यासमोर उभी राहणार नाही म्हणून त्यांना घाबरायचे, आपले वरिष्ठ कोठे तरी नाराज होऊ नये म्हणून त्यांना घाबरायचे, ते झाल्यानंतर काही तरी चुकीची बातमी हे देतील म्हणून त्यांना घाबरायचे. इकडे घाबरुन घाबरुनच मरायला झाले आहे. असे मेल्यानंतर पुन्हा इकडे आहेतच. म्हणजे एक आमदार कसा घाबरुन घाबरुन जगतो हे वातावरण आपण बघावे. याला एवढे घाबरु नका असे आपल्या माध्यमातून आपण सर्वांनाच सांगू शकत नाही. पण माझी एक विनंती राहील. या सर्वांना घाबरुन जगल्यानंतर छोटेसे एखादे वाक्य आले असेल त्याबाबत काय होते हे आपल्याला माहीत आहे. मागच्या वेळी हिंदी बोलताना माननीय श्री. आर.आर.पाटील यांच्याकडून एक वाक्य आले. तावडे साहेब, ते एक वाक्य आल्यानंतर काय झाले ? श्री. आर.आर.पाटील यांच्या कामकाजाची पध्दत कशी आहे, ते सहृदयी आहेत की नाहीत, ते अभ्यासू आहेत की नाही ? ते ज्या तासगावातून आले आणि ज्या पध्दतीने त्यांनी काम केले, ते ज्या पध्दतीने काम करण्याचा प्रयत्न करतात हे आपल्याला माहीत आहे. त्यांच्या मुखातून जे एक वाक्य आले त्यामध्ये त्यांचे हिंदी थोडे चुकले असेल. आपल्याला जर इंग्रजी बोलावे लागले तर शब्दाची तसेच व्याकरणाची एकही चूक होणार नाही असे किती सदस्य या सभागृहात बसलेले आहेत ? उद्या सकाळी जर त्यांच्याकडून एखादा चुकीचा शब्द निघाला तर वर्षभर तोच शब्द आम्ही चालवत राहायचा का ? एखादा चुकीचा शब्द आल्यानंतर तोच शब्द मीडियाने एवढा वाढवून धरला की, प्रत्येक वेळी ते जिकडे जातील तिकडे तुम्ही आता हिंदी बोलू नका असे सांगायचे, हे काय आहे ? त्यांनी काय काम केले आहे, त्यामागे त्यांची निष्ठा किती आहे, त्यांनी किती वर्षे कामे केली आहेत, हे काही तरी बघणार की नाही ? तसे काही पाहिले जात नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. किरण पावसकर ....

सभापती महोदय, त्यांचा स्वत:चा फायदा असेल तर दुसऱ्या दिवशी चांगले दाखविले जाते. यांचे कोठे ऑपरेशन झाले असेल तर तिसऱ्या चौथ्या दिवशी स्तंभ लेखन आल्याचे मी पाहिले आहे की, अमुकअमुक हॉस्पिटलचा स्टाफ फार चांगला आहे. नंतर आम्ही त्यांना म्हणतो की, काल तुमचे फ्री ऑपरेशन झाले वाटते. त्यांनी एखाद्या एअरलाईनने प्रवास केला आणि त्या दिवशी त्यांना सर्व फ्री सर्व्हिस मिळाली असेल तर आठ दहा दिवसानंतर स्तंभलेखन येते की, अमुकअमुक एअरलाईन्सची सर्व्हिस फार चांगली आहे. मग मी विचारतो, सर्व फ्री झाले का ? त्यामुळे ही भाषा तुम्ही कोणाला सांगत आहात ? या गोष्टी जर करावयाच्या असतील तर त्यासाठी तुम्ही लोकप्रतिनिधींना हात घालू नका. तुम्हाला जर हात घालायचा असेल तर एखादा भ्रष्टाचारी अधिकारी असेल तर त्याला मीडियाने हात घालावा. एखादा पोलीस अधिकारी वाईट वागत असेल तर मीडियाने त्याच्यापर्यंत पोहोचावे. आमदार म्हणून जे वाईट वागत असतील त्यांच्या पर्यंत तुम्ही पोहोचावे. पण जे चांगले वागणारे आहेत त्यांना जर तुम्ही एकाच पारड्यात ठेऊन तोलणार असाल तर ते चुकीचे होईल. मग आम्हालाही तुमचे मोजमाप करावे लागेल. तुमची मापे सुध्दा आम्हाला काढावी लागतील. ही मापे काढताना तुमची सत्यता काय आहे हे सुध्दा जगासमोर आणावे लागेल. 11 कोटी जनतेसमोर ते मांडावे लागेल. श्री. वागळे स्वत: कसे आहेत, श्री. खांडेकर कसे आहेत, बाकीचे चॅनेलवाले कसे आहेत, त्या चॅनेलमध्ये काम करणारे कसे आहेत, या सर्व गोष्टी समाजासमोर आणाव्या लागतील.

सभापती महोदय, मी आज पाहिले आहे की, पोलिसांचे आणि आमदारांचे खरोखर सलोख्याचे संबंध आहेत. कारण जनतेचे कोणाचेही काम आले की, आपण ताबडतोब त्यांना फोन करतो आणि काम करा अशी विनंती करतो. चुकला असेल तर त्याला थोडे कमी मारा असे सांगतो. हे काही चुकीचे नाही. उद्यापासून जर सर्व आमदारांनी ठरविले की, आम्ही पोलीस स्टेशनला फोनच करणार नाही, आम्ही कोणत्याही कामासाठी येणार नाही, तर आम्ही लोकांमध्ये काम करु शकणार नाही. सामाजिक बांधिलकी असताना ही कामे करावीच लागणार. पोलिसांचे आणि आमदारांचे, राजकीय पक्षांचे संबंध फार चांगले आहेत. ते संबंध वाईट नाहीत. पण ते संबंध

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. किरण पावसकर .....

वाईट करण्याचा प्रकार दोन दिवसांपासून चालू आहे. हे नवीन काही तरी सोडलेले आहे. ही कोठून तरी घेतलेली सुपारी आहे, असे मला वाटते. कारण कालपरवापर्यंत हेच मीडियावाले खळ्ळ-खटॅक दाखवायचे. पण आता हल्ली बघितले तर त्यांच्या मोठमोठ्या सभा दाखवावयास लागले आहेत. आम्हाला असे वाटते की, बाबांनो, तुम्ही ही सुपारी घेतली आहे का ? आम्ही जे चांगले चालतो, चांगले वागतो त्यांचे काहीच दाखवत नाही. दुसरीकडे मात्र स्वच्छता दाखवावयास लागले. हे सुपारीचे धंदे त्यांनी बंद करावेत आणि सत्यता लोकांसमोर आणावी जेणेकरुन या महाराष्ट्रामध्ये काम करीत असताना आमचे जे लोक असतील, जनतेचे प्रतिनिधी असतील, त्याचबरोबर जे सरकारी अधिकारी असतील यांच्या बरोबर आम्हाला चांगल्या पध्दतीने जनतेची सेवा करण्याची संधी मिळू द्या. आम्ही सर्व जनतेची सेवा करीत असताना त्यामध्ये कोठे तरी खंड पाडून हे वातावरण बिघडवू नका अशी मी त्यांना विनंती करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

आज दोन आमदार स्वत:हून सरेंडर झाले आहेत. त्यांना घेऊन गेले. त्यांना घेऊन जात असताना पुढे 25 पोलीस, मागे 25 पोलीस होते हे टी.व्ही.वर दिसले आहे. ते आमदार म्हणजे कोणी गुंड आहेत, ते आपला एरिया सोडून चालले आहेत, बांगलादेशातून आले, यु.एस.ला चालले असे दर्शविले जात होते. ते लोकप्रतिनिधी आहेत. ते आपला मतदार संघ सोडून जाणार नाहीत. त्यांचे आई-वडील, कुटुंबीय येथेच आहेत. ज्या नावावर ते काम करतात त्यांचे पक्ष येथेच आहेत. त्यांना सोडून ते कोठे जाणार नाहीत. त्यांना अशी वागणूक देत असतील तर तेही चुकीचे आहे. त्यांच्याविषयी मीडिया जर चुकीचे दाखवित असेल तर ते चुकीचे आहे. त्यांनी जे केले त्याबद्दल सजा जरुर व्हावी. पण त्याचा बाजार होऊ नये, हा बाजार त्यांनी थांबवावा. या पाचही आमदारांनी गैरकृत्याबद्दल त्यांच्याविरुध्द कारवाई केलेली आहे. श्री.सचिन सूर्यवंशी यांच्याविरुध्दही तशीच कारवाई झाली पाहिजे. ती झालीच पाहिजे. त्याचे टेपिंग उपलब्ध आहे. एखाद्या आमदारांबरोबर त्यांनी अरे तुरे असे बोलावयाचे, आमदारांनी मात्र अहो बोलावयाचे ही कोणती परंपरा ? हे केल्याने समाज मोठा होणार आहे ?

श्री.क्षितिज ठाकूर यांना श्री.सचिन सूर्यवंशी यांनी अरे तुरे करुन उत्तरे दिली त्याची कॅसेट सर्वांनी बघणे गरजेचे आहे. ती व्हिडिओ क्लिप सर्वांनी पहावी. ते आपल्या मतदार संघातून निवडून आले आहेत. त्या व्यक्तीला अरे तुरे म्हटले तर ती व्यक्ती परत आल्यावर आपल्या मतदार संघात काम कसे करु शकेल, काय मान सन्मान मिळविणार आहे ? झालेला प्रकार निंदनीय आहे. सभागृहाच्या दृष्टीने तो व्हावयास नको होता. आपल्या भागामध्ये तो व्हावयास नको होता. पण ज्या प्रकारे आम्हाला काही मर्यादा आहेत, तशाच मर्यादा याही लोकांना घातल्या पाहिजेत. या पुढे तरी त्या त्यांनी ओळखाव्यात. अन्यथा ज्या पध्दतीने इतर आंदोलने होतात, तसे आणखी एखादे आंदोलन महाराष्ट्रात उभे राहण्याची गरज पडू नये. आमदारांच्या बाबतीत, ते मालक आहेत, गुंड आहेत, डाकू आहेत असे शब्द वापरण्यात आले. या सभागृहातील हे गुंड, डाकू 350 सदस्य बाहेर पडले तर तुम्हाला पळता भुई थोडी होईल. त्यांच्या मागे असलेली जनता तुमच्यासमोर येईल. सर्व आमदारांच्या मागे एवढी जनता आहे. ती त्यांच्याबरोबर रस्त्यावर

2...

श्री.किरण पावसकर....

येईल. त्यावेळी तुम्ही काय कराल ? तुम्हाला अराजकता माजवावयाची आहे का ? सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मांडलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेला समर्थन देतो. त्याचबरोबर सूर्यवंशी यांच्यावरही कारवाई केली जाईल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

3...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आज सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मांडलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेचे जड अंत:करणाने समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आतापर्यंत सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांचा पुनरुच्चार न करता फक्त एकच मुद्दा मांडून मी थांबणार आहे. सचिन सूर्यवंशी यांचा तोल गेला, त्यानंतर आमदारांचा तोल गेला. या दोन्ही बाबींसाठी भारतीय दंड संहिता शिक्षा देण्यासाठी समर्थ आहे. परंतु तिसरा तोल मीडियाचा गेला. त्यामुळे ही विशेषाधिकार भंगाची सूचना मांडण्यात आली आहे. विशेषाधिकार भंगाची सूचना देऊन आपण थांबलो तर कायदे मंडळ म्हणून आपण कोठे तरी कमी पडू म्हणून मी एक सूचना करतो. हा जो मीडिया आहे, त्या मीडियाला नियंत्रित करण्याचे अधिकार केंद्र सरकारच्या कायद्यात अंतर्भूत आहेत. या मीडियासंबंधी आचारसंहिता तयार करण्याची गरज आहे. त्या आचारसंहितेमध्ये काही सुधारणा सुचवावयाची असेल, काही म्हणणे मांडावयाचे असेल तर त्यासाठी सभागृहाच्या सदस्यांची एक समिती गठित करुन, लोकांची मते संकलित करुन,

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे...

पुढे अशा त-हेने कुठे तोल जाणार नाही अशा त-हेची आचारसंहिता तयार करुन ती केन्द्र सरकारकडे पाठवावी जेणेकरुन यातून पुढे काही तरी चांगले निर्माण होईल अशी सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: माननीय पीठासीन अधिकारी, विधानसभा, माननीय मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, व सन्माननीय सदस्य यांच्या बाबत अत्यंत आक्षेपार्ह व अवमानकारक विधाने करणे

**मु.शी.**: माननीय पीठासीन अधिकारी, विधानसभा, माननीय मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, व सन्माननीय सदस्य यांच्या बाबत अत्यंत आक्षेपार्ह व अवमानकारक विधाने करणे या विषयाबाबत सर्वश्री भाई जगताप,राम पंडागळे, अमरसिंह पंडित, कपिल पाटील, प्रकाश बिनसाळे, रामदास कदम व सतीश चव्हाण, वि.प.स.यांनी श्री.निखिल वागळे, वृत्त निवेदक, कार्यक्रम सूत्रसंचालक व संपादक, आयबीएन लोकमत वृत्तवाहिनी व श्री.राजीव खांडेकर,संपादक,एबीपी माझा वृत्तवाहिनी यांच्या विरुध्द दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, राम पंडागळे, अमरसिंह पंडित, कपिल पाटील, प्रकाश बिनसाळे, रामदास कदम व सतीश चव्हाण, वि.प.स.यांनी नियम 240 अन्वये विशेष हक्कांचा प्रश्न उपस्थित करण्याची सूचना दिली असून यामध्ये विशेष हक्कभंग झाल्याचे सकृतदर्शनी वाटत असल्यामुळे मी ती मान्य केली आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी आता विशेष हक्काचा प्रश्न उपस्थित करण्याकरिता सभागृहाची अनुमती मागावी.

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुढील विशेष हक्काचा प्रश्न उपस्थित करण्याकरिता सभागृहाची अनुमती मागतो.

"विधानभवनाच्या इमारतीत वाहतूक पोलीस अधिकारी श्री.सचिन सूर्यवंशी यांच्या बाबत घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या निमित्ताने विधिमंडळातील (विधानपरिषद आणि विधानसभेतील) कामकाज आणि घडामोडी याचे वृत्तांकन व विश्लेषण करताना आयबीएन लोकमत व एबीपी माझा या वृत्तवाहिन्यांवर सर्वश्री निखिल वागळे आणि राजीव खांडेकर यांनी, "आमदार मस्तवाल, मवाली, गुंड व हरामखोर, राडेबाज आहेत" अशा अपशब्दांनी आमदारांचा उल्लेख केला. पीठासीन अधिकारी आणि विधिमंडळाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांच्यावर संगनमताचा व कारस्थानाचा आरोप केला. आमदारांना अटक होऊ नये असा प्रयत्न माननीय मुख्यमंत्री आणि पीठासीन अधिकाऱ्यांनी

..3..

केला. त्यांनी गुंडांना पाठिशी घातले, त्यांनी लाज आणली, विधिमंडळाचे अवमूल्यन केले" अशा पध्दतीचे अत्यंत घृणास्पद शब्दात विधिमंडळाच्या सर्वोच्च पीठासीन अधिकाऱ्यांवर, सत्ताधिकारी आणि विरोधी पक्षातील सर्व आमदारांवर आणि महाराष्ट्राच्या सर्वोच्च सार्वभौम लोकशाही सभागृहावर निराधार, व्देषमूलक आरोप केले. जनतेच्या मनात कलुषित वातावरण निर्माण करुन जनतेची दिशाभूल केली. ही या सदनाची अवमानना आहे. सार्वभौम जनतेने दिलेल्या संविधानिक अधिकाराचा हा अवमान आहे. ही बाब विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे कार्यवाही करण्यासाठी सोपविण्यात यावी, ही विनंती."

**सभापती** : प्रश्न असा आहे की, माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना विशेष हक्काचा प्रश्न उपस्थित करण्यास सभागृहाची अनुमती आहे काय ?

सर्व सन्माननीय सदस्य : आहे.

**सभापती** : कोणाचाही विरोध नसल्यामुळे प्रश्न उपस्थित करण्यास अनुमती आहे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, अमरसिंह पंडित, विनोद तावडे, दिवाकर रावते, सतीश चव्हाण, कपिल पाटील, चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, रमेश शेंडगे, हेमंत टकले, रामदास कदम, प्रकाश बिनसाळे, अनिल भोसले आणि सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य यांनी या ठिकाणी विशेषाधिकार भंगाच्या सूचनेची नोटीस मला दिली होती. या सभागृहामध्ये त्यांनी आपल्या तीव्र भावना मांडल्या. म्हणून मी विशेषाधिकार भंगाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

सभागृहातील सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांनी आयबीएन लोकमतचे संपादक श्री. निखिल वागळे व एबीपी माझाचे संपादक श्री. राजीव खांडेकर यांच्या विरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना मांडलेली आहे. या चॅनेलवर या संपादकांनी विधिमंडळ सदस्यांविषयी अत्यंत आक्षेपार्ह व गर्हणीय टीका केलेली आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री व विधानसभेचे पीठासीन अधिकारी यांच्यावरही अत्यंत गंभीर व अवमानकारक आरोप केलेले आहेत. ही बाब सकृतदर्शनी सभागृहाचा, सन्माननीय सदस्यांचा व पीठासीन अधिका-यांचा अवमान व विशेषाधिकाराचा भंग

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

करणारी असल्यामुळे मी हे प्रकरण भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 194 मधील तरतुदी नुसार महाराष्ट्र विधानपरिषद नियम 240 व नियम 244 खालील तरतुदीच्या अधीनतेने चौकशी व अहवाल सादर करण्यास्तव विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे सोपवित आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दि□ां□ 22.3.2013 रोजी स□ाळी 10.00 ते 11.15 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीमध्ये प्रलंबित अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.30 वाजता पुन: भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ सायंकाळी 5 वाजू□ 18 मि□िटां□ी, शुक्रवार, दि□ां□ 23.3.2013 रोजीच्या स□ाळी 10.00 वाजेपर्य□त स्थ□ि□त झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही